मासिक वार्तापत्र • अंक ३० • नोव्हेंबर 2022 • सहयोग मूल्य - रु. 10 • 16 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


गुडगावच्या एका कामगाराची मुलाखत 3

वाढत्या महागाई विरोधात फ्रांसची जनता उतरली रस्त्यांवर! 4

नफ्याच्या हव्यासामुळे बिघडलेले हवामान 12


## "भारत जोडो यात्रा" : कामगार वर्गाचे हित भांडवलदारांशी जोडणारी यात्रा!

### कामगार वर्गाने कॉंग्रेसच्या बतावणीला फसू नये!

### सर्वधर्मसमभावाचा राग आळवून, आणि "तिरस्कारा"विरोधात याचना करून फॅसिझमशी लढणे शक्य नाही!

पराजयबोध जेव्हा मनाची पकड घेतो, तेव्हा विजयाची खोटी आशा दाखवणाऱ्या कोणाचाही हात पकडावासा वाटू लागतो. देशातील उदारवाद्यांचे तेच झाले आहे. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने काढलेल्या "भारत जोडो यात्रे"मुळे देशभरातील सर्वच उदारवादी, समाजवादी हर्षोल्हासित झाले आहेत आणि जणू काही देशामध्ये मोठे परिवर्तनच येऊ घातले आहे अशा आरोळ्या ठोकत आहेत. भाजपच्या फॅसिस्ट, धर्मवादी, जातीय राजकारणाला वैतागून पर्याय शोधू बघणारे आता कामगार वर्गाला सुद्धा कॉंग्रेसमध्ये आसरा शोधण्यास सांगत आहेत. भांडवलदारांच्या पैशातून होणारी ही यात्रा ना कोणते आमूलाग्र परिवर्तन घडवणार आहे, ना फॅसिझमला आव्हान उभे करणार आहे. आम्ही कामगार वर्गाला आवाहन करत आहोत की या भूलाव्याला न फसता कॉंग्रेसचे खरे वर्गचरित्र ओळखावे, कॉंग्रेसच्या सर्वधर्मसमभावाच्या राजकारणाचा फसवेपणा ओळखावा, अशा यात्रांनी फॅसिस्ट शक्तींना किंचितही फरक पडत नाही हे समजून घ्यावे, आणि योग्य कामगार वर्गीय राजकारणाचा पर्याय निवडत, "तिरस्कारा" विरोधात याचना करत नाही तर संघर्षाचा मार्ग स्विकारून फॅसिझमशी लढण्यास सज्ज व्हावे.

**संपादक मंडळ**

#### कोण "एकत्र" येत आहेत?

यात्रेदरम्यान लोकांची गर्दी उसळून येत आहे, रस्त्याच्या दुतर्फा लोक उभे आहेत, गरिबापासून ते श्रीमंतांपर्यंत आणि सामान्य माणसापासून ते सेलिब्रिटींपर्यंत समाजाच्या विविध हिश्श्यांमधून लोक सामील होत आहेत, राहुल गांधींसोबत चालायला, राहुल गांधींशी हस्तांदोलन करायला, राहुल गांधींना पहायला झुंबडीच्या झुंबडी येत आहेत, या यात्रेने एक चैतन्य निर्माण केले आहे, भारावलेले वातावरण तयार केले आहे, वगैरे, वगैरे बातम्या आता रोज येत आहेत. निश्चितपणे यात्रेमध्ये अनेक लोक सामील होत आहेत. अनेक ठिकाणी कॉंग्रेसी नेत्यांनी आपल्या शिक्षणसंस्था, इतर-संस्थांमधले कर्मचारी, विद्यार्थी यांना यात्रेला "धाडले" आहे, "राहुल बाबा" म्हणून "मोठा माणूस" आहे, त्याला फक्त बघण्यासाठी सुद्धा लोक येत आहेत, हे सुद्धा सर्वज्ञात आहे. रोज राहुल गांधींचे फोटो आणि व्हिडिओ प्रसारित केले जात आहेत. हे सर्व पैसे देऊन व्यावसायिकरित्या करवले जात आहे. राहुल गांधीचे फुटबॉल खेळताना, दांडिया खेळताना, क्रिकेट खेळताना, लोकांसोबत चहा पिण्यापासून ते सोबत जेवताना, कराटे खेळताना, लेझिम खेळताना, ढोल वाजवताना, नाचताना, खांद्यावर हात ठेवून चालताना, हातात हात धरून चालताना, धावताना, वगैरे, वगैरे फोटो आणि सोबतच भावनेला हात घालणारे संगीत वाजवत गरीब जनतेसोबत चालतानाचे व्हिडिओ पाहून याची खात्री नक्कीच पटू शकते की भाजपच्या तुलनेत कॉंग्रेस पक्ष सुद्धा "प्रतिमा निर्मिती"च्या हातखंड्यांमध्ये तरबेज आहे!

परंतु भव्यतेचे दैदिप्यमान दृष्य बघून अनेकांना भारावून जायला होते, आणि काहीतरी बदलत आहे असा भासही निर्माण होतो. प्रश्न हा नाहीये की यात्रेचे समोर येणारे वर्णन योग्य आहे की नाही. प्रश्न हा आहे की ह्या यात्रेकडून ज्या बदलाची अनेक जण अपेक्षा करत आहेत, तो होईल का? राहुल गांधी आणि कॉंग्रेसला खरेच कोणता बदल अपेक्षित आहे? तो बदल कामगार-कष्टकऱ्यांच्या

पान 6 वर

### भाकपा (माले) लिबरेशन सारख्या पतित दुरुस्तीवादी पक्षात झालेले पोषण आणि कम्युनिझमविरोधी अमेरिकन साम्राज्यवादी प्रचाराच्या बौद्धिक खुराकीतून तयार झालेली

## कविता कृष्णन: सर्वहारा वर्गाची नवीन गद्दार

✎ **आनंद**

सर्वहारा वर्गाशी गद्दारी करण्याचे काम दुरुस्तीवादी पक्षांचे सर्वच नेते करत असले, तरी कविता कृष्णन यांनी सीपीआय(एमएल) लिबरेशन सोडल्यापासून कम्युनिझम आणि कामगार वर्गाच्या महान शिक्षकांवर ज्या पद्धतीने उघडपणे हल्ला चढवला आहे त्यावरून हे स्पष्ट आहे की ही गद्दारी अगदी टोकाला गेली आहे. परंतु तिला या टोकापर्यंत पोहोचवण्यात तिच्या पक्षाचा मोठा हात आहे, कारण त्या पक्षानेच ते भांडवली उदारवादी वातावरण निर्माण केले ज्यामध्ये कविता कृष्णन सारखी गद्दार जवळपास तीन दशके पक्षात राहिली आणि केंद्रीय समिती आणि पॉलिट ब्युरोमध्येही जवळपास दशकभर टिकून राहिली.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की पक्षाने कृष्णन बाहेर पडल्याबद्दल दुःख व्यक्त केले आणि त्यांच्या दीर्घ सहवासाबद्दल व सक्रिय भूमिकेबद्दल कौतुक आणि आदर व्यक्त केला. कोणताही क्रांतिकारी सर्वहारा पक्ष गद्दारांना बाहेर काढून किंवा त्यांच्यापासून सुटका करून दुःख व्यक्त करत नाही, तर आनंद व्यक्त करून सुटकेचा निश्वास टाकतो. कविता कृष्णन सारखी निर्लज्ज गद्दार कम्युनिझम आणि क्रांतिकारी सर्वहारा वर्गाच्या गौरवशाली वारशावर चिखलफेक करत असतानाही तिच्याबद्दल 'कौतुक' आणि 'आदर' व्यक्त करण्यात कुठलीही कमतरता या पक्षाने ठेवली नाही यावरूनच देशातील सर्वात पतित झालेल्या या दुरुस्तीवादी पक्षाचे वास्तव काही प्रमाणात उघड होते. इतकेच नव्हे तर सोशल मीडियावर जेव्हा अनेक लोक कृष्णनच्या विश्वासघाताचा पर्दाफाश करत होते तेव्हा हा पक्ष तिच्या मदतीला धावून आला आणि ट्रोल्स म्हणून त्यांच्यावर टीका करू लागला! तसे, कविता कृष्णनसारख्या निर्लज्ज गद्दाराचे उघडपणे समोर येणे काही आश्चर्याची गोष्ट नाही. ज्याप्रमाणे सीपीआयसारखा मृतप्राय दुरुस्तीवादी पक्ष कन्हैया कुमारसारखा विदूषक निर्माण करू शकतो, त्याचप्रमाणे 'लिबरेशन' सारख्या दुरुस्तीवादी पक्षातून कविता कृष्णनसारखी कुटील गद्दार निर्माण होणे अपेक्षितच होते. विशेष म्हणजे, या पक्षाने आतापर्यंत कृष्णन यांच्या खोटारडेपणाचे उत्तर दिले नाही, फक्त एक मैत्रीपूर्ण तक्रार केली आहे की आता फॅसिझमशी लढण्याची वेळ आहे (निवडणूक युतीच्या मार्गाने!), इतिहासातील कबरी खोदण्याची नाही! यावरूनच आपण कामगारांनी सीपीआय (एमएल) लिबरेशनचे खरे चरित्र ओळखले पाहिजे. पण तरीही कविता कृष्णन नावाच्या या कामगार वर्गाच्या गद्दाराने कम्युनिझम आणि कामगार वर्गावर केलेल्या हल्ल्यांची तथ्य

पान 14 वर

## रोजगाराच्या हक्कासाठी आणि भ्रष्टाचाराविरोधात मनरेगा युनियनचे आंदोलन

पान 3 वरून

भविष्यात इतर कामगारांसोबतच मेट कामगारांचेही वेतन देण्यात यावे, अशी मागणी युनियनतर्फे करण्यात आली.

युनियनचे साथी अजय म्हणाले की सरकारच्या म्हणण्यानुसार, संपूर्ण देशात सुमारे 13 कोटी मनरेगा कामगार नोंदणीकृत आहेत. आज ही संख्या बघता मोदी सरकारने मनरेगाचे बजेट वाढवायला हवे होते, उलट या वेळी म्हणजेच 2022-23 या आर्थिक वर्षासाठी मनरेगाचे बजेट 73 हजार कोटी रुपये ठेवण्यात आले आहे, जे गेल्या वर्षाच्या सुधारित बजेट 98,000 कोटी रुपयापेक्षा 25.5 टक्के कमी आहे, म्हणजे सरळ-सरळ 25,000 कोटी रुपयांची थेट कपात. ताज्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्षात सहा महिने शिल्लक असतानाच मनरेगा बजेटच्या 100 टक्क्यांहून अधिक हरियाणा सरकारने खर्च केलेले आहे, यातूनच दिसून येते की बजेट किती कमी दिले जात आहे.

एकीकडे मोदी सरकार कॉर्पोरेट टॅक्समध्ये मोठ्या प्रमाणात सूट देत आहे, तर दुसरीकडे पीडीएस, स्वयंपाकाचा गॅस ते शिक्षण आणि आरोग्याच्या अर्थसंकल्पात कपात करत आहे. स्पष्ट आहे की यामुळे कामगारांवर महागाईचा भार वाढणार आहे. तसे पाहता, कोरोना महामारीच्या आपत्तीचे संधीत रुपांतर करण्यात भाजप सरकारने कोणतीही कसर सोडलेली नाही. या काळात मजुरांच्या झालेल्या दुरावस्थेचा अंदाज सरकारला कदाचित आपल्या संपूर्ण कार्यकाळात कधीच बांधता येणार नाही किंवा त्यांना तसे करायची इच्छाही नाही.

मनरेगा कामगारांच्या आंदोलनाला पाठिंबा देत भारताच्या क्रांतिकारी कामगार पक्षाचे (आर.डब्ल्यू. पी.आय.) साथी प्रवीण म्हणाले की, जगातील सर्व वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कष्टकरी जनतेला मजुरीसाठीच्या लढ्याला सत्तेच्या लढ्यापर्यंत घेऊ जावे लागेल. कामगारांना त्यांच्या आर्थिक हितासाठी लढावेच लागेल, परंतु या प्रक्रियेत त्यांना हे समजून घ्यावे लागेल की संपूर्ण राजकीय आणि सामाजिक-आर्थिक व्यवस्था म्हणजेच भांडवलशाही व्यवस्था त्यांच्या आर्थिक समस्यांसाठी जबाबदार आहे आणि म्हणून त्यांना त्यांच्या आर्थिक लढायासुद्धा राजकीय मार्गाने लढाव्या लागतील. त्यासाठी सर्वहारा वर्गाला जनमानसात राजकीय जाणीव निर्माण करावी लागेल, त्यांच्यामध्ये क्रांतिकारकांच्या विचारांचा प्रचार आणि राजकीय शाळांचे आयोजन करावे लागेल. लेनिनच्या शब्दात सांगायचे तर, युनियन ही कामगारांची पहिली शाळा असते, जिथे कामगार, कामगार चेतनेपासून सर्वहारा चेतनेकडे पहिले पाऊल टाकतो आणि त्याची वर्ग एकता अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतो.

### क्रांतिकारी मनरेगा कामगार युनियनच्या मागण्या

1. विभागाकडून 16 दिवसांच्या कामाचे मस्टररोल काढले जावे आणि मनरेगाची कामे सुरळीतपणे सुरू करावीत.
2. सर्व मेट कामगारांची प्रलंबित मजुरी देण्यात यावी.
3. नवीन जॉबकार्ड्स ठराविक कालमर्यादेत बनवले जावेत आणि ब्लॉकमध्ये तीन दिवसीय शिबिर आयोजित करून जॉबकार्डच्या समस्या सोडवल्या जाव्यात..
4. 15 दिवसांच्या आत काम न दिल्यास बेरोजगारी भत्ता देण्यात यावा.
5. मनरेगाचे बजेट वाढवून मनरेगा कामगारांचे दैनिक वेतन 800 रुपये करण्यात यावे.

## कामगार बिगुलच्या दरवाढीबद्दल

**साथींनो, कामगार बिगुलची किंमत जून 2022 च्या अंकापासून रु. 10 करण्यात येत आहे.**

भांडवली वर्तमानपत्रे भांडवलदारांनी दिलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जाहिरातींच्या माध्यमातून आपल्या अंकाची किंमत कमी ठेवतात आणि बदल्यात भांडवलदार वर्गाचे गोडवे गातात. कामगार वर्गाचे वर्तमानपत्र मुख्यत्वे फक्त कामगार वर्गाने दिलेल्या निधीतूनच चालू शकते. कामगार बिगुल करिता लेखन करणारे सर्व लेखक, पत्रकार आणि याच्या छपाईपासून ते वितरणापर्यंत कामात सामील होणारे विविध कामगारवर्गीय कार्यकर्ते हे सर्व काम विनामोबदलाच करत आलेत, आणि कामगार वर्गीय राजकारणाच्या प्रचाराचे काम असेच झालेही पाहिजे. परंतु छपाई आणि वितरणासारखे खर्च मात्र करावेच लागतात.

गेली 7 वर्षे अंकाची किंमत रु. 5 होती. गेल्या जवळपास दोन वर्षांपासून अंक छपाईची किंमत रु. 5 च्या वर गेली होती आणि फक्त कामगारवर्गाने दिलेल्या अतिरिक्त सहयोगाच्या जोरावरच कामगार बिगुलचे अंक छापले जात होते. परंतु गेल्या वर्षभरात इतर सर्व महागाईसोबतच कागद, छपाई आणि वितरणाच्या खर्चाने सुद्धा सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत आणि अंकाची किंमत नाईलाजाने रु. 10 करावी लागत आहे. कामगार बिगुलच्या नियमित वाचकांना आणि सहयोगीदारांना आवाहन आहे की जर जनतेचा पर्यायी मीडीया उभ्या करण्याच्या, कामगार वर्गाच्या क्रांतिकारी वर्तमानपत्राच्या गरजेला आपण समजत असाल तर कामगार बिगुलला जास्तीत जास्त आर्थिक सहयोग नक्की करावा. भांडवलदारांनी दिलेल्या निधीवर नव्हे, तर जनतेच्याच जोरावर आजपर्यंत कामगार बिगुल प्रसिद्ध होत आहे, आणि आम्हाला विश्वास आहे की आपल्या साथीने यापुढेही होत राहील.

## बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हॉट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा :**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा : 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


•रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर : 74992 64646

• पुणे : 8669735643


## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# गुडगावच्या एका कामगाराची मुलाखत

✎आदित्य

आज संपूर्ण देशात जवळपास निम्मी लोकसंख्या एकतर बेरोजगार आहे किंवा रोज काम करूनच आपली उपजीविका चालवू शकते. गुडगाव अशी जागा आहे जिथे वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे लाखो कामगार राहतात. यांच्यामध्ये मुख्यत्वे ऑटोमोबाईल आणि कापड क्षेत्रातील कामगार सामील आहेत. परंतु इतकी संख्या असूनही हे सर्व कामगार सर्वाधिक वाईट जीवन जगण्यास मजबूर आहेत. या मुलाखतीत एका अशाच कामगारासोबत संवाद केला गेला आहे, जे गेल्या 11 वर्षांपासून गुडगाव मध्ये काम करत आहेत आणि त्यांनी जवळपास सर्व प्रकारच्या कारखान्यांमध्ये काम केले आहे. चला जाणून घेऊयात गुडगावच्या एका कामगाराची कहाणी, त्यांच्याच तोंडून.

**प्रश्न:** पहिल्यांदा तुम्ही स्वत:बद्दल सांगा. गुडगाव मध्ये कधीपासून आहात आणि काय काम करता?

**उत्तर:** मी उत्तरप्रदेशातील अलाहाबादचा आहे आणि गुडगाव मध्ये 2010 पासून रहात आहे. सध्या मी उद्योग विहार येथील एक्सपोर्ट हाऊस मध्ये काम करतो आणि तिथे माझे काम कटिंगचे आहे.

**प्रश्न:** तुम्ही जवळपास 12 वर्षांपासून गुडगाव मध्ये आहात. तर, या काळात तुम्ही कुठे-कुठे आणि काय-काय काम केले आहे?

**2010 ते 2013 दरम्यान एकूण 23 कंपन्यांमध्ये मी काम केले. प्रत्येक जागी एक महिना, दिड महिना, दोन महिने असे करून खर्च चालवण्यासाठी काम केले.**

**उत्तर:** 2010 ते 2013 दरम्यान एकूण 23 कंपन्यांमध्ये मी काम केले. प्रत्येक जागी एक महिना, दिड महिना, दोन महिने असे करून खर्च चालवण्यासाठी काम केले. तसा तर मी शिकलेल्या मध्यम-वर्गातून येतो, पण माझ्या योग्यतेचे काम काही मिळालेच नाही, खरेतर शिक्षण आणि मेहनतीच्या हिशोबाने रोजगार मिळायला पाहिजे होता. एक्सपोर्ट लाईनवर काम करत असताना ज्या पद्धतीची भाषा आमच्या संदर्भात वापरली जायची ती सुद्धा आम्हाला पटली नाही. मग एका जागी एक-दोन माणसं अशी भेटली की ज्यांची वागणूक चांगली वाटली, तर मग 15 महिने त्यांच्याकडे काम केले. या दरम्यान ट्रॉलीला धक्का देण्यापासून ते सामान वाहण्यापर्यंत अनेक कामे करवली गेली. मग माझी एक परिक्षा होती जिच्याकरिता सुट्टी मागितली आणि सुट्टी दिली गेली नाही, तर मग मी परिक्षेला तसाच निघून गेलो. परत आलो, तर काम सुटले होते. यानंतर मी जय ऑटो कंपनी नावाच्या ऑटोमोबाईल कंपनीमध्ये दिड-दोन महिने काम केले. तिथे खूपच अवघड काम होते. 12 तास शिफ्ट असायची, त्यातही नाईट शिफ्ट लावली जायची.

**प्रश्न:** तिथे काय काम होते?

उत्तर: तिथे माल उचलून चालू असलेल्या असेंब्ली लाईनवर ठेवावा लागे. माल कमी कधीच पडला नाही पाहिजे असे होते. तिथले काम सोडल्यावर पुन्हा एक्सपोर्ट लाईनवरच एका जागी काम मिळाले, जिथे काम शिकवले गेले. तिथे मी सॅंपलींग आणि कटींगचे काम शिकले.

**जेव्हा माझी मजुरी 3,900 रुपये होती तेव्हासुद्धा मी 500 रुपयांचा फॉर्म भरत होतो. अनेकदा तर ओव्हरटाईम करून मी फॉर्मचे पैसे काढत होतो.**

**प्रश्न::** अच्छा, तर तुम्ही सांगितले की एका जागी परिक्षा देण्याच्या कारणाने तुम्हाला काम सोडावे लागले, तर तुम्ही काम करताना अभ्यासही करत होते आणि तुम्ही किती शिक्षण घेतलेत?

**उत्तर:** हो, काम तर सतत करत होतो, पण सोबतच अभ्यासाला वेळही काढायचो आणि सतत परिक्षा देत होतो. मी बारावीपर्यंत शिकलो आहे, आणि मग ग्रॅज्युएशन काही दिवस केले, आणि एम.ए. पर्यंतची पुस्तके लायब्ररीतून घेऊन वाचत होतो. नंतर मी आय.टी.आय. सुद्धा केले. जेव्हा माझी मजुरी 3,900 रुपये होती तेव्हासुद्धा मी 500 रुपयांचा फॉर्म भरत होतो. अनेकदा तर ओव्हरटाईम करून मी फॉर्मचे पैसे काढत होतो. आम्ही तीन भाऊ आहोत, तिघेही सतत फॉर्म भरायचो, आणि आम्ही खूप पैसा यामध्ये वाहवला आहे, पण आजवर कोणालाही नोकरी लागली नाही. आम्ही 2019 पर्यंत परिक्षाच देत होतो. 2019 नंतर पुन्हा भाजप सरकार आल्यावर तर जागा निघणे बंद झाले आहे. मग आम्ही फॉर्म भरणेच बंद केले.

**प्रश्न:** सध्या कामगारांची एकंदरीत स्थिती कशी आहे? फॅक्ट्ऱ्यांमध्ये स्थिति कशी आहे, याबद्दल काही सांगा.

**उत्तर:** सध्या कामगारांची स्थिति ही आहे की ते 9-10 हजारांची नोकरी करत आहेत. यामध्ये भागत तर नाही. नाईलाजाने त्यांना ओव्हरटाईम करण्याची लालसा निर्माण होते. यामध्ये बघा की जर कंपनीला गरज असेल ओव्हरटाईमची तर ती जबरदस्ती तुम्हाला थांबवून काम करवून घेते, पण जर तुम्हाला गरज असेल की ओव्हरटाईम करून काही जास्त कमवावे तर ते तुमच्या हातात नाहीये. इतकेच नाही तर कंपन्यांना गरज नसताना ब्रेक सुद्धा दिला जातो. काही ठिकाणी जिथे ब्रेक दिला जात नाही, कामगार नियमित काम करत आहेत, तिथे त्यांना धमकावून काम करवले जाते. इंचार्ज असेल, मॅनेजर असेल किंवा सुपरवायझर असेल, हे सगळे त्यात सामील असतात. अनेकदा तर बाथरूमला जाण्यावरही निर्बंध लादले जातात, किंवा 5 मिनिटे लेट झाले तर त्यांना कामावरून काढण्याची धमकी दिली जाते. ही स्थिति त्य जागेची आहे जिथे कंपनीची हेड ब्रँच (मुख्य शाखा) आहे, जिथे त्या कंपनीचा मुख्य मालक सुद्धा बसतो. तर जिथे फक्त प्रॉडक्शन लाईन आहे तिथे स्थिति काय असेल याचा तुम्ही अंदाज लावू शकता. 12-14 तासांच्या ड्युटीमध्ये त्यांना 5 मिनिटे आपसात बसून बोलण्याचा सुद्धा वेळ दिला जात नाही.

**प्रश्न:** अनेकदा असेही ऐकायला मिळते की कामगारांना तिथे आपसात जात-धर्माच्या नावाने विभागण्याचे काम सुद्धा केले जाते, तर यावर काय स्थिती आहे?

**उत्तर:** हो, कंपन्यांमध्ये सुपरवायझर म्हणून अशाच लोकांना ठेवले जाते जे सत्तेच्या बाजूने असतात. जर त्यांना समजले की काही लोक अशा मानवतावादाच्या गोष्टी करत आहेत, किंवा मुस्लिम आहेत, तर त्यांच्यावर विशेष नजर ठेवली जाते आणि लोकांना त्यांच्याविरोधात भडकावले सुद्धा जाते. दुसरे, आमच्या कंपनीत भेटल्यावर राम-राम म्हणायला सांगितले जाते. जर तुम्ही राम-राम म्हणत नसाल तर विरोधी पक्षात आहात. अशा स्थितीत तुमच्यावर वेगळी नजर ठेवली जाते, तुम्हाला वेगळे केले जाते आणि अशी स्थिति निर्माण केली जाते की तुमची घुसमट होऊ लागेल. तुमच्याशी अशाप्रकारे वर्तन केले जाते की तुम्ही खालच्या जातीचे आहात, आणि दुसऱ्या धर्माचे आहात म्हणून राम-राम करत नाही. इथपर्यंत की तुम्ही जर बाथरूमला गेलात तर मालकाच्या चमच्यांना तुमच्या मागे पाठवले जाते हे बघायला की तुम्ही इतर कोणत्या कारणाने तर नाही गेलात.

**प्रश्न:** तुमच्या मते कामगारांची ही स्थिती असण्याचे कारण काय आणि कामगारांनी काय केले पाहिजे?

**उत्तर:** याचे एक मुख्य कारण हे आहे की कामगार आज विखुरलेले आहेत. कामगारांना जागरूक करण्यासाठी माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीये. एखादी गोष्ट आम्ही ऐकतो किंवा वाचतो, तेव्हा आम्ही तर्क लढवतोय की हे खरे आहे की खोटे. म्हणजे, आज सर्व लोकांना तर्काच्या माध्यमातून आपण सोबत जोडले पाहिजे.

ही एका कामगाराची कहाणी आहे, जेव्हा की असे हजारो-लाखो-कोट्यवधी कामगार आज फक्त गुडगाव मध्येच नाही, तर देशाच्या सर्व भागांमध्ये काम करत आहेत. यांमध्ये अनेक असेही आहेत ज्यांनी उच्च शिक्षण घेतले आहे, पण त्यायोग्य काम न मिळाल्यामुळे ते मजुरी करत आहेत. बाकी, अशा मजुरांची संख्या तर कोट्यवधींमध्ये आहे, ज्यांनी खराब शिक्षण व्यवस्थेमुळे दहावी-बारावी किंवा त्या अगोदरच शिक्षण सोडावे लागले. अर्थ स्पष्ट आहे की कारण तर या व्यवस्थेमध्ये आहे, भांडवली व्यवस्थेमध्ये. त्यामुळे एका समतामूलक समाजाच्या स्थापनेशिवाय या भेदाला आणि शोषणाला संपवले जाऊ शकत नाही.

(अनुवाद. मूळ लेख मज़दूर बिगुल, ऑक्टोबर 2022 मध्ये प्रकाशित)

# रोजगाराच्या हक्कासाठी आणि भ्रष्टाचाराविरोधात मनरेगा युनियनचे आंदोलन

✎आशु

20 सप्टेंबर. हरियाणातील कलायत तालुक्यामध्ये क्रांतिकारी मनरेगा कामगार युनियनच्या नेतृत्वात चौशाला, रामगढ, बाह्मणीवाल व इतर गावातील कामगारांनी आंदोलन केले. युनियनच्या वतीने एका शिष्टमंडळाने एस.डी.एम. सुशील कुमार यांना मनरेगा कामगारांच्या समस्यांची माहिती देत आपल्या मागण्यांचे निवेदन सुपूर्द केले. युनियन प्रभारी रमण यांनी सांगितले की, कलायत ब्लॉकच्या बी.डी.पी.ओ. कार्यालयात प्रशासकीय कामांसाठी कोणतेही उत्तरदायित्व निश्चित नाही. मनरेगा योजना सुरळीतपणे चालवण्याची जबाबदारी बी.डी.पी.ओ. कार्यालयाचीच आहे. मनरेगा कायद्यांतर्गत 100 दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे. मात्र कलायत ब्लॉकमधील मजूर कुटुंबांना खूप झाले तर 30-40 दिवसच काम मिळत आहे. मनरेगा कायद्यांतर्गत कामासाठी अर्ज केल्यानंतर 15 दिवसांत काम न मिळाल्यास अर्जदार मजुरांना बेरोजगार भत्ता



देण्याची तरतूद आहे. परंतु कलायतचे ए.बी.पी.ओ. आणि बी.डी.पी.ओ. स्पष्टपणे सांगतात की बेरोजगारी भत्ता दिला जाणार नाही. भारतीय संविधान आणि सर्वोच्च न्यायालयाने कलम 21च्या जीवनाच्या अधिकारासोबत जीविकोपार्जनाच्या अधिकाराचाही समावेश केला आहे, आणि मनरेगा जीविकोपार्जनाची योजना आहे; परंतु ए.बी.पी.ओ. आणि बी.डी.पी.ओ. सातत्याने कामगारांचे हे मूलभूत अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. रोजगार हमी अंतर्गत काम न देणे आणि बेरोजगारी भत्ता न देणे हे कामगारांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. तसेच कलायतच्या मनरेगा कार्यालयातील कर्मचाऱ्यांबाबत बोलायचे झाले तर संपूर्ण महिन्यात केवळ 8 दिवस कर्मचारी उपलब्ध असल्याने मनरेगा कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. चौशाला गावातील मीना सांगतात की, कलायत तालुक्यात मजुरांना वर्षातून 25-30 दिवसच काम मिळते. हेच आकडे संपूर्ण हरियाणा आणि देशपातळीवर आहे. आपल्याला हे माहीत आहे की मनरेगा कायद्यांतर्गत 100 दिवसांचे काम देण्याची जबाबदारी राज्य आणि केंद्र सरकारची आहे . परंतु मनरेगा कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता आणि शासनाच्या कामगार विरोधी धोरणामुळे मनरेगा बजेटचा योग्य वापर होत नाही. दुसरीकडे कामासाठी अर्ज करूनही मजुरांना काम मिळत नाही. मेट मजुरांचे वेतनही एक-एक वर्षानंतर केले जाते, अशा परिस्थितीत मेटच्या कुटुंबांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळेच मेटची प्रलंबित मजुरी देण्यात यावी आणि

पान 2 वर

# वाढत्या महागाई विरोधात
## फ्रांसची जनता उतरली रस्त्यांवर!

✍ शुभम

ऑक्टोबर महिन्यात फ्रांसच्या कामगारांचे अनेक संप झाले. याच वर्षी मार्च आणि जानेवारी मध्ये झालेल्या संपाच्या तुलनेत हे संप कैक पट होते. या संपांचे कारण आहे फ्रांस मध्ये सतत वाढणारी महागाई जिने एकीकडे तर भांडवलदार वर्गाला प्रचंड नफा कमावण्याची संधी दिली आहे, तर दुसरीकडे कामकरी जनतेची कंबर मोडली आहे. फ्रांसची कामकरी जनता भयानक महागाईचा सामना करत आहे, जी सतत तीव्र होत चाललेल्या भांडवली संकटाचाच परिणाम आहे. ते संकट ज्याला ब्रुसेल्स (युरोपियन युनियनचे मुख्यालय) मधून चालवली जाणारी नोकरशाही धोरणे अजून तीव्र करत आहेत, आणि ज्याला युक्रेनमध्ये रशिया विरोधात चालू असलेले अमेरिकेचे आर्थिक आणि छुपे युद्ध वेगवान करत आहे. गेल्या महिन्यात झालेल्या संपांमध्ये सर्वात प्रमुख संप 18 तारखेचा होता, ज्याच्या शक्तीमुळे भांडवली मीडिया सुद्धा बातमी देण्यास बाध्य झाला. 18 ऑक्टोबरला झालेला हा संप तेव्हा सुरू आला, जेव्हा फ्रांसमधील कामगारांची एक युनियन सी.जी.टी.ने तेल कंपनी 'टोटल एनर्जी'सोबत इतर दोन युनियन्स (सी.एफ.डी.टी. आणि सी.एफ.ई.-सी.जी.सी.) संगे चर्चेला बसण्यास नकार दिला, या युनियन्सनी 7 टक्के वेतन वाढ स्विकारल्यानंतर सी.जी.टी. ने इतकी कमी वेतनवाढ नाकारली, आणि 10 टक्के वेतनवाढीच्या मागणीला घेऊन कामगारांना संपात सामील होण्याचे आह्वान केले.

या आह्वानानंतर कामगार मोठ्या संख्येने रस्त्यांवर उतरले आणि फ्रांसच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये दीडशेपेक्षा जास्त आंदोलने आयोजित केली. सी.जी.टी. च्या मते या आंदोलनांमध्ये तीन लाखांपेक्षा जास्त कामगारांचा सहभाग होता. फ्रांसची राजधानी पॅरिस या एका शहरामध्येच 70 हजार कामगार सामील झाले. खरेदी क्षमता, वेतनवाढ, कामाची स्थिती, संपाचा अधिकार, व्होकेशनल उच्च शिक्षणसंस्थांमध्ये सुधारांना विरोध या आंदोलनाच्या मुख्य मागण्या बनत आहेत. यासोबतच युवक-विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्साहाने या आंदोलनांमध्ये सहभाग घेतला आहे, ते रिफायनरी उद्योगातील कामगारांच्या समर्थनात रस्त्यांवर उतरले आहेत, राजधानी पॅरिस मध्ये त्यांनी कॉलेज बंद करवली आहेत, शिक्षणव्यवस्थेत होत असलेल्या बदलांच्या विरोधातही त्यांनी जोरदार आंदोलन केले आहे.

ध्यानात घ्यावे की फ्रांस मध्ये ऑगस्ट आणि



सप्टेंबर महिन्यापासूनच तेल उद्योग आणि अणुऊर्जा प्रकल्पांच्या कंपन्यांमध्ये अनेक कामगार सन्मानजनक मजुरीच्या मागणीवरून संपावर गेले होते. हे संप सुद्धा सी.जी.टी. च्या नेतृत्वाखालीच चालले होती. कामगारांनी काम थांबवून संप चालू केल्यावर फ्रांसच्या अनेक शहरांमध्ये वीजेचा पुरवठा ठप्प झाल्यामुळे (फ्रांसचे राष्ट्रपती) मॅक्रोन सरकारचे मंत्री आणि तेथील मीडीया भडकला होता आणि सतत कामगारांच्या न्याय्य मागण्यांवरून झालेल्या संपाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत होता. ते सतत देशामध्ये 'शिस्त' आणण्याची गोष्ट करत होते (कारण भांडवली सरकारांसाठी कामगारांचे रक्त पित जात नफ्याचे महाल उभे करणे म्हणजेच शिस्त आहे आणि कामगारांनी या विरोधात आवाज उठवणे म्हणजे अराजकता आहे). 29 सप्टेंबर पर्यंत संपांमध्ये सामील कामगारांची संख्या दहा लाखांवर पोहोचली होती! जिथे कुठे कंपन्यांना घेराव घातला जात होता, तिथे वेतनवाढीची मागणी आणि वर्ग संघर्ष हेच वादाचे मुख्य मुद्दे बनलेले होते. इतक्या मोठ्या स्तरावर झालेल्या एकजुटीमुळे सरकार आणि कंपन्यांचे मालक प्रचंड चिडलेले होते आणि शेवटी त्यांनी त्या कायद्याचा वापर करण्याचा निर्णय घेतला जो कामगारांचा संपाचा अधिकार हिरावून घेतो आणि त्यांना कंपन्यांमध्ये जाण्यास मजबूर करतो. परंतु असे असूनही सी.जी.टी. युनियन दटून राहिली आणि कोणत्याही कायद्याच्या अडचणींशी कोर्टात सामना करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

> **भांडवली सरकारांसाठी कामगारांचे रक्त पित जात नफ्याचे महाल उभे करणे म्हणजेच शिस्त आहे आणि कामगारांनी या विरोधात आवाज उठवणे म्हणजे अराजकता**

यानंतर फ्रांसच्या वाहतूक, आरोग्य, शिक्षण इत्यादी व्यवसायांमध्ये असलेले कामगार, विविध उद्योगांच्या कामगारांनी सुरू केलेल्या दीर्घ संपाच्या समर्थनात आणि एका चांगल्या जीवनासाठी संघर्ष करत रस्त्यांवर उतरले आणि संपांमध्ये सामील झाले. रशिया-युक्रेन युद्ध आणि त्याअगोदर करोना साथीच्या काळात सतत लागू केल्या गेलेल्या भांडवलधार्जिण्या धोरणांमुळेच आज फ्रांसची जनता अन्नधान्याच्या किमतीत 8 टक्के, प्रवासात 15 टक्के, वीजेमध्ये 22 टक्के महागाईचा सामना करत आहे, आणि सतत वाईट होत जाणाऱ्या जीवनस्थितीचा सामना करत आहे. पण असे असतानाही भांडवलदारांच्या नफ्यामध्ये कोणतीही कमी आलेली नाही, उलट त्यांचा नफा अजूनच वाढलाय, ज्यामुळे लोकांमध्ये प्रचंड राग आहे. त्याचवेळी मॅक्रोन सरकार निर्लज्जपणे कामगार विरोधी धोरणे लागू करत आहे आणि जनतेचे उरले-सुरले अधिकार हिसकावून घेत आहे.

फ्रांसच्या जनतेची एकजूट आणि त्यांच्या संघर्षाला आपण भारतातील कामगारांनी सलाम केला पाहिजे आणि त्यांच्याकडून शिकवण घेतली पाहिजे कारण ते जास्त चांगल्या जीवनासाठी भांडवलदारांविरोधात आणि त्यांच्या सरकार विरोधात लढत आहेत. उद्योगक्षेत्र निहाय झुंझार युनियन्सचे महत्त्व, ट्रेड युनियन्स मध्ये राजकीय शिक्षण-प्रशिक्षण, आणि भारतीय परिस्थितींनुसार इतर गरजांना आज पूर्ण करण्याची पहिल्यापेक्षा जास्त गरज आहे. भारतात तर स्थिती इतकी बिकट आहे की वरच्या 15 टक्के लोकांना सोडले तर महागाई, बेरोजगारी, डबघाईला आलेली आरोग्य व शिक्षणव्यवस्था यांच्या तडाख्यातून कोणीच सुटलेले नाही आणि तरीही कामगारांनी नजिकच्या काळात लढलेले झुंझार संघर्ष हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच आहेत. अशावेळी गरज आहे अशा क्रांतिकारी युनियन्स उभ्या करण्याची ज्या येणाऱ्या काळात दीर्घ संघर्ष करण्यासाठी तयार राहतील. आपण हे मनावर आता कोरले पाहिजे की ही स्थिती सुधारणार नाही, आणि जर आपल्याला स्वत:चे आणि आपल्या मुलाबाळांचे चांगले भविष्य बघायचे असेल तर मिळून एक दीर्घ लढाई लढावीच लागेल.

(अनुवादित. मूळ लेख मज़दूर बिगुल, नोव्हेंबर 2022 मध्ये प्रकाशित)

# दिल्ली दंगलींवर सेवानिवृत्त जजेसचा अहवाल: संघी षडयंत्र पुन्हा उघड!

पान 5 वरून

कारवाई का झाली नाही, हा प्रश्न उपस्थित होतोच. समितीच्या म्हणण्यानुसार पोलिसांचा हा तर्क देखील हास्यास्पद आहे की सी.ए.ए. विरोधात प्रदर्शन करणाऱ्यांनी कट रचून दंगली भडकवण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम समुदायावर झालेली मोठ्या प्रमाणावरील हिंसा आणि झालेले नुकसानच वरील तर्काला खारीज करते.

पोलिसांनी त्यांच्यावर लावले गेलेले आरोप विविध तर्क देऊन खारीज केले, परंतु ते तर्क न्यायसंगत नाहीत, त्यावर विश्वास ठेवला जाऊ शकत नाही असे अहवालात म्हटले आहे. 36 तासात दंगल नियंत्रणात आणल्याबाबत गृहमंत्री अमित शहांनी दिल्ली पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले, या मुद्यावरून केंद्र सरकारवर समितीने टीका केली आहे.

### अनेक अहवाल सादर. परंतु सरकार गप्पच

फेब्रुवारी 2020 मध्ये दिल्लीत झालेल्या सांप्रदायिक हिंसांच्या तपासासाठी आतापर्यंत अनेक अहवाल सादर झाले. अन्सर्टन जस्टिस नावाचा अहवाल स्वतंत्रपणे बनवून सादर केला असला तरी त्यात नोंदवली गेलेली मते ही सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशांची असल्यामुळे ह्या अहवालाचे वजन बनले. अस्तित्वात असलेल्या सरकारांकडून अहवालानुसार कुठलीही कारवाई होण्याची अपेक्षा नाही, (कारण सत्तेचे चाबूक हातात असताना आपल्याकडे दाखवलेले बोट कसे वळवायचे हे फारसे कठीण काम राहत नाही.) परंतु भविष्यात झालेल्या हिंसेविषयी योग्य शहानिशा करायची असल्यास हा निपक्षपाती अहवाल नक्कीच मदतीचा ठरेल.

अशा अहवालांना न्यायालयासमोर काही महत्त्व नसते, परंतु असे अहवाल राज्यव्यवस्थेचे फॅसिस्टीकरण नक्कीच समोर आणत आहेत. परंतु फॅसिझम विरोधातील लढाई फक्त अशाप्रकारे सत्य उघडे करून पुरी होऊ शकत नाही. धर्माच्या नावावर फूट पाडणाऱ्या, राजकारण करणाऱ्या फॅसिस्टांना हटवण्यासाठी जमिनीवर उतरून त्यांच्याविरोधात संघर्ष करणे काळाची गरज आहे. हिंसा भडकावणारे राजकारणी सुटून जातात परंतु हिंसेच्या आगीत सर्वात जास्त भरडला जातो तो देशातला कामगार कष्टकरी. फॅसिस्ट हिंसा आणि द्वेष भडकावतात, तेच मूळात कामगार वर्गाला विभागण्यासाठी आणि भांडवलदार वर्गाच्या विरोधातील जनतेच्या रागाला दुसरीकडे भरकटवण्यासाठी. फॅसिस्ट तथ्य आणि तर्कांने नव्हे तर उन्मादाने जनतेला भरकटवतात. फॅसिस्टांचा निम्न-भांडवलदार वर्गामध्ये एक सामाजिक आधार असतो. फॅसिस्ट शक्ती प्रमुख राजकीय शक्ती म्हणून तेव्हाच पुढे येतात जेव्हा त्या भांडवलदार वर्गाचे आर्थिक समर्थन प्रामुख्याने स्वत:कडे वळवण्यात यशस्वी होतात. तेव्हा फॅसिझम विरोधातील लढाई लढण्यासाठी आवश्यक आहे की भांडवलदार वर्गाच्या विरोधातील कामगार वर्गाची एकजूट आणि संघर्ष संघटित केला जावा.

# दिल्ली दंगलींवर सेवानिवृत्त जजेसचा अहवाल: संघी षडयंत्र पुन्हा उघड!

**अश्विनी**

फेब्रुवारी 2020 मध्ये उत्तर पूर्व दिल्लीत झालेल्या सांप्रदायिक दंगलींवर भारताचे पूर्व गृह सचिव आणि 4 पूर्व न्यायाधीशांच्या समितीने मिळून नुकताच एक अहवाल सादर केला आहे. केंद्र आणि राज्य सरकारमध्ये पूर्वी काम केलेल्या नोकरशाहांच्या एका समूहाने जिचे कन्स्टिट्यूशनल कंडक्ट ग्रुप असे नाव होते, दिल्लीतील झालेल्या दंगलींची स्वतंत्र आणि निपक्षपणे पडताळणी करण्यासाठी ऑक्टोबर 2020 मध्ये ही समिती निवडून दिली. समितीने सादर केलेल्या अहवालात दिल्लीत झालेल्या दंगलींसाठी केंद्र सरकार, दिल्ली सरकार, दिल्ली पोलिसांसहित मीडियाने काय भूमिका निभावली, ह्यावर कडक ताशेरे ओढले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश मदन लोकूर ह्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने 'अनसर्टेन जस्टिस: ए सिटिज़ेन्स कमेटी रिपोर्ट ऑन द नॉर्थ ईस्ट डेल्ही वॉयलेंस 2020' (Uncertain Justice: A Citizens Committee Report on the North East Delhi Violence 2020) नावाने अहवाल सादर केला. 171 पानांच्या अहवालाचे 3 भागात वर्गीकरण केल्याचे आढळते. अहवालात मांडलेला मजकूर थोडक्यात जाणून घेऊयात.

अहवालाच्या पहिल्या भागात मांडल्यानुसार 23 फेब्रुवारी 2020 ला दंगलींना सुरुवात झाली. ह्याची पूर्वतयारी डिसेंबर 2019 पासूनच चालू झाली होती. सांप्रदायिक हिंसा भडकवण्याचे काम विविध राजकीय पक्षांकडून पूर्वीच चालू केले होते. यामागील पार्श्वभूमी ही आहे की डिसेंबर 2019 मध्ये पारित झालेल्या नागरिकता संशोधन कायद्यामुळे (सी.ए.ए.) मुस्लिम समाजात भीती पसरली होती की त्यांची नागरिकता सुरक्षित नाही. खरेतर कामगार-कष्टकरी वर्गाच्या विरोधात असलेल्या एन.पी.आर. मुळे सर्वधर्मीय कामगार-कष्टकऱ्यांच्या नागरिकत्वाला धोका होता, परंतु अनेक अ-धर्मनिरपेक्ष शक्तींनी याला मुस्लिमविरोधी कायद्याचे रूप दिले. देशभरात सी.ए.ए. कायद्याविरोधात आंदोलन उभे राहिले. दिल्लीत देखील शाहिनबाग, उत्तर पूर्व दिल्ली हे आंदोलनाचे केंद्र स्थान बनले होते.

ह्याच काळात दिल्लीत विधानसभा निवडणूका घोषित झाल्या. निवडणूक सभांमधून भाजपने सी.ए.ए.ए विरोधात आंदोलन हा मुख्य मुद्दा बनवला आणि आंदोलन करणाऱ्यांना दंगेखोर, देशद्रोही जाहीर करून टाकले. मुळातच विविध राजकिय उहापोहांमधून मुस्लिम समुदाय पूर्वग्रह दूषित होताच, ह्या आंदोलनाचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणावर मुस्लिम विरोधी हिंदू हिंसा भडकावली गेली, कपिल मिश्रा, अनुराग ठाकूर सारख्या राजकीय नेत्यांकडून आंदोलनकर्त्यांना 'देशद्रोही' म्हणण्यासोबतच 'गोली मारो सालो को' असे नारेही देण्यात आले. अहवालानुसार, उघडपणे सांप्रदायिक हिंसा भडकवणाऱ्या अशा राजकीय नेत्यांविरोधात कुठल्याही सरकारकडून अथवा सुरक्षा यंत्रणेकडून कुठलीही कारवाई करण्यात आली नाही हा आरोप केंदातील भाजप सरकार, दिल्लीतील आप पक्षाचे राज्य सरकार आणि पोलीस यंत्रणेवर लावला गेला.

## दिल्ली पोलिसांकडून हिंसा

23 फेब्रुवारीला झालेल्या दंगलीत एकूण 53 नागरिक, ज्यात 40 मुस्लिम तर 13 हिंदू सामील होते, मारले गेले, प्रचंड प्रमाणात जाळपोळ झाली, दुकाने, घरे जाळली गेली. मुस्लिमांच्या घरांचं, दुकानांच मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. दंगलीच्यावेळी हिंसा पसरविणारी भाषणं केली गेली. 23 नंतर 24, 25 फेब्रुवारीला देखील वातावरण तापलेलेच होते. ह्या संपूर्ण हिंसाचारात दिल्ली पोलिसांना जास्त फौज उभी करून दंगली थांबवणे सहज शक्य होते जे एप्रिल 2022 च्या जहांगिरपुरी हिंसाचारात त्यांनी केले, रातोरात 1500 पोलिसांची फौज उभी करून दंगली आटोक्यात आणल्या. समितीने हे निदर्शनास आणून दिले की फेब्रुवारी 2020 आणि एप्रिल 2022, दोन्ही हिंसाचारात दिल्ली पोलिसांची वर्तणूक वेगवेगळ्या भूमिका दर्शवणारी होती. अहवालात दिल्ली पोलिस दंगल थांबवण्यात का कमी पडले, या प्रश्नाचे उत्तर 2 वर्ष उलटून देखील पोलीस यंत्रणा देऊ शकली नाही याबाबतदेखील प्रश्न उपस्थित केले आहेत. दंगलीदरम्यान कित्येक ठिकाणी हे दृश्य देखील पाहायला मिळाले की दंगल रोखण्यात पोलिसांनी पुढाकार तर घेतला नाहीच वरून मुस्लिमांवर हल्ले होत असताना पोलिस असे हल्ले करण्यामध्ये सामील झाले.

**दंगल रोखण्यात पोलिसांनी पुढाकार तर घेतला नाहीच वरून मुस्लिमांवर हल्ले होत असताना पोलिस असे हल्ले करण्यामध्ये सामील झाले.**

**केंद्राने देखील देशाच्या राजधानीच्या ठिकाणी होत असणारी हिंसा थांबवण्यासाठी कुठल्याही जबाबदारीने पाऊल उचलले नाही अशी टिपणी अहवालात मांडली आहे.**

समितीने दंगलीतील दिल्ली पोलिसी भूमिकेची स्वतंत्र रित्या पडताळणी करण्यासाठी कोर्टाच्या निगराणीत स्वतंत्र समिती स्थापन करण्याची मागणी केली आहे.

## मीडियाद्वारे पसरवली गेलेली सांप्रदायिकता

दंगलीच्या काही दिवसापूर्वी पासूनच भडकलेली सांप्रदायिक हिंसा हिंदू मुस्लिम भेद वाढवत होतीच. मीडियाने त्या आगीत तेल ओतण्याचे काम केले. सी.ए.ए. विरोधात झालेल्या प्रदर्शनांना बदनाम करण्याचे काम पुरेपूर मीडियाने केलेच. समितीने डिसेंबर 2019 ते फेब्रुवारी 2020 च्या कालावधीत मुख्य वृत्तवाहिन्यांवर प्रसारित केलेल्या बातम्यांचे परिक्षण केले. विविध वाहिन्यांवरून सुमारे 500 तासाच्या फुटेजचा अभ्यास समितीने केला. त्यातून निघालेल्या विश्लेषणात दिसून आले की टाइम्स नाऊ, रिपब्लिक टीव्ही, आज तक, झी न्यूज, इंडिया टीव्ही, रिपब्लिक भारत ह्या वाहिन्यांवरून सतत मुस्लिमविरोधी द्वेष पसरवण्याचे काम झाले. सी.ए.ए. बद्दल कुठलीही माहिती देताना ह्या वाहिन्यांनी हिंदू विरोधात मुस्लिम अशा आशयाने बातम्या प्रसारित केल्या. सी.ए.ए. विरोधातील आंदोलने, दंगली याबाबत कुठलेही वृत्तांकन करताना मुस्लिमविरोधी असलेल्या पुर्वाग्रहातूनच वृत्तांकन केले गेले. आणि त्यातून धार्मिक द्वेष वाढवण्याचे काम नियोजित पद्धतीने झाले.

## दंगली न रोखण्यात केंद्र सरकारची भूमिका

समितीने केंद्रीय गृहमंत्रालयावर देखील टीका केली आहे. पोलिस दलासोबतच निम्न लष्करी दल संपूर्ण केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत येत असून दंगली रोखण्यात केंद्र देखील निकामी ठरले. 23 फेब्रुवारीला दंगलीचा भडका उडाल्यानंतर 24,25 तारखेला केंद्राकडून दंगली थांबल्या आहेत असे खोटे आश्वासन देण्यात आले परंतु जमिनीवर हिंसा मात्र चालूच होती. तेव्हा केंद्राने देखील देशाच्या राजधानीच्या ठिकाणी होत असणारी हिंसा थांबवण्यासाठी कुठल्याही जबाबदारीने पाऊल उचलले नाही अशी टिपणी अहवालात मांडली आहे.

## दिल्लीतील 'आप' सरकारचे अपयश

23 फेब्रुवारीच्या अगोदर पासूनच हिंसा पेटण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत होती, तरीदेखील केजरीवाल सरकारने ते रोखण्यासाठी कुठल्याही प्रकारची मध्यस्थी केली नाही. हिंसेच्या काही दिवस अगोदरच केजरीवाल सरकार सत्तेवर जिंकून आले होते. थोड्याच कालावधीत झालेल्या दंगलीत त्यांनी कुठल्याही रीतीने सतर्कता दर्शवली नाही की दंगलीत बेघर झालेल्यांना निवारा, तात्पुरती मदत पुरवण्यात देखील राज्य सरकारची कमतरता दिसून आली. आप सरकारच्या ह्या भूमिकेवर समितीने कठोर टीका केली आहे. आमदार सौरभ भारद्वाज यांना दंगलीबाबत पक्षाच्या भूमिकेची विचारणा केली असता कुठलाही अभिप्राय मिळाला नाही.

## पोलिसी दमन आणि युएपीएचा वापर

दंगली झाल्यानंतर दिल्लीच्या विविध पोलिस ठाण्यात 750 पेक्षा जास्त केसेस नोंदवल्या गेल्या आहेत. पोलिसांनी जवळपास 1700 आरोपींना ताब्यात देखील घेतले आहे. फारसा तपास न करता जनतेवर, सामाजिक कार्यकर्त्यांवर युएपीए सारखे कायदे लावून गजाआड केले आहे. समितीच्या अहवालानुसार त्यांचा असा कुठलाही गुन्हा नव्हता किंवा कोणतीही दहशतवादी माहिती नव्हती ज्यामुळे युएपीए कायदा लागू होईल. पडताळणी न करता कायदा लादून ह्या कायद्यांचा गैरवापर केला जात आहे. समितीनुसार, अगोदरच संशय आणि पूर्वग्रह असलेल्या काही कार्यकर्त्यांना जाणून बुजून पोलिसांनी लक्ष्य बनवून त्यांच्यावर युएपीए लादले. युएपीए केस लागल्यावर जामीन मिळणे कठीण होऊन जाते आणि गुन्हा सिद्ध होवो अथवा न होवो, दीर्घ काळासाठी आरोपीला गजाआड ठेवण्याची मुभा पोलिसांना मिळते.



युएपीए आणि आयपीसी कायदे कुठे कशाप्रकारे वापरले गेले, ह्याचे देखील अध्ययन समिती तर्फे केले गेले. समितीने म्हटले की पोलिसांनी भडकाऊ भाषणे (हेट स्पीच) देणाऱ्यांचा तपास केला नाही की त्यांच्यावर कुठल्या केसेस लावल्या नाहीत. दिल्ली पोलिसांच्या एकूण भूमिकेवर न्यायालयाने देखील टीका केली आहे. पोलिसांनी केलेल्या तपासात म्हटले आहे की दिल्लीतील सांप्रदायिक दंगली हा सुनियोजित कट होता. ह्यावर समितीने मांडले की हे आरोप देखील घटनेनंतरच्या तपासातून येते, सुनियोजित असणं जर माहित होतं तर कुठलीही कठोर

पान 4 वर

# “भारत जोडो यात्रा”: कामगार वर्गाचे हित भांडवलदारांशी जोडणारी यात्रा!

पान 1 वरून

जीवनात काय फरक आणणार आहे? **ज्या आशेने अनेक लोक यात्रेत सहभागी होत आहेत, ती आशा काय आहे आणि ती काँग्रेसच्या नेतृत्वात किती खरी होऊ शकते?**

या यात्रेत सहभागे होणारे कोण आहेत? भाजपशी, संघाशी, त्यांच्या विचारधारेशी लढण्याकरिता (**लक्षात घ्या की राहुल गांधी फॅसिझम हा शब्दप्रयोग करत नाहीयेत!**) म्हणून ही यात्रा निघाली आहे, “तिरस्कारा”ला “प्रेमा”ने उत्तर देण्याकरिता ही यात्रा आहे, असे म्हटले गेले आहे. अशामध्ये या यात्रेच्या प्रभावाने किती संघी-भाजपाई लोकांना याची जाणीव निर्माण होत आहे की आम्ही तिरस्कार, द्वेष पसरवत होतो, आणि त्यांपैकी किती लोक आपल्या पक्षाच्या विरोधात यात्रेला पाठिंबा देते झाले आहेत? देशामध्ये भाजप-संघाचा समर्थक मतदार 30 टक्क्यांच्या आसपास असल्याचे अंदाज अनेकदा समोर आलेत. अशामध्ये जर “ते” लोक सामील होणार नसतील तर सर्व लोकांची “एकता” होणार नाहीये, आणि मग तिरस्काराला कसे संपवले जाणार आहे? तिरस्कार करणारे आणि पसरवणारे जर या यात्रेत येतच नाहीयेत, तर “तिरस्कार” करू नका म्हणून तिरस्कार संपेल कसा?

या यात्रेत सहभागी होणारे लोक आहेत या देशातील उदारवादी, सामाजिक-लोकशाहीवादी (म्हणजे भांडवलाची सेवा करणारे “समाजवादी”) ज्यांना भाजप-संघाचा जाच होत आहे. या लोकांनी केलेल्या प्रचारापायी अनेक शेतकरी, कामगार, बेरोजगार युवक, संवेदनशील नागरिक सुद्धा यात्रेकडे आशेने बघत आहेत. भाजप-संघाचा हैदोस देशात चालला असताना त्याला वैतागलेला जनतेचा एक समुदाय “दिसणारा पर्याय” मजबूत करण्याकरिता यात्रेमध्ये जात आहेत. थोडक्यात ते लोक यात्रेत जात आहेत, जे अगोदरच भाजप-संघाशी असहमत होते. अशा लोकांनी हा प्रश्न नक्कीच विचारला पाहिजे की काँग्रेस खरोखर फॅसिझमशी लढू शकते का?

## सर्वधर्मसमभाव फॅसिझमशी का लढू शकत नाही?

काँग्रेसचा सर्वधर्मसमभाव आणि भाजपचे हिंदुत्ववादी धार्मिक धृवीकरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे अनेकांना ध्यानात येत नाही. **धर्म आणि राजकारणाची पूर्ण फारकत करणारी धर्मनिरपेक्षता काँग्रेसची विचारधारा कधीच नव्हती.** सर्व धर्मांना “समान” वागवणारा सर्वधर्मसमभाव हाच काँग्रेसप्रणित ‘भारताची कल्पना’ (आयडिया ऑफ इंडिया)चा हिस्सा होता आणि आहे. याचे मूळ काँग्रेसच्या वर्गचरित्रामध्ये आहे.

स्वातंत्र्य लढ्यादरम्यान काँग्रेस हा देशातील भांडवलदार वर्गाचा प्रमुख प्रतिनिधी पक्ष म्हणून पुढे आला. ब्रिटीश सत्तेविरोधात लढण्यासाठी देशातील भांडवलदार वर्गाला राजकीय बळ एकवटणे आवश्यक होते. भांडवलदारांच्या मोठ्या हिश्श्याला याची जाणीव होती की हिंदू-मुस्लिम आणि सर्व जात-समुदायांचा पाठिंबा असल्याशिवाय ते शक्य नाही. परंतु 1917 च्या रशियन राज्यक्रांतीनंतर कामगार-कष्टकरी-शेतकरी वर्गाच्या एकजुटीची या वर्गाला भिती सुद्धा वाटत होती. भारतातील जमिनदार वर्गाचे प्रामुख्याने प्रतिनिधित्व करणाऱ्या हिंदु महासभा, मुस्लिम लिग सारख्या संघटनांसोबत त्यामुळेच काँग्रेसचे मतभेद होते, परंतु जनतेच्या शक्तीला घाबरत जमिनदारी विरोधात क्रांतिकारी लढा उभारण्याचा मार्ग न स्विकारल्यामुळे, या संघटनांविरोधात आणि त्यांच्या धर्मवादी विचारांविरोधात क्रांतिकारी लढा न उभारण्याचे धोरण काँग्रेसने स्विकारले. गांधींचा स्वप्नाळू भांडवली मानवतावाद जमिनदारीच्या विरोधात क्रांतिकारी संघर्षाच्या विरोधात होता, आणि म्हणूनच भांडवलदार वर्गाला आकर्षक वाटत होता. या विचारधारेचाच परिणाम होता सर्वधर्मसमभावाचे राजकारण, ज्यामध्ये जमेल तसे सर्वच धर्मांचे तुष्टीकरण करावे हीच कार्यनिती निघत होती. गांधींचे खिलाफत चळवळीला समर्थन असो, कम्युनल अवार्ड सोबत केलेली तडजोड असो, वा सनातन धर्माचे समर्थन असो, याच राजकारणाचे निदर्शक होते! धार्मिक, जातीयवादी विचारांचा मोठा पगडा असलेल्या देशात मोठ्या संख्येने लोकांना राजकीय आंदोलनात उतरवण्यासाठी भांडवलदार वर्गाच्या मोठ्या हिश्श्याला त्यामुळेच काँग्रेस हाच सर्वात योग्य पर्याय वाटत होता.

आज याच भांडवलदार वर्गाला भाजप हा सर्वात योग्य पर्याय वाटत आहे. कारण देशांतर्गत जमिनदारी व्यवस्था (जर्मनीत झाले त्याप्रमाणे प्रशियन मार्गाने) संपली आहे, भांडवलाचे नागडे राज्य चालू आहे, खाउजा धोरणांचा जमाना आहे, आर्थिक संकट तीव्र झाले आहे, बेरोजगारी-महागाई-गरिबी विक्रम करत आहे आणि अशावेळी कामगार वर्गाच्या असंतोषाला भरकटवायला धार्मिक उन्माद भडकावणारे पक्षच जास्त कामाचे आहेत.

**काँग्रेसच्या भांडवली आणि “सर्वधर्मसमभावी” राजकारणाचा परिणाम आहे की देशात धर्मवादी राजकारण रुजले आहे.** सर्वधर्मसमभावाच्या नावाने काँग्रेसने हिंदू-मुस्लिम व इतर धर्मियांच्या तुष्टीकरणाचेच राजकारण केले. हे तुष्टीकरण कधीही “समान” तर होऊच शकत नाही. यातूनच ती जमिन मजबूत होत गेली, जिने भाजपच्या हिंदुत्ववादी प्रचाराला आधार दिला. अत्यंत सावधानी बाळगत काही कमजोर प्रगतीशील कायदे बनवत असताना काँग्रेसने हिंदू कोड बिल, शहाबानो खटला, राम मंदिराचे दरवाजे उघडणे, राम मंदिर आंदोलन होऊ देणे, संघ आणि संघप्रणित संघटनांना खुले रान देणे, मुस्लिम कट्टरपंथी संघटनांसोबत युत्या करणे, सावरकरांबद्दल दुतोंडी भुमिका घेणे, धार्मिक शिक्षण चालू देणे, धार्मिक यात्रांना घडवणे, अशा अनेक पावलांनी ती वैचारिक जमिन तयार ठेवली जिच्यामध्ये हिंदूंवर “अन्याय” होतो अशी हाकाटी देणे शक्य होते. परंतु याहीपेक्षा महत्त्वाचे आहे की काँग्रेसने भांडवली व्यवस्थेचा रथ हाकत, खाउजा धोरणे लागू करून जी अपरंपार दैन्यावस्था देशातील कोट्यवधी जनतेवर थोपवली, बेरोजगारी, महागाई, खाजगीकरण, गरिबी, असुरक्षिततेसारख्या समस्यांना जनतेवर लादले, त्याच्या प्रतिक्रियेलाच चुकीचे वळण देण्यात भाजप यशस्वी झाला आहे. जनतेच्या असंतोषाला नकली शत्रूकडे वळवण्यात भाजप-संघाला आलेले यश मूळात या असंतोषामुळे होते हे विसरता कामा नये! संघ परिवाराचा विद्वेषाच्या राजकारणाचा महामेरू उधळत असताना आजवर काँग्रेसने पक्ष म्हणून त्यासमोर कधीही कोणतेही गंभीर वैचारिक आव्हान उभे केलेले नाही, आणि त्याच्या भांडवलदार वर्गाप्रति निष्ठेमुळे तो तसे कधी करूही शकत नाही!

आज काँग्रेसचे अस्तित्व भांडवलदार वर्गासाठी तरीही गरजेचे आहे, कारण जनतेच्या रोषाला भांडवलशाहीपासून, शोषणापासून दुसरीकडे वळवायचे असेल, गैर-वर्गीय मुद्यांवरच राजकारण तापवायचे असेल तर भाजपच्या धर्मवादी फॅसिस्ट राजकारणाला पर्याय म्हणून सर्वधर्मसमभावाचा पर्याय जिवंत ठेवणे गरजेचे आहे.

## खर्च कोण करत आहे?

“खर्च” कोण करत आहे, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये अनेक खरी मर्म लपलेली असतात. भारत जोडो यात्रा ज्या पद्धतीने चालू आहे, तिचे नियोजन आणि खर्च स्पष्टपणे दाखवतात की ही जनतेच्या चळवळीच्या रूपात आयोजित यात्रा नाही तर कॉर्पोरेट पद्धतीने निघालेली यात्रा आहे.

यात्रेकरिता खर्च किती होत आहे? या यात्रेमध्ये सामील असलेल्या 250 यात्रेकरूंसाठी 2 एकर जागेवर राहण्याची सोय केली जाते. याकरिता लागणारे तंबू, कंटेनर, वाहने, फ्लेक्स बॅनर्स, झेंडे, वीजेची सोय, सांडपाण्याची सोय, पाण्याची सोय, पुस्तके-पत्रके वाटण्याचा खर्च, वगैरे सर्व फक्त एका जागी केले जात नाही, तर पूर्णपणे वाहून नेले जाते. रोज एका नव्या जागी गाव बसवले जाते. राहुल गांधींसाठी व्हॅनिटी व्हॅनची सोय आहे, जिच्यामध्ये टॉयलेट, बाथरूम, किचन, एसी, फ्रीज, एलसीडी, सोफा, सारख्या सर्व सोयी आहेत. रोज 2000 यात्रेकरू लोकांचे जेवण बनवायला 6 टीम आहेत. याकरिता 60 कंटेनरपासून बनवलेल्या मोबाईल खोल्यांचा पूर्ण ताफा तयार केला गेला आहे. यांमध्ये रोज 300 लोकांची राहण्याची सोय आहे. कंटेनर्समध्ये सुद्धा “वर्ग”वारी आहे. 2-4 लोकांसाठीचे स्वतंत्र शौचालय असलेले कंटेनर आहेत आणि 12 लोकांना फक्त झोपता येईल आणि शौचालय सार्वजनिक वापरावे लागेल अशीही सोय आहे. जेवण बनवण्यापासून ते इस्तरी करण्यापर्यंत सर्व सोय आहे. एकूण 100 पेक्षा जास्त पूर्णवेळ व्यावसायिक लोक या “इव्हेंट” चे “मॅनेजमेंट” करण्यासाठी लागलेले आहेत. यात्रेचे पूर्णवेळ शूटींग करण्यासाठी ड्रोन्स पासून ते अत्याधुनिक कॅमेरे वापरले जात आहेत. यात्रेचे रोज “प्रमोशन” करण्याकरिता “तीन बंदर” असे नाव असलेल्या एका व्यावसायिक टीमला कंत्राट दिले गेले आहे आणि सोशल मीडीयावर जे व्हिडियो, फोटो रोज टाकले जातात ते काम अशाप्रकारे पैसे मोजून करवले जात आहे.

फक्त 2000 लोकांचे रोजचे 1 वेळचे जेवण धरले, तरी 150 दिवसात, प्रत्येक दिवशी रु. 100 प्रमाणे 3 कोटी एकूण खर्च निघतो. तेव्हा संपूर्ण यात्रेकरिता लागणार शेकडो कोटींचा खर्च कोण करत आहे? कन्याकुमारी ते श्रीनगर प्रवासात, 150 दिवस करायचा हा **सर्व खर्च जनतेने स्वखुशीने दिलेल्या घामाच्या कमाईच्या पैशातून केला जातोय का? नक्कीच नाही! हा सर्व खर्च काँग्रेस पक्ष करत आहे, आणि त्याकरिता लागणारा निधी भांडवलदार वर्गाच्या एका हिश्श्यानेच दिलेला आहे.** स्पष्ट आहे की भांडवलदार वर्ग भांडवली लोकशाहीच्या तमाशामध्ये जनतेसमोर दिखाव्यासाठी लागणारा दुसरा पर्याय जिवंत ठेवू इच्छितो आणि त्याकरिताच या यात्रेला मोठ्या प्रमाणात फंडीग केले गेले आहे.

## नोकऱ्या मिळणार आहेत का?

“आम्ही नोकऱ्यांकरिता चालत आहोत” अशा घोषणा घेऊन चालणारे अनेक युवक यात्रेत दिसत आहेत. इतिहास विसरणे सोपे असते, आणि प्रचारातून निर्माण झालेल्या भ्रमाला बळी पडणे सुद्धा. 2014 च्या अगोदर काँग्रेसप्रणित यु.पी.ए. सरकारच्या काळात असलेल्या प्रचंड बेरोजगारीला वैतागूनच मोदींच्या “2 कोटी” रोजगारांच्या घोषणेला लोक भुलले होते. देश स्वतंत्र झाल्यापासून सतत बेरोजगारी राहिली आहे. खाउजा धोरणे जी खाजगीकरणाला पुढे नेतात, ती पुढे नेणार हे आजही राहुल गांधी सांगतात. अशामध्ये रोजगार कुठून येणार आहे?

बेरोजगारी भांडवलशाहीचे अपत्य आहे, आणि बेरोजगारांची फौज टिकणे ही भांडवलदारांची नेहमीच गरज असते. आपल्या उद्योगांना चालवण्यासाठी श्रमशक्तीचा स्वस्त पुरवठा तेव्हाच खात्रीपूर्वक होऊ शकतो, जेव्हा देशात बेरोजगारांची फौज असेल. शिवाय भांडवलशाही आज नफ्याच्या दराच्या घसरणीच्या संकटातून निर्माण झालेल्या आर्थिक अरिष्टामध्ये सापडली आहे. या दराला सावरण्याकरिता आवश्यक आहे की कामगार वर्गाचे अधिकाधिक शोषण केले जावे, जास्तीत जास्त काम कमीत कमी लोकांकडून करवले जावे, उद्योगांना कंत्राटीकरणाची मोकळीक दिली जावी, मजुरीचे दर कमी केले जावेत, इत्यादी. या **सर्व धोरणांना लागू करण्यात कोणतेही काँग्रेस सरकार आजही अजिबात मागे नाही आणि याबाबतीत काँग्रेसमध्ये आजही एकमत आहे.**

“छोट्या उद्योगांना चालना देऊन” रोजगार निर्माण करू असा प्रचार राहुल गांधी करत आहेत. एकीकडे प्रचंड भांडवल असलेल्या बलाढ्य कंपन्यांना मोकळे रान द्यायचे आणि दुसरीकडे छोट्या उद्योगांना त्यांच्याशी स्पर्धेत उतरवायचे, असे हे दुटप्पी धोरण. आणि “छोटे उद्योग” किती शोषण करतात हे प्रत्येक कामगार जाणतो! सरकारी नोकऱ्या काँग्रेसनेच संपवल्या आणि खाजगीकरण-कंत्राटीकरण लागू केले आणि आता मात्र सरकारी रोजगार देण्याची काँग्रेस वल्गना करत आहे. या सर्व थापेबाजीपासून देशातील युवकांनी सावध झाले पाहिजे!

जनतेला आकर्षित करण्यासाठी “शहरी रोजगार योजने”बद्दल राहुल गांधी बोलत आहेत, हा देशातील बेरोजगारी विरोधातील युवक आंदोलनाने, असंतोषाने निर्माण केलेल्या दबावाचा परिणाम आहे, ना की काँग्रेसच्या अंत:प्रेरणेचा. मनरेगा सारखी तोकडी योजना हा रोजगार अधिकार नाही, तर रोजगाराची मलमपट्टी आहे. तेव्हा खऱ्या अर्थाने पक्क्या, चांगल्या वेतनाच्या, मूलभूत अधिकार म्हणून रोजगाराच्या अधिकारासाठी आपला क्रांतिकारी संघर्ष पुढे नेणे, ना की काँग्रेसच्या थापांवर विश्वास ठेवणे, हाच युवकांचा कार्यभार बनतो.

पान 7 वर

# “भारत जोडो यात्रा”: कामगार वर्गाचे हित भांडवलदारांशी जोडणारी यात्रा!

पान 6 वरून

## काँग्रेस: आजही भांडवलदार वर्गाचा विश्वासू पक्ष आहेच!

काँग्रेसने लागू केलेल्या खाजगीकरण, उदारीकरण,जागतिकीकरणाच्या (खाउजा) धोरणांविरोधात आंदोलने करणारे, काँग्रेस सरकारांच्या काळात "पी.एम.सी.एम. कौन है, टाटा-अंबानी के दलाल है" अशा घोषणा देणारे लोक आज राहुल गांधींच्या यात्रेत मोठ्या संख्येने सामील होत आहेत. महाराष्ट्रातील तर झाडून सगळे सामाजिक-जनवादी, उदारवादी भारावून गेल्यासारखे यात्रेबद्दल बोलत आहेत. काँग्रेसपेक्षा "वाईट" पर्याय समोर आल्यावर आता या लबाड, ढोंगी उदारवादी लोकांना काँग्रेसचा पर्याय योग्य वाटू लागला आहे. म्हणूनच की काय "तिरस्कारा"च्या मुद्याला समोर करुन बाकी सर्व मुद्दे जणू काही गायब आहेत अशाप्रकारे या यात्रेचा प्रचार उदारवादी मंडळी करत आहेत.

**वस्तुस्थिती ही आहे की काँग्रेसने ना खाउजा धोरणांवर स्थिती बदलली आहे, ना भांडवलदारांची तळी उचलण्यावर.** शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यापारी यांचे नाव फक्त राहुल गांधी घेत आहे, परंतु ते तर मोदी-भाजप-संघ सुद्धा करतातच की? सत्तेवर आल्यावर काँग्रेस तीच धोरणे राबवणार आहे जी तिने 1991 पासून लागू केली आहेत. "अडानी-अंबानी" अशा "२-३" भांडवलदारांच्या हातात सर्व पैसा चालला आहे हा यात्रेमध्येच टाळ्या मिळवण्यासाठी राहुल गांधींनी चालवलेला प्रचार धादांत खोटारडेपणा आहे. वास्तवात बड्या भांडवलदारांपैकी टाटा, बिर्ला, मित्तल, अडानी, अंबानी, बजाज, फिरोदिया, दमानी, नाडर, जिंदल, हिंदुजा, संघवी, किर्लोस्कर, पूनावाला, कोटक, गोदरेज, प्रेमजी, इ. अनेक डॉलर "अब्जपती", प्रादेशिक उद्योगपती, अशा सर्वांचीच संपत्तीवाढ मोदींच्या काळात चालू आहे, आणि काँग्रेसच्या राजवटीतही होत होती! गौतम अडानी जरी जगातील तिसरा सर्वाधिक श्रीमंत व्यक्ती बनलेला असला, तरी देशातील अब्जाधिशांची एकूण संपत्ती 800 अब्ज डॉलर झाली आहे! यापैकी बहुतेक सर्वजण भाजपला जास्त निधी देत असले, तरी काँग्रेस त्यांचा लाडका आहेच! तेव्हा फक्त अडानी-अंबानीचे नाव घेऊन राहुल गांधी "बड्या भांडवलदारांना" विरोध करण्याचा कितीही आव आणत असले तरी हे सत्य लपलेले नाही की काँग्रेस हा आजही बड्या भांडवलदारांचा विश्वासू पक्ष आहे!

"तपस्वी" राहुल गांधी, "वो चल रहा हैं", "जहर निगल रहा हैं", "वो आया हैं इंकलाब लेकर" सारखी स्तुतीसुमने राहुल गांधींवर उधळली जात आहेत! राहुल कोणासाठी तपस्या करत आहेत, आणि कोणता "इंकलाब" घेऊन येणार आहेत? यात्रा सुरू असतानाच राजस्थानातील काँग्रेसचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी आयोजित केलेल्या गुंतवणूकीच्या कार्यक्रमात गौतम अडानी यांनी हजेरी लावली! यावर राहुल गांधींनी म्हटले की ते "कॉर्पोरेटच्या विरोधात नाहीत तर मक्तेदारीच्या विरोधात आहेत"! वास्तवात कॉर्पोरेट कंपन्या ह्याच मक्तेदारीच्या प्रवर्तक आहेत आणि राहुल गांधींनी चालवलेला हा शब्दछळ त्यांना मूर्ख म्हटले तरी लपू शकत नाही! राहुल गांधींनी शेवटी आपला "प्रामाणिकपणा" दाखवत म्हटलेच की "अडानींनी 60,000 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे आश्वासन दिले आहे आणि कोणताही मुख्यमंत्री ही ऑफर कशी नाकारू शकेल?" त्यांनी याची सुद्धा आठवण करून दिली की काँग्रेसनेच उदारवादी धोरणांची सुरुवात केली तर काँग्रेस उद्योगपतींच्या विरोधात कशी असेल? **थोडक्यात राहुल गांधी "दोन-तीन" कंपन्या श्रीमंत होण्यासाठी ढाळत असलेले अश्रू हे मगरीचे अश्रू आहेत!**





असेही "विद्वान" आहेत की जे राहुल गांधींना इतर काँग्रेसपेक्षा वेगळे करून बघा असे सांगत आहेत! आता राहुल गांधी हेच काँग्रेसचे "खरे" नेते आहेत हे शेंबडं पोरही सांगेल, तेव्हा हा मुद्दाच हास्यास्पद आहे. दुसरे म्हणजे, राहुल गांधी काँग्रेसचे मोठे नेते नसते, तरीही हा मुद्दा गैरलागूच असता. प्रत्येक पक्ष अशा व्यक्तींचा बनलेला असतो जे सर्व एखाद्या वर्गाच्या हितांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एकत्र येतात. त्यात बारीकसारिक मतभेद राहू शकतात, परंतु वर्गीय हितसंबंधांवर वाद असूच शकत नाही! त्यामुळे कोणताही व्यक्ति एखादी पक्षात असेल तर त्या पक्षाच्या विचारधारेवरूनच व्यक्तीचे मूल्यमापन होईल, ना की उलटे!

## फॅसिझमला निवडणुकांनी हरवता येणार नाही!

फॅसिझमला फक्त निवडणुकांपर्यंत मर्यादित करणे, आणि संघाच्या राजकारणाला फक्त हिंदुत्वापर्यंत मर्यादित करणे हा आज उदारवादी, समाजवाद्यांनी चालवलेला सर्वात भ्रामक खेळ आहे! या यात्रेनिमित्ताने सुद्धा सर्व गणिते केली जात आहेत ती शेवटी निवडणुकीतील बेरीज-वजाबाक्यांची.

फॅसिझम हे एक प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलन ("आंदोलन" शब्दाला अनेक जण सकारार्थी मानतात, परंतु सर्वच "आंदोलने" योग्य नसतात!) असते ज्याचा आधार भांडवलदार वर्ग, निम्न-भांडवलदार वर्ग, धनिक शेतकरी-कुलक वर्ग, लंपट सर्वहारा, उच्च-मध्यमवर्ग यांमध्ये असतो. फॅसिझम कॅडर आधारित संघटनांमार्फत, तळागाळात अनेक आघाड्यांमार्फत खोट्या शत्रूची, अंधराष्ट्रवादाची, धर्मजातीवादाची पेरणी करून व्यापक खोटा-प्रचार करणारी यंत्रणा राबवतो, आणि निवडणूका लढवणारा पक्ष हा त्याचा फक्त एक घटक असतो. फॅसिझम सैन्य-पोलिस-नोकरशाही पासून ते वर्तमानपत्रे, मीडीया चॅनेल्स आणि न्यायालयांपर्यंत सर्व यंत्रणांमध्ये आपली माणसे घुसवून काम करतो. फॅसिझमचा प्रमुख शत्रू नेहमीच कम्युनिस्ट असतात, आणि इतर समाजवादी, उदारवादी, लोकशाहीवादी यांनाही तो सोडत नाही. परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे फॅसिझम तो हिंस्त्र कुत्रा आहे ज्याची साखळी भांडवलदार वर्गाच्या हातात आहे, आणि आर्थिक संकटाच्या काळात ती साखळी ढिली केली जाते जेणेकरून कामगार-कष्टकरी वर्गाच्या आंदोलनाचे दमन करता येईल. **2013 पासून देशातील सर्व उद्योगपती, भांडवलदारांच्या निधीचा प्रचंड मोठा ओघ भाजपकडे वळलेला आहे आणि हे त्यांच्या सत्तेचे एक प्रमुख गुपित आहे.**

यामुळेच भाजपला निवडणुकीत हरवणे म्हणजे फॅसिझमला हरवणे नाही! संघपरिवाराचे जमिनीवर असलेले अस्तित्व, शक्ति, आणि भांडवलाचा त्यांना आज असलेला पाठिंबा, आणि या जाणीवेतून सर्व भांडवली पक्षांची त्यांच्या अस्तित्वाशी असलेली तडजोड, यामुळेच आज देशात गैर-भाजप शासित राज्यांमध्ये सुद्धा भाजपने घेतलेले कोणतेही निर्णय फिरवले गेलेले नाहीत! इतकेच काय तर आम्ही सुद्धा हिंदू कसे, आम्ही सुद्धा हिंदूंचे तारणहार कसे हे सिद्ध करण्याची चढाओढ या पक्षांमध्ये चालू दिसते. सर्वधर्मसमभावाच्या विचाराच्या चिंधड्या उडवायला अशाप्रकारे इतर कोणाची गरज लागत नाही! **त्यांचे भांडवली वर्गचरित्रच काँग्रेससहीत सर्व पक्षांना फॅसिस्ट शक्तींशी तडजोडीचे सहअस्तित्व टिकवण्यास भाग पाडते.**

## यात्रा कोणाला कोणाशी जोडेल?

त्यामुळे काँग्रेसने चालू केलेली "भारत जोडो" यात्रा ही सर्व जातधर्मातील सर्व लोकांना एकमेकांशी जोडण्यासाठी नाही , बेरोजगारी-गरिबी दूर करून, शोषण संपवून, देश जोडण्यासाठी नाही, कारण या सर्वांसाठीच जाती-अंताचा, कामगार-कष्टकऱ्यांच्या वर्ग एकतेचा, भांडवली व्यवस्थेला संपवणारा क्रांतिकारी लढा आवश्यक आहे! तर **ही यात्रा फॅसिझमची भिती दाखवत कामगार-कष्टकऱ्यांच्या हितांना त्यांचे शोषण करणाऱ्या त्यांच्याच जात-धर्मांतील भांडवलदार वर्गाच्या हितासोबत जोडलेले ठेवण्यासाठी, फॅसिझमचा आधारस्तंभ असलेल्या भांडवलदार वर्गाचा दुसरा पर्याय टिकवण्यासाठी आहे.**

सर्वधर्मसमभावाच्या नव्हे तर सत्ता आणि धर्म यांचा पूर्ण विच्छेद करणाऱ्या धर्मनिरपेक्षतेला साथ देऊन, "तिरस्कारा"विरोधात याचना करत नाही, तर फॅसिस्ट गुंडशक्तींना सडेतोड उत्तर देणाऱ्या क्रांतिकारी जनशक्तीच्या आधारावर, भांडवलदार वर्गासोबत नव्हे तर कामगार-कष्टकरी वर्गाच्या व्यापक वर्गयुतीने, उदारवादी भांडवली आर्थिक व्यवस्थेकरिता नव्हे तर सर्व उत्पादन साधनांवर जनतेची मालकी असणाऱ्या समाजवादी व्यवस्थेकरिता लढूनच फॅसिझमशी लढले जाऊ शकते. म्हणूनच कामगार वर्गाने उदारवादी-समाजवाद्यांच्या या भुलाव्याला न भुलता, आपला स्वतंत्र कामगार वर्गीय राजकीय पर्याय उभा केला पाहिजे जो फॅसिझमशी, जातीयवादी-ब्राह्मणवादी शक्तींशी, आणि या सर्वांना पोसणाऱ्या भांडवलदार वर्गाशी निर्णायक टक्कर घेऊ शकेल!

# नफ्याच्या हव्यासामुळे बिघडलेले हवामान

पान 8 वरून

असे आश्वासन देऊन ते आपल्याला फसवतात; पण सत्य हे आहे की श्रमशक्ती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे प्रचंड शोषणच भांडवली उत्पादन घडवते. या व्यवस्थेचे रक्षण करणे हेच प्रस्थापित राज्यसत्तांचे काम आहे, आणि म्हणूनच दिखावा सोडून ते काहीच करत नाहीत!

## कसे वाचेल पर्यावरण? कोण वाचवेल?

या देशातील कष्टकरी जनतेसाठी पुढे जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणीय विनाशाचे हे चक्र संपवण्यासाठी एकत्र येणे आणि भांडवलशाही सुधारण्यासारख्या निरर्थक विचारांचा त्याग करणे, कारण श्रीमंत लोक पृथ्वीवर घडवून आणलेल्या कहरामुळे तुलनेने अप्रभावितच राहतात! जर आपण भांडवलशाही संपवली आणि मानवी हितासाठी किंवा पर्यावरणाच्या संवर्धनात रस नसलेल्या लोभी परजीवी भांडवलदार वर्गाच्या इच्छेप्रमाणे जग न चालवता, मानवी गरजांसाठी नैसर्गिक संसाधनांचा वापर करणारे नवीन जग तयार केले, समाजवादाचे जग तयार केले, तर एक चांगले भविष्य आपली वाट पाहत आहे! भांडवलदारांनी पृथ्वीला आग लावली आहे, आता सत्ता हातात घेणे, ही आग विझवणे आणि जिथे पृथ्वी आणि तिचे सर्व रहिवासी सहजीवनात राहतात अशा चांगल्या भविष्यासाठी बीज पेरणे ही कामगार वर्गाची जबाबदारी आहे. पुढील पिढ्यांसाठी समाजाचा आणि पृथ्वीचा कायापालट करण्यासाठी आजच्या शोषक समाजात अस्तित्वात असलेले वर्गीय संबंध नष्ट करणे आणि शोषणविरहित समाज निर्माण करणे, हाच पर्यावरण वाचवण्याचा एकमेव मार्ग आहे! याकरिता लढ्यांना नेतृत्व देत, आपल्या पुढील पिढ्यांसाठी पृथ्वीला वाचवण्याची गंभीर जबाबदारी कामगार वर्गाच्याच खांद्यावर आहे!

# नफ्याच्या हव्यासामुळे बिघडलेले हवामान:
## कामगार-कष्टकऱ्यांचा घेतेय बळी!

✎ ललिता

गेल्या काही वर्षांपासून हवामानाच्या बदलत्या लहरी सर्वांच्या लक्षात येत आहेत! अवकाळी पाऊस, प्रचंड पाऊस, पूर-महापूर, दुष्काळ, वादळे, चक्रीवात, कुठे नद्यांच्या पाण्यात घट, कुठे बारमाही नद्या आटणे, कुठे जास्त थंडी, कुठे जास्त उन्हाळा हे सगळे आता हवामान खात्याने सांगायची गरज राहिलेली नाही, कारण ते तुम्हा आम्हा सर्वांच्या लक्षात येत आहे. याबद्दल एकतर भांडवली मीडिया गप्प आहे किंवा भ्रम पसरवत आहे. या सर्व बदलांचा सर्वात मोठा फटका बसत आहे तो कामगार कष्टकरी वर्गाला, आणि या बदलांचे खरे कारण आहे नफ्याची-बाजाराची व्यवस्था: भांडवलशाही. या बदलांची भीषणता, त्याचे होणारे परिणाम आणि याला भांडवलशाही कशी जबाबदार आहे ते समजणे आवश्यक आहे.

### भारतात व जगात हवामान बदलाचे परिणाम, आणि पुढील अंदाज

केवळ या वर्षीच, संपूर्ण भारतभर अत्यंत तीव्र हवामानाच्या अनेक घटना घडल्या. यांमध्ये उत्तरेकडील राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेच्या सुरुवातीपासून ते ईशान्येकडील राज्यांमध्ये अलिकडच्या वर्षांतील सर्वात भीषण पूर सामील आहेत. महाराष्ट्रातील मराठवाडा भागात अनेक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे; यामागे हा प्रदेश अधिक दुष्काळग्रस्त होणे सुद्धा एक कारण आहे. या वर्षी पावसाने 45 लाख शेतकऱ्यांची पिके नष्ट केली आहेत. जून 2022 मध्ये मराठवाड्यात 108 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, ज्यामागे शेतीची बिघडती स्थिती, आणि त्यामागे हवामान बदल हे सुद्धा एक महत्त्वाचे कारण आहे.

आपल्या मान्सून अहवालामध्ये भारतीय हवामान खात्याने 30 सप्टेंबर रोजी जाहीर केले की देशात सर्वसाधारण पाऊस झाला आहे, आणि सहा टक्के जास्त पाऊस पडला आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की काही दिवस जास्त पाऊस असूनही, एकूणच देशातील 27% भागात कमी पाऊस झाला आहे. अहवालाने असेही भाकीत केले आहे की मान्सूननंतरही पाऊस सुरूच राहील आणि हे खरे ठरले कारण भारताच्या हवामान खात्याने जाहीर केले आहे की ऑक्टोबरमध्ये भारतात सामान्यपेक्षा 47 टक्के जास्त पाऊस पडला आहे आणि "नोव्हेंबरमध्ये सामान्यपेक्षा 23% जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे".

हवामान बदलाचा भारताला आधीच मोठा फटका बसला आहे. देशभरातील विक्रमी प्रदूषण पातळीसह, हवामान बदलामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात आर्थिक आणि सामाजिक नुकसान होत आहे. अधिक अनिश्चित पावसाळा तांदूळ, कडधान्ये आणि गहू यासारखे मुख्य अन्न पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या लागवड आणि कापणी चक्रावर परिणाम करत आहे. या वर्षी अवकाळी पावसामुळे धान्याची भीषण तूट होऊ शकते, ज्यामुळे अन्नधान्याच्या किमती वाढू शकतात आणि कष्टकरी जनतेच्या दुःखात भर पडू शकते, असा अंदाज आहे. सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटच्या अहवालात असे नमूद केले आहे की 2022 च्या पहिल्या 9 महिन्यांत जवळजवळ दररोज एक नैसर्गिक संकट आले आहे. या संकटांमध्ये हिमाचल प्रदेशात मृत्यूची संख्या सर्वात जास्त होती, तर आसाममध्ये सर्वाधिक प्राण्यांच्या मृत्यूची नोंद झाली आहे आणि कर्नाटकात हवामान बदलामुळे देशातील प्रभावित पीक क्षेत्राचा सर्वात जास्त वाटा आहे. अनियमित पावसामुळे पक्षी आणि इतर स्थलांतरित प्राण्यांच्या स्थलांतरण पद्धतीतही व्यत्यय येतो, असे दिसून आले आहे.

नेचर कम्युनिकेशन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार भारत देश एकाच वेळी "दुष्काळाचे ठिकाण" तर आहेच, पण सोबतच 2050 पर्यंतपावसात 15-30% वाढ होण्याची शक्यता सुद्धा वर्तवली आहे आहे. याचा अर्थ आहे की देशात एकंदरीत पाऊस वाढणार आहे, पण देशातील अनेक ठिकाणी दुष्काळही वाढणार आहे. वर्षानुवर्षे देशात तापमानात वाढ, पूर, दुष्काळ, समुद्राच्या पातळीत वाढ, चक्रीवादळ आणि हवामानातील इतर बदल होत आहेत. 'डाउन टू अर्थ' नावाच्या नियतकालिकाने देशाचे तापमान 1.5 अंशांनी वाढल्यास पर्जन्यवृष्टीतील बदलांचे प्रमाण काढले आहे आणि अंदाज वर्तवला आहे की पावसाची वाढ असमानपणे वितरीत होण्याची शक्यता आहे. म्हणजे देशात सगळीकडे सारख्या प्रमाणात नाही, तर असमान पाऊस वाढेल. यामध्ये, वायव्य भारतात सर्वाधिक पर्जन्यवाढ अपेक्षित आहे.



> **बंगळुरूमध्ये दिसून आले की शहरातील पूरग्रस्त भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीय आणि श्रीमंत कुटुंबांनी बोटींची व्यवस्था करून स्वतःची सुटका केली; परंतु श्रमिक वर्गातील कुटुंबांमध्ये हाहाकार माजला**

### हवामान बदलाची शिक्षा भोगताहेत कामगार-कष्टकरी

भांडवलशाही निर्मित हवामान बदलामुळे स्थलांतरण पद्धती, प्राण्यांमध्ये अराजकता निर्माण झाली आहे आणि त्यामुळे साथीच्या रोगांची वारंवारता वाढू शकते. वेगवेगळ्या प्रजातींमध्ये आणि नंतर मानवांमध्ये विषाणूंचे संक्रमण अधिक आरोग्य सेवेचे संकट निर्माण करू शकते. वाढत्या पावसाने घरे उद्ध्वस्त केली आहेत; ज्यांनी प्रत्येक रुपया वाचवून कष्टाने घरे बांधली, त्या कष्टकरी जनतेची घरे वाहून गेली आहेत. या वर्षी बंगळुरूमध्ये दिसून आले की शहरातील पूरग्रस्त भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीय आणि श्रीमंत कुटुंबांनी बोटींची व्यवस्था करून स्वतःची सुटका केली; परंतु श्रमिक वर्गातील कुटुंबांमध्ये हाहाकार माजला कारण अनेक लोक अन्न, पाणी किंवा वीज नसताना त्यांच्या पूरग्रस्त घरात अडकले. कष्टकरी जनतेसमोर परिसरात पूर आल्यास "घरून काम करणे" किंवा कामातून विश्रांती घेण्याचा पर्याय नाही. पावसाळ्यात वीज खंडित झाल्यास वापरण्यासाठी कामगारांच्या घरात इन्व्हर्टर बसवलेले नाहीत! प्रचंड पाऊस असतानाही इतरांच्या घरांमध्ये घरकामगार म्हणून काम करण्यास जाण्यासाठी, झोमॅटो-स्विगी सारखे "गीग" काम करण्यासाठी, कारखाने-वर्कशॉप्स मध्ये जाण्यासाठी कामगारच पूरग्रस्त भागातून फिरत राहतात, कचऱ्यातून चालत राहतात, जीव धोक्यात घालतात आणि सर्दी, लेप्टोस्पायरोसिस, मलेरिया यांसारख्या अनेक संसर्ग आणि आजारांना बळी पडतात. शहरे ठप्प झालेली असताना सुद्धा कामगारांना मात्र त्यांच्या "डिल्हीवरी"च्या शोषणकारी कामावर जाण्यासाठी लांब पल्ल्याचे प्रवास करावे लागत आहेत!

शहरांचे मोठ्या प्रमाणात काँक्रिटीकरण होत आहे, आणि शहरांमध्ये तलाव साचत आहेत कारण पावसाचे पाणी जायला कोठेही जागा नाही. ते मातीत शोषले जात नाही आणि सांडपाण्याच्या व्यवस्था एवढ्या मोठ्या पावसाचे पाणी हाताळण्यासाठी सुसज्ज नाहीत कारण देशभरातील बहुतेक शहरे अनियोजित आणि अव्यवस्थित रीतीने वाढली आहेत आणि वाढत्या कचऱ्याने गुदमरत आहेत. या वाढत्या, अनिर्बंध शहरीकरणामागे कारण काय आहे? तर जास्त नफ्याच्या हव्यासापोटी बिल्डर लॉबी, उद्योजकांकडून केला गेलेला "अनिर्बंध" विकास ज्यामध्ये निसर्गाचा, जनतेच्या होऊ शकणाऱ्या हालापेष्टांचा विचारही केला जात नाही आणि मजल्यांवर मजले चढवले जातात, प्रत्येक उपलब्ध जागेत कोंबून घरे बांधली जातात, उपलब्ध सार्वजनिक सुविधांवर अतिताण आणला जातो कारण काही जागी किमती जास्त मिळू शकतात!

संकटे येतात तेव्हा सरकारकडून देण्यात येणारी मदत नेहमीच खूप उशिरा आणि अपुरीच मिळते. तात्कालिक मदतकार्य सुद्धा उशिराच पोहोचते आणि ज्या कुटुंबांचे सामान हरवले आहे आणि हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे अशा कुटुंबांना मदतीचा हात मिळत नाही.

### पर्यावरण संकटाला भांडवलशाही जबाबदार कशी?

वारंवार येणारे पूर, वाढता पाऊस, अवकाळी पाऊस आणि उष्णतेच्या लाटा या सर्वांचे मूळ आज आपला समाज ज्याप्रकारे आर्थिकदृष्ट्या चालत आहे, म्हणजेच भांडवली पद्धतीने चालत आहे, त्यात आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये उत्पादन फक्त नफ्यासाठी केले जाते. नफ्याची हव्यास एकीकडे अति-उत्पादन करवते पण ते सुद्धा लोकांची गरज भागवण्यासाठी नाही, तर विकून नफा कमावण्यासाठीच. त्यामुळेच शेतमाल, कापड, इलेक्ट्रॉनिक, गाड्यांसारख्या अनेक वस्तूंचे अति-उत्पादन होते आणि न विकलेल्या मालाचा नाश सुद्धा केला जातो, पण कामगार-कष्टकरी जनतेपर्यंत मात्र वस्तू पोहोचवल्या जात नाहीत. याच उत्पादनाच्या प्रकियेमध्ये इंधन जाळले जाते आणि कार्बन डायऑक्साईड सारख्या वायंचे उत्सर्जन वाढते, ज्यामुळे तापमान वाढ झाली आहे, आणि अजून होत आहे. भांडवली उत्पादनाच्या प्रकियेतच माणसांचे जसे शोषण केले जाते तसेच निसर्गाच्या क्षमतांचा, पुनर्निमितीक्षमतेचा विचार न करता निसर्गालाही ओरबाडले जाते. मोठ्या प्रमाणावर जंगलतोड, शेतजमिनीचा वापर, मातीचे आवरण नष्ट करणे, औद्योगिक प्रदूषण यामुळे हवामानात अभूतपूर्व बदल झाला आहे. जनतेची गरज भागवण्यासाठी नाही, तर नफ्यासाठी उत्पादन होत असल्यामुळेच हे होते! पृथ्वीवरील आपत्ती, साथीचे रोग आणि संकटांच्या लाटांनंतर लाटा पृथ्वीचा नाश करत आहे याची पर्वा न करता भांडवलदार वर्गासाठी नफाच सर्वोच्च आहे. "माणूस हे विषाणू आहेत", "सर्व दोष माणसाचा" आहे अशा घोषणा देऊन पर्यावरणीय संकटांचा दोष "सर्व" माणसांवर टाकण्याचा निर्लज्ज उद्योग भांडवलदार वर्गाचे आणि त्यांची सेवा करणाऱ्या सरकारांचा प्रयत्न आहे. दोष "माणसांचा" नाही, तर भांडवली व्यवस्थेचा आहे! दोष "माणसाच्या हपापलेपणाचा" नाही तर नफ्याला हपापलेल्या भांडवलदार वर्गाचा आहे!

### सरकारे काही करत का नाहीत?

जगभरातील सरकारे वर्षानुवर्षे आंतरराष्ट्रीय परिषदा आणि शिखर परिषदांमध्ये पृथ्वीच्या भवितव्यावर चर्चा करण्यासाठी एकत्र येतात, "मदर नेचर"चे म्हणजे पृथ्वीमातेचे संरक्षण करण्यासाठी भावनिक आवाहने करतात, परंतु या सर्व दिखाव्याच्या सभांमधून काहीही साध्य होत नाही. खरेतर ह्या ओरडा होत असताना पडद्यामागे तापमान वाढीमुळे होणाऱ्या विनाशातही धंद्याची संधी हे भांडवलदार शोधत असतात. आम्हाला पृथ्वीची काळजी आहे असे भांडवलशाहीवर विश्वास असणाऱ्यांना भासवायला यांना फार आवडते. सत्य तर हे आहे की जगातील सत्ताधाऱ्यांना, सरकारे चालवणाऱ्या भांडवलदार वर्गाला जागतिक तापमान वाढीची फार पूर्वीपासूनच कल्पना होती! त्यांच्या प्रदूषक कारखान्यांमधून उत्सर्जित होणारे विषारी वायू, सागरी आणि मानवी जीवनावर परिणाम करणारी घातक रसायने या सर्वांची त्यांना नेहमीच जाणीव होती. त्यांची उत्पादने क्रूरता मुक्त आहेत आणि नैतिकदृष्ट्या योग्य आहेत

पान 7 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण माला : पुष्प पहिले

**पान 11 वरून**

उत्पादनाला प्रभावित करत नाही आणि जेवढे मूल्य उत्पादित होते तेवढेच मूल्य विनिमयाच्या प्रक्रियेच्या म्हणजेच खरेदी-विक्रीच्या माध्यमातून संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवर वास्तवात येते. तात्कालिकरित्याही महागाईला केवळ मक्तेदार भांडवलदार वर्गच जबाबदार नाही, तर नफेखोर भांडवलदार, श्रीमंत शेतकरी-कुलक, साठेबाजी करणारे व्यापारी-आडते-दलाल, छोटे-मध्यम भांडवलदार आणि मोठे मक्तेदारी व गैर मक्तेदार भांडवलदारांसह संपूर्ण भांडवलदार वर्गच जबाबदार आहे. जेव्हा जेव्हा आर्थिक संकट आणि/किंवा कोविड किंवा युद्धासारख्या बाह्य धक्क्यांमुळे सर्व वस्तू आणि सेवांच्या पुरवठा साखळ्या तुटतात आणि विस्कळीत होतात तेव्हा साठेबाजी, सट्टेबाजी आणि चढ्या दराने विक्री करून कामगार आणि कष्टकरी लोकांची लूट करण्याचे काम संपूर्ण भांडवलदार वर्ग एकत्रितपणे करतो. परंतु बाजारात चढ्या भावाने विक्री, मालाची साठेबाजी आणि त्यांच्या किमतीवर होणारी सट्टेबाजी यामागे असलेली जी मूलभूत कारणे आहेत ती आपण उत्पादनाच्या क्षेत्रात शोधली पाहिजेत. आजच्या युगात महागाईच्या अभूतपूर्व वाढीच्या बाबतीतही, भांडवलशाही व्यवस्थेच्या अराजक स्वरूपामुळे आणि भांडवलदार वर्गाच्या नफेखोर स्वभावामुळे उत्पादनाच्या क्षेत्रात आलेले धक्के, म्हणजे पुरवठा साखळी विस्कळीत होणे हेच मूळ कारण आहे. हे काही बदमाश मक्तेदार, दुकानदार, व्यापारी इत्यादींचे षडयंत्र नाही. अशा प्रत्येक प्रसंगी ते संकटाला संधीत रूपांतरित करतात ही त्यांची वर्गीय प्रवृत्ती आहे.

तसेच, एकूण नवीन उत्पादित मूल्यातील नफ्याचा वाटा वाढणे स्वतःहून कामगारांच्या सरासरी वेतनातील घट आणि महागाईला कारणीभूत ठरत नाही. तेजीच्या काळात संपूर्ण उत्पादनच वाढणे, नफ्याचे प्रमाण आणि दर झपाट्याने वाढणे आणि मजुरीचे प्रमाण आणि दर देखील वाढणे आणि तरीही नवीन उत्पादित मूल्यामध्ये मजुरीचा वाटा तुलनेने कमी होणे हे शक्य आहे. त्याचे उलटे देखील शक्य आहे. हे देखील शक्य आहे की उत्पादन थंडावले, कामगार चळवळ मजबूत झाली आणि कामगार वर्ग त्यांच्या वर्गसंघर्षाद्वारे मजुरीचे प्रमाण, दर आणि नवीन उत्पादित मूल्यामधील त्यांचा हिस्सा वाढविण्यात यशस्वी झाले. त्याचे उलटे देखील शक्य आहे. हे देखील शक्य आहे की मंदीमुळे उत्पादन कमी होत असताना, भांडवलदार त्यांच्या नफ्याचे दर, प्रमाण आणि नवीन उत्पादित मूल्यामध्ये त्यांचा वाटा वाढवण्यात यशस्वी झाले. एवढे निश्चित आहे की उत्पादन स्थिर राहिल्यास किंवा कमी झाल्यास, नवीन उत्पादित मूल्यातील नफ्याच्या वाट्यामध्ये कोणत्याही वाढीचा अर्थ मजुरीचा दर, प्रमाण आणि नवीन उत्पादित मूल्यातील मजुरीचा वाटा, तिन्हींमध्ये घट हा असेल आणि बाजारभावात वाढ किंवा ते स्थिर असताना किंवा त्यांमध्ये तुलनेने कमी दराने घट झाल्यास त्याचा अर्थ असेल कामगार आणि कष्टकरी लोकांच्या सरासरी वास्तविक उत्पन्नात घट आणि त्यांच्यासाठी वास्तविक महागाईत वाढ.

आता वेतनातील चढउतारांच्या मूळ कारणांच्या प्रश्नाकडे जाऊया कारण वास्तविक महागाई आणि वास्तविक उत्पन्न हे केवळ वस्तू आणि सेवांच्या बाजारभावाच्या आधारे मोजले जाऊ शकत नाही, तर ते सरासरी मजुरी दराच्या सोबत त्यांच्या आकलनाच्या आधारेच मोजले जाऊ शकते. बाजारातील किमती दीर्घकाळापर्यंत उत्पादनाच्या किमतींच्या अवतीभोवतीच फिरतात आणि उत्पादनाच्या किंमती शेवटी वस्तू आणि सेवांच्या उत्पादनात लागणाऱ्या सामाजिक श्रमाद्वारे निर्धारित होतात. (उत्पादन खर्चाची संकल्पना समजून घेण्यासाठी मजदूर बिगुल, जून 2022 चे संपादकीय वाचा)

वेतन नेहमीच श्रमशक्तीच्या बरोबर नसते. भांडवली राजकीय अर्थशास्त्रात 'मजुरीचा पोलादी नियम' निर्माण झाला होता ज्यामध्ये असे मानले गेले होते की वेतन नेहमीच अशा पातळीवर निश्चित केले जाते जेणेकरून कामगार केवळ त्याच्या श्रमशक्तीचे जेमतेम पुनरुत्पादन करू शकतो. पण मार्क्सने सांगितले की **कामगार वर्ग त्याच्या शोषणाप्रती उदासीन किंवा निष्क्रीय राहत नाही तर त्याविरुद्ध संघर्ष करतो.** त्यासोबतच भांडवली अर्थव्यवस्थेच्या टप्प्यांनुसार, म्हणजे तेजी, मंदी किंवा स्थिरतेनुसार, दुसऱ्या शब्दात नफ्याच्या सरासरी दराच्या गतीनुसार, गुंतवणुकीची दरं सुद्धा बदलतात, रोजगाराचा दर बदलतो आणि श्रमशक्तीची मागणी आणि पुरवठा यामध्ये फरक येतो. तरीही, मजुरीच्या दरात चढ-उतार येतो आणि तो श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षा वर किंवा खाली जाऊ शकतो. हे ते दोन मुख्य घटक आहेत ज्यांच्या संमिश्र प्रभावामुळे मजुरीच्या सरासरी दरात चढ-उतार होतात. परंतु या घटकांमुळे सुद्धा मजुरी कितीही वर किंवा कितीही खाली जाऊ शकत नाही. दुसऱ्या शब्दांत, यघटकांमुळे मजुरीच्या सरासरी दरात येणारा चढ-उतार ठराविक मर्यादेतच होतो. त्या मर्यादा काय आहेत? चला समजून घेऊया.

> **भांडवलशाही ही ऐतिहासिक प्रवृत्ती म्हणून श्रमशक्तीसह सर्व वस्तूंचे सामाजिक मूल्य कमी करते**

भांडवलशाही ही ऐतिहासिक प्रवृत्ती म्हणून श्रमशक्तीसह सर्व वस्तूंचे सामाजिक मूल्य कमी करते हे आपण वर पाहिले आहे. आपण हे देखील पाहिले की **वास्तविक महागाईचा दर मजुरी आणि वस्तूंचा बाजारभाव यांच्यातील संबंधांवरून निर्धारित होतो.** आणि आपण हे देखील पाहिले आहे की भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अराजक गतीमुळे आणि भांडवलदार वर्गाच्या नफेखोरीमुळे, आर्थिक संकटाच्या वेळी आणि कोणत्याही महामारी किंवा युद्धाच्या बाह्य धक्क्यांमुळे, महागाई खूप वेगाने वाढते आणि कामगार वर्गाचा वास्तविक मजुरीचा दरसुद्धा झपाट्याने कमी होतो. शेवटी, आपण हे देखील पाहिले आहे की भांडवल संचयाच्या विशिष्ट कालखंडानुसार (तेजी, मंदी, स्थिरता) तसेच कामगार वर्गाच्या वर्गसंघर्षाच्या परिणामी मजुरी श्रमशक्तीच्या मूल्याच्या वर किंवा खाली जाऊ शकते. परंतु ऐतिहासिक प्रवृत्ती म्हणून मजुरी श्रमशक्तीच्या मूल्याभोवतीच फिरत असते.

भांडवलदार वर्ग आपल्या नफ्याचा दर शक्य तितका वाढवण्यासाठी मजुरी कमीत कमी पातळीवर ठेवण्याचा प्रयत्न करतो, तर कामगार वर्ग आपल्या संघटित आर्थिक संघर्षांद्वारे मजुरी वाढवण्यासाठी नेहमीच संघर्ष करतो. नव्याने उत्पादित झालेल्या मूल्यातील आपला हिस्सा वाढवण्यासाठी कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्ग यांच्यातील हा संघर्ष आहे. तात्कालिकरित्या हा संघर्षच मजुरी आणि नफा यांच्यातील सापेक्ष संबंध ठरवतो. परंतु **सर्वसाधारणपणे मजुरी ही श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षा दीर्घ काळासाठी कधीही कमी राहू शकत नाही.** जर कामगार वर्ग एक वर्ग म्हणून स्वतःच्या श्रमशक्तीचे पुनरुत्पादनच करू शकत नसेल, तर तो मूल्य आणि अतिरिक्त मूल्याच्या उत्पादनासाठी सतत काम करण्यायोग्यच राहणार नाही आणि भांडवलदार वर्गासाठी नफा निर्माण होणार नाही. या कारणास्तव भांडवलदार वर्गाच्या दीर्घकालीन सामूहिक वर्गहिताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भांडवली राज्यसत्तेने एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमध्ये आणि इतर अनेक देशांमध्ये कामाच्या दिवसाची लांबी आणि किमान वेतन निश्चित करण्यासाठी काम केले, कारण वैयक्तिक भांडवलदार स्वभावतःच भांडवलदार वर्गाच्या दीर्घकालीन सामूहिक हिताचा विचार करण्यास असमर्थ असतात. बाजारातील गळेकापू प्रतिस्पर्धा त्यांना तसे करू देत नाही. श्रमशक्तीच्या भौतिक पुनरुत्पादनाची ही अत्यावश्यक अट ती भौतिक मर्यादा आहे ज्याच्या खाली मजुरीचा सरासरी दर जास्त काळ राहू शकत नाही.

पण **कामगार वर्गही आपल्या वर्गसंघर्षातून मजुरी अमर्यादपणे वाढवू शकत नाही.** जर मजुरीचा सरासरी दर इथपर्यंत वाढला की ज्यामुळे भांडवलदार वर्गाच्या नफ्याचा सरासरी दर एवढा कमी झाला की भांडवल जमा करण्याची प्रक्रियाच ठप्प झाली, तर भांडवलदार वर्ग 'गुंतवणूक संपा'वर जाईल, म्हणजेच त्याच्या गुंतवणुकीला कमी करेल. जेव्हा तो आपली गुंतवणूक कमी करतो, तेव्हा रोजगाराचा दर घसरतो, बेरोजगार कामगारांची राखीव फौज कार्यरत कामगारांच्या सक्रिय फौजेच्या तुलनेत वाढते, श्रमशक्तीचा पुरवठा त्याच्या मागणीच्या तुलनेत वाढतो आणि मजुरीचा सरासरी दर पुन्हा खाली जातो, जेणेकरून भांडवल जमा करण्याची प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ववत होईल. म्हणजेच भांडवल जमा करण्याची प्रक्रिया आणि त्याचे सातत्य मजुरीचा सरासरी दर वाढण्याची वरची मर्यादा निर्धारित करतो.

**त्यामुळे भांडवलशाही व्यवस्थेत मजुरीचा सरासरी दर या दोन मर्यादांच्या मध्ये फिरतो.** या फिरण्याचे कारण म्हणजे भांडवलशाहीच्या संचयाच्या विशिष्ट टप्प्यात, म्हणजे तेजी, मंदी किंवा स्थिरतेच्या कारणाने श्रमशक्तीची मागणी आणि पुरवठ्याचे बदलते समीकरण आणि कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्ग यांच्यात उत्पादित मूल्यातील आपला वाटा वाढवण्यासाठी चालू असलेला वर्गसंघर्ष हे होय. परंतु या दोन्ही कारणांमुळे मजुरीच्या सरासरी दरातील जे चढउतार होतात ते वर उल्लेखलेल्या दोन मर्यादांमध्ये होतात. एकुणात, भांडवल संचयाची ही एकंदर गतीच आहे जी मजुरीत येणाऱ्या चढ-उतारांच्या मर्यादा ठरवते आणि एका भांडवलशाही व्यवस्थेत असेच होऊ शकते. त्यामुळे मजुरीसाठीचा संघर्ष कामगार वर्गासाठी नक्कीच आवश्यक आहे, परंतु तो स्वत: कामगार वर्गाच्या संघर्षाची शेवटची सीमा नाही. कामगार वर्गाचे राजकीय उद्दिष्ट मजुरी वाढवणे किंवा सर्वांसाठी समान मजुरी करणे हे नसून मजुरीची व्यवस्थाच नष्ट करणे हे आहे. मजुरी वाढवण्याच्या सतत सुरु असलेल्या संघर्षालासुद्धा या राजकीय उद्दिष्टासाठीच्या संघर्षाचा एक भाग बनवणे आवश्यक आहे, अन्यथा तो एक आर्थिक संघर्षच बनून राहील जो आपल्याला आपल्या राजकीय ध्येयापासून दूर करेल, राजकीयदृष्ट्या विचार करण्याच्या आणि राज्यसत्तेचा प्रश्नाला हात घालण्याच्या क्षमतेपासून आपल्याला वंचित करेल. भांडवलदार वर्गाला हेच हवे असते. **ज्या कामगार संघटना कामगार वर्गाच्या आर्थिक मागण्यांसाठीच्या लढ्याला अर्थवादी स्वरूप देऊन कामगार वर्गाचे अराजकीयीकरण करतात, त्या भांडवली कामगार संघटना आहेत,** ज्या कामगार वर्गाच्या संपूर्ण चळवळीला भांडवली चौकटीत कैद करून ठेऊ इच्छितात. भारतातील सर्व निवडणुकबाज संसदीय डावे पक्ष जसे की भाकपा, माकपा, भाकपा माले लिबरेशन इत्यादी तसेच इतर भांडवली पक्षांच्या केंद्रीय ट्रेड युनियन्स जसे की सिटू, एटक, इंटक व ऐक्टू हेच कामकरतात.

आपण कामगारांनी मजुरीची संपूर्ण व्यवस्था समजून घेतली पाहिजे. या मजुरी व्यवस्थेच्या मुळाशी उत्पादनाची साधने आणि उपभोगाच्या साधनांपासून प्रत्यक्ष उत्पादक वर्गाचे वंचित असणे आणि त्यावर भांडवलदार वर्गाची मक्तेदारी असणे हे आहे. या उत्पादनाच्या साधनांपासून वंचित असल्यामुळेच कामगार वर्गाला आपली श्रमशक्ती भांडवलदारांना विकावी लागते. हा उत्पादन संबंध असेपर्यंत मजुरीची व्यवस्था म्हणजेच मजुरी-संबंध आणि भांडवल-संबंध कायम राहतील. ही व्यवस्था संपवून सर्वहारा वर्गाचे शासन आणि समाजवादी व्यवस्था प्रस्थापित करणे हे कामगार वर्गाचे राजकीय ध्येय आहे, ज्यामध्ये सर्व कारखाने, खाणी आणि शेतजमीन भांडवलदार वर्गाकडून हिसकावून सार्वजनिक मालमत्तेत बदलले जातील आणि कामगार वर्ग आपल्या पक्षाच्या नेतृत्वात आपल्या राज्यसत्तेच्या माध्यमातून सर्व आवश्यक गोष्टींचे योग्य प्रमाणात उत्पादन आणि वितरण करेल. असा समाज मूठभर भांडवलदारांचा नफा केंद्रस्थानी ठेवून सामाजिक उत्पादन करणार नाही, तर समाजाच्या गरजेनुसार उत्पादन आणि वितरण करेल. तरच आपण कामगार मुक्त होऊ शकतो आणि संपूर्ण मानवतेला भांडवलशाहीरुपी या जर्जर कोंबडीपासून मुक्त करू शकतो जी जगाला युद्ध, दारिद्र्य, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास, उपासमार, निरक्षरता आणि कुसंस्कृतीसारख्या कुजलेल्या अंड्याशिवाय काहीही देऊ शकत नाही. या व्यवस्थेची जागा इतिहासाच्या कचरापेटीतच आहे आणि तिला या कचरापेटीच्या हवाली करण्याचे काम केवळ सर्वहारा वर्गाच्या नेतृत्वाखाली व्यापक कष्टकरी जनताच करू शकते.

> **उत्पादनाच्या साधनांपासून वंचित असल्यामुळेच कामगार वर्गाला आपली श्रमशक्ती भांडवलदारांना विकावी लागते.**

(अनुवाद: जयवर्धन. मूळ लेख मजदूर बिगुल, जून 2022 मध्ये प्रकाशित)

# साईबाबांची सुटका आणि पुन्हा अटक

## न्यायालयाचे दमनकारी चरित्र पुन्हा उघड

✎ सुस्मित

उच्च न्यायालयाने जी. एन. साईबाबा यांना माओवाद्यांशी संबंध असल्याच्या प्रकरणात 14 ऑक्टोबर 2022 रोजी निर्दोष सोडले आणि सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला दुसऱ्याच दिवशी स्थगिती दिली. या मुद्याला अत्यंत तातडीचे मानून सर्वोच्च न्यायालयाने सुट्टीच्या दिवशी विशेष बेंच बसवून निर्णय देणे अनेकांना धक्का देणारेच आहे. सर्वोच्च न्यायालयाने तातडीने लगेचच सुटकेला स्थगिती दिली. अनेक वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर टीका केली आहे.

### खटल्याचा घटनाक्रम

जी. एन. साईबाबा हे शारीरिकरित्या 90 टक्के अपंग कार्यकर्ते, दिल्ली विद्यापीठात इंग्रजी विभागात प्राध्यापक होते. ऑक्टोबर 2014 मध्ये त्यांना बंदी घातलेल्या माओवादी संघटनांसोबत संबंध ठेवल्याचा आरोप ठेवून बेकायदा कारवाया प्रतिबंध कायद्यांतर्गत (यु.ए.पी.ए.) अटक करण्यात आली. 2017 मध्ये गडचिरोली जिल्हा न्यायालयाने माओवादी संघटनेशी तथाकथित संबंध ठेवल्याबद्दल तसेच देशाविरुद्ध युद्ध करण्यासारख्या कारवाया करण्याबद्दल दोषी ठरवले आणि जन्मठेपेची शिक्षा दिली होती. ऑक्टोबर 2022 मध्ये नागपूर उच्च न्यायालयाने केसमध्ये तांत्रिक चुकांचे कारण देऊन साईबाबा आणि अन्य महेश तिर्की, पांडु नरोते, हेम मिश्रा, प्रशांत सांगलीकर आणि विजय तिर्की यांना निर्दोष मुक्त केले होते. उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयाने चालवलेल्या सुनावणीला रद्दबातल ठरवले होते कारण बेकायदा कारवाया प्रतिबंध कायद्याच्या कलम 45 अ (1) नुसार खटला सुरु करण्याआधी सरकारची परवानगी अगोदर घेणे गरजेचे असते, जी या खटल्यात घेतली गेली नव्हती. सरकारला समिती नेमून त्यांचा स्वतंत्र अहवाल सुद्धा परवानगी देण्याआधी विचारात घ्यावा लागतो. साईबाबांच्या संदर्भात सरकारने खटला सुरु झाल्यानंतर परवानगी दिली होती आणि इतर पाच जणांसाठी स्वतंत्र अहवालाद्वारे कुठलेही कारण न देता कारवाई करण्यासाठी शिफारस केली होती. त्यामुळे हा खटला सुरवातीपासूनच सदोष असल्यामुळे उच्च न्यायालयाने खटल्यातील सर्वांची निर्दोष मुक्तता केली होती. यातील हेम मिश्राला दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा मिळाली होती तर इतरांना जन्मठेपेची शिक्षा दिली गेली होती.

पण यानंतर पुढच्याच दिवशी सुट्टीचा दिवस असतानाही सर्वोच्च न्यायालयाने विशेष बेंच बसवून उच्च न्यायालयाचा निर्णय स्थगित केला. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना सांगितले की आरोपींना गंभीर गुन्ह्यांखाली शिक्षा झाली होती तसेच उच्च न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता करताना पुराव्यांचा विचार केला नव्हता तर फक्त तांत्रिक चुका विचारात घेतल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर सामाजिक कार्यकर्ते तसेच वकिलांमधून टीकेची झोड उठली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अनेक कारणांनी अभूतपूर्व होता. ज्या तत्परतेने सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय घेतला ती अनेक केसेस मध्ये घेतली जात नाही. सामान्यतः एखाद्या व्यक्तीच्या हक्कांची पायमल्ली होत असेल तर सुटीच्या दिवशी विशेष बेंच बसवला जातो पण या वेळेस निर्दोष व्यक्तीला



कोठडीत ठेवण्यासाठी विशेष बेंच बसवला गेला. अनेक तज्ज्ञांच्या मते अनिवार्य परिस्थिति असल्याशिवाय व्यक्ती–स्वातंत्र्य हिरावून घेतले जात नाही, पण या खटल्यात तशी कुठलीही परिस्थिती नव्हती. सर्वोच्च न्यायालयाने तांत्रिक चुकांकडे दुर्लक्ष करून हा निर्णय दिला आहे, पण यु.ए.पी.ए. सारख्या कायद्यांमध्ये जिथे आरोपींना खूप कमी अधिकार आहेत तिथे तांत्रिक बाबीच खूप महत्वाच्या बनतात. हे पण समजणे खूप महत्वाचे आहे की यु.ए.पी.ए सारख्या कायद्यांचा वापर सरकार विरोधात तसेच भांडवली व्यवस्थेविरोधात बोलणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, विद्यार्थी यांचा आवाज दडपून टाकण्यासाठी केला जातो. यु.ए.पी.ए. कायद्याचा दोषसिद्धी दर फक्त 2% इतका आहे. केंद्र सरकारने दिलेल्या माहितीच्या आधारे 2016 ते 2020 मध्ये 5027 केसेस दाखल झाल्या ज्यात 24,134 आरोपी होते. यातील फक्त 212 लोकांना शिक्षा झाली आणि 386 जणांची निर्दोष मुक्तता झाली, म्हणजे 97.5% लोक केस सुरु होण्याची वाट पाहत जेल मध्ये सडत होते. यु.ए.पी.ए. कायद्यातील कलम 45 अ(1) सारख्या पूर्वपरवानगीच्या तरतुदी यासाठीही केल्या जातात की एखाद्या अधिकाऱ्याने मनमर्जीने कायद्याचा गैरवापर करू नये, परंतु जेव्हा कायदाच गैर असेल आणि सत्ता चालवणारेच गैरवापर करू पाहतील, तेव्हा अशा कलमांचा अडथळाच वाटणार नाही का?

सरकारने सुद्धा ज्या तत्परतेने न्यायालयात धाव घेतली तशी तत्परता अनेक खटल्यांमध्ये जिथे हिंदुत्ववादी आरोपी आहेत तिथे दाखवली जात नाही. उदाहरण द्यायचे झाले तर समझोता एक्सप्रेस बॉम्बस्फोट प्रकरणी सगळ्या आरोपींची निर्दोष मुक्तता केल्यानंतर 3 वर्षांनतरही अपील केलेले नाही, बाबरी मस्जिद पाडल्याप्रकरणी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केल्यानंतर 2 वर्षांनंतरही अपील केले नाही तर साईबाबाच्या खटल्यात मात्र एका दिवसात अपील केले गेले.

2011 मधल्या अरुप भुयान खटल्यात मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय देताना सांगितले की त्व्यक्तीने हिंसक कारवाया केल्या असतील किंवा हिंसक कारवायांना प्रोत्साहन दिले असेल तरच तो राजद्रोहा सारखा गुन्हा मानला जाईल, बंदी घातलेल्या संघटनांचे फक्त सदस्य असणे हा गुन्हा होत नाही. पण साईबाबाच्या बाबतीत निर्णय देताना हे ध्यानात घेतले गेले नाही. साईबाबाच्या खटल्यात नक्षलबारी चळवळी संबंधित साहित्य पुरावा म्हणून वापरले गेले आहे, जेव्हा की असे साहित्य अनेक अभ्यासकांकडे सहज उपलब्ध असते.

### जेलमध्ये अमानवी, नियमबाह्य वागणूक

साईबाबा यांना जेलमध्ये अत्यंत अमानवी वागणूक दिली जात आहे. साईबाबा हे शरीराने 90% अपंग असून त्यांना 19 जीवघेणे आजार आहेत. असे असताना सुद्धा कोरोनाच्या काळात वैद्यकीय कारणांसाठी परोल दिला गेला नाही. बऱ्याच वेळेला साईबाबाच्या वकिलांनी दिलेली औषधी—यातली काही औषधी दररोज घावी लागतात—त्यांच्यापर्यंत पोहोचू दिली जात नव्हती. साईबाबाच्या नातेवाईकांनी पाठवलेली पत्रे, वर्तमानपत्राची कात्रणे, पुस्तके जी वाचण्यास कुठलीही बंदी नाही आहे त्यांना दिली जात नाहीत. नातेवाईकांना महिन्यात फक्त 1 किंवा 2 वेळा मोबाईलवर संपर्क करता येतो. साईबाबा अपंग असून सुद्धा त्यांना अंडा सेलमध्ये ठेवण्यात आले आहे, ज्यामध्ये ठेवलेल्या कैद्याला बाहेर जाण्याची मुभा नसते, दुसऱ्या कैद्यांशी बोलण्याच्यी तसेच मोकळी हवा खाण्याची पण मुभा नसते, या अंडा सेलमधेच शौचालयाची, आंघोळीची व्यवस्था केली असते. या अंडा सेलच्या बाहेर जेलच्या अधिकाऱ्यांनी 24 तास नजर ठेवायला सी.सी.टी.व्ही. कॅमेरा सुद्धा लावला होता. हे गोपनीयतेच्या तसेच सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचे नाकारणे असल्यामुळे या विरोधात साईबाबानी उपोषण सुद्धा सुरु केले होते. उपोषणानंतर सी.सी. टी.व्ही. ची दिशा बदलण्यात आली तसेच त्यांच्याजवळ पाण्याची बॉटल देण्यात जी आतापर्यंत त्यांना देण्यात आली नव्हती.

साईबाबांना जेलमध्ये जी अमानवीय आणि क्रूर वागणूक मिळत आहे ती कैद्यांसाठी असलेल्या कायदेशीर तरतुदींच्या अगदी उलट आहे. ऑल इंडिया प्रिसन्स रिफॉर्म्स कमिटी (1980-83) किंवा जस्टिस मुल्ला कमिशन रिपोर्ट (1982-83) मध्ये कैद्यांना कशी वागणूक दिली जावी या संदर्भात शिफारसी आहेत. या शिफारशींमध्ये कैद्यांचे फक्त शारीरिक स्वास्थ्य नाही तर मानसिक स्वास्थ्य सुद्धा जपले जावे असे जेलच्या अधिकाऱ्यांना उद्देशून सांगितले आहे. ह्या व्यतिरिक्त भारताने युनाइटेड नेशन्स कन्व्हेंशन ऑन द राईट्स ऑफ पर्सन्स विथ डिसॅबिलिटीस सुद्धा पारित केले आहे त्याअंतर्गत साईबाबा अपंग असल्यामुळे त्यांना अपंगांसाठीचे विशेष अधिकार उपलब्ध आहेत.

साईबाबांना ज्या अमानवीय परिस्थितीत राहावे लागत आहे ती कैद्याच्या अधिकारांचे उल्लंघन आहे आणि गैर संविधानिक आहे. पण फक्त साईबाबा याला अपवाद नाहीत, तर साईबाबासारखे शेकडो कैदी देशभर अमानवीय परिस्थितीमध्ये खोट्या गुन्ह्यांखाली खटला सुरू होण्याची वाट पाहत तुरुंगात सडत आहेत.

### भांडवली राज्यसत्तेचे दमनकारी, लोकशाही-विरोधी चरित्र पुन्हा उघड

साईबाबाच्या घटनेवरून हे सिद्ध होते की न्यायपालिकेकडून जी न्यायाची अवास्तव अपेक्षा केली जाते ती अतिशय फाजील आहे. प्रत्येक खटल्यात न्यायालयाने ठरवलेली प्रक्रिया चालवूनच खटला चालवला जाईल ही अपेक्षा क्षुल्लक आहे तरीही वेळोवेळी दिसून आले आहे की न्यायालय स्वतःच ठरवलेल्या प्रक्रियेनुसार जात नाही, संविधानातील तरतुदींचे रक्षण करत नाही. यात न्यायपालिकेचा जो पक्षपात आहे तो नेहमीच भांडवलाच्या आणि व्यवस्थेच्या बाजूचा असतो. याचे कारणच आहे की संसद, पोलीस किंवा न्यायव्यवस्था ह्या सर्व संस्था राज्यसत्तेचेच विविध अंग आहेत. या राज्यसत्तेचे कामच आहे की भांडवली व्यवस्था टिकवून ठेवणे आणि या व्यवस्थेविरोधातील आवाजांचे दमन करणे. त्यामुळेच साईबाबांसारख्या आरोपींचा ज्यांच्याकडून राज्यसतेला स्वत:बद्दल धोका वाटते, सर्व नियम गुंडाळून ठेवून छळ केला जातो. स्वत:च्या लोकशाही असण्याबद्दलच्या सर्व दाव्यांचा अशाप्रकारे ही व्यवस्था स्वत:चा निकाल लावते आणि आपले खरे दमनकारी चरित्र उघडे करते. आज सर्व प्रगतिशील शक्तींचे काम बनते की त्यांनी न्यायपालिकेचे दमनकारी चरित्र जनतेमध्ये सतत उघडे केले पाहिजे आणि लोकशाही-नागरी अधिकारांचा जो दावा राज्यसत्ता करते, त्यांना लागू करवण्याकरिता संघर्ष चालू ठेवला पाहिजे.

# क्रांतिकारी कामगार शिक्षण माला : पुष्प पहिले

# मजुरी संदर्भात

✍ अभिनव

आपण कामगार हे जाणतो की मजुरीच्या सरासरी दरात चढ-उतार होत राहतात. परंतु हे चढउतार एका विशिष्ट मर्यादेच्या आत होतात. या लेखात आपण भांडवलशाही व्यवस्थेत मजुरीमध्ये येणाऱ्या चढउतारांची मूलभूत कारणे काय आहेत आणि मजुरीच्या मर्यादा कशा ठरतात हे समजून घेणार आहोत. परंतु आपण सुरुवात काही मूलभूत गोष्टींपासून करणार आहोत.

वेतनी-मजुरी ही भांडवलशाहीच्या अस्तित्वाची मूलभूत अट आहे. याच्या माध्यमातूनच भांडवल वरकड मूल्य निर्माण करते आणि त्याला हडप करते, जे भांडवलदाराच्या नफ्याचा स्रोत असते. भांडवलदार आपले भांडवल दोन भागांत गुंतवतो: पहिला, यंत्रे, कच्चा माल, पायाभूत सुविधा इ, ज्याला आपण स्थिर भांडवल म्हणतो; दुसरे, कामगारांना कामावर ठेवण्यासाठी, म्हणजेच कामगारांची श्रमशक्ती विकत घेण्यासाठी, ज्याला आपण परिवर्तनशील भांडवल म्हणतो.

**यंत्रे, कच्चा माल इ. स्वतःहून माल तयार करत नाहीत. केवळ जिवंत श्रम, म्हणजे काम करणारे कामगारच, या मशीन्स आणि कच्चा माल इत्यादींच्या उत्पादक वापराची प्रक्रिया पार पाडतात**, ज्याच्या परिणामी वस्तूंचे उत्पादन होते. वस्तूच्या मूल्यामध्ये मशीन, कच्चा माल इत्यादींवर केलेली गुंतवणूक, म्हणजेच मशीन, कच्चा माल इत्यादींचे मूल्य जसेच्या तसे हस्तांतरित होते. ते स्वतःहून कोणतेही नवीन मूल्य निर्माण करू शकत नाही. म्हणूनच यावर केलेल्या गुंतवणुकीला स्थिर भांडवल म्हणतात.

कामगार त्याच्या संपूर्ण कार्यदिवसाच्या एका भागामध्ये त्याच्या श्रम-शक्तीच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या मूल्याच्या बरोबरीचे मूल्य तयार करतो, ज्याच्या आसपासच्या मूल्याच्या बरोबरीचे वेतन सामान्यतः त्याला भांडवलदार देतो. श्रमशक्तीच्या मागणी व पुरवठ्यानुसार आणि मजुरी वाढवण्यासाठी केलेल्या वर्गसंघर्षानुसार मजुरी श्रमशक्तीच्या मूल्याच्या वर किंवा खाली असू शकते. वरील घटकांवर अवलंबून मजुरीच्या दरांत चढ-उतार होत राहतात.

तथापि, कामगार त्याच्या कार्यदिवसाच्या म्हणजे दिवसातील कामाच्या तासांच्या दुसऱ्या भागात, भांडवलदार वर्गासाठी अतिरिक्त मूल्य तयार करतो, जे भांडवलदाराला कोणत्याही अतिरिक्त गुंतवणुकीशिवाय विनामूल्य प्राप्त होते. असे असले तरी, भांडवलदार वर्गाच्या आर्थिक दृष्टिकोनातून कामगाराची काहीही फसवणूक होत नाही! भांडवलशाहीचा नियम आहे की समतुल्य वस्तूंचा विनिमय केला जातो, म्हणजे सामान्य नियम म्हणून, केवळ समान मूल्याच्या वस्तूंची देवाणघेवाण केली जाते. परंतु जर भांडवलदार कामगाराकडून जेवढे काही घेतो ते त्याला मजुरीच्या रूपात परत देतो, तर मग भांडवलदार वर्गाचा नफा कुठून येतो? याच गोष्टीला मार्क्सच्या आधीचे भांडवली राजकीय अर्थशास्त्रज्ञ समजू शकले नाहीत. मार्क्सने पहिल्यांदा ही गोष्ट समजली आणि सांगितले की भांडवलदार कामगाराकडून त्याचे श्रम नव्हे तर श्रमशक्ती (म्हणजेच एका निश्चित कालावधीत काम करण्याची त्याची क्षमता) विकत घेतो, जिचे भांडवली समाजात स्वतः एका मालामध्ये रूपांतर झाले आहे. हे प्रत्येकाला माहित आहे



की, सामाजिकदृष्ट्या, एक उत्पादक एका दिवसात त्याच्या जीवनाच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंपेक्षा वरकड उत्पादन करू शकतो. तसे नसते तर समाजात वर्ग आणि वर्ग विभाजन निर्माणच झाले नसते. 18 व्या आणि 19 व्या शतकातील भांडवली राजकीय अर्थशास्त्रज्ञांनाही या सत्याची जाणीव होती की एखादा उत्पादक त्याच्या उपजीविकेसाठी आवश्यक वस्तूंपेक्षा वरकड उत्पादन करतो. म्हणून, जेव्हा भांडवलदार कामगाराकडून त्याची श्रमशक्ती विकत घेतो, तेव्हा तो त्याला त्याच्या श्रमशक्तीचे मूल्य देतो, जे श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या मूल्यावरून ठरवले जाते. अशाप्रकारे फक्त समतुल्य गोष्टींचीच देवाणघेवाण केली गेली आहे आणि कामगाराच्या शोषणाची व्याख्या कोणत्याही प्रकारची "फसवणूक" किंवा "चोरी" म्हणून केली जाऊ शकत नाही. परंतु एका कामगाराची श्रमशक्ती कामाच्या दिवसात खर्च होण्याच्या प्रक्रियेत स्वतःच्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करते. दुसऱ्या शब्दांत, जेवढ्या श्रमाच्या खर्चात श्रमशक्ती तयार होते, ती स्वतःच्या खर्च होण्याच्या प्रक्रियेत त्यापेक्षा जास्त श्रम प्रदान करते.

> **कामगाराची श्रमशक्ती कामाच्या दिवसात खर्च होण्याच्या प्रक्रियेत स्वतःच्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करते.**

म्हणून कामगार त्याच्या कामाच्या दिवसाच्या एका भागात स्वतःच्या श्रमशक्तीचे पुनरुत्पादन करण्यासाठी काम करतो, ज्याला आपण आवश्यक श्रम-काळ म्हणतो, तर दुसऱ्या भागात तो भांडवलदारासाठी अतिरिक्त-मूल्य तयार करतो, ज्याला आपण अतिरिक्त श्रम-काळ म्हणतो. आवश्यक श्रमकाळात काम केल्याच्या बदल्यात कामगाराला मजुरी मिळते, तर अतिरिक्त श्रमकाळात काम केल्याच्या बदल्यात त्याला काहीही मिळत नाही आणि त्याचे अतिरिक्त उत्पादन भांडवलदार हडप करतो, जे विकले गेल्यानंतर अतिरिक्त मूल्याचे रूप धारण करते आणि भांडवलदाराच्या नफ्याचा स्रोत बनते. हे आहे भांडवलदाराच्या नफ्याच्या स्रोताचे घृणास्पद क्षुद्र रहस्य! भांडवलीव्यवस्थेत मजुरी ही 'एका दिवसात दिलेल्या श्रमाच्या मूल्याचे' स्वरूप धारण करते आणि भांडवली शोषण लपवते कारण आवश्यक आणि अतिरिक्त श्रमकाळ वेगवेगळ्या काळात आणि वेगवेगळ्या ठिकाणी घडत नसून ते एकाच कार्यदिवसाचा सातत्यपूर्ण भाग असतात. त्यामुळे कामगाराला 'एक दिवसाच्या श्रमाची किंमत' दिल्याचे दिसून येते. भांडवलशाही व्यवस्थेत, मजुरीचे हे स्वरूप कामगाराचे शोषण लपवते आणि भांडवली शोषणावर पडदा टाकते. वास्तवात, कामगार आपली श्रमशक्ती विकतो आणि त्या बदल्यात आवश्यक श्रमाच्या वेळेत त्याच्या श्रमशक्तीइतक्या मूल्याच्या बरोबरीचे सुद्धा उत्पादन करतो आणि अतिरिक्त श्रमाच्या वेळेत भांडवलदारासाठी वरकड मूल्याचे सुद्धा उत्पादन करतो, जे भांडवलदाराच्या नफ्याचा स्रोत असते.

> **कामगाराच्या कार्यदिवसाचे दोन भाग असतात, ज्यापैकी एकामध्ये मजुरीच्या बरोबरीचे मूल्य तयार केले जाते, तर दुसऱ्यात नफा**

म्हणजेच, कामगाराच्या कार्यदिवसाचे दोन भाग असतात, ज्यापैकी एकामध्ये मजुरीच्या बरोबरीचे मूल्य तयार केले जाते, तर दुसऱ्यात नफा. कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्ग या नव्याने निर्माण झालेल्या मूल्यामधील आपला वाटा वाढवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. कामगार वर्ग आपली मजुरी वाढवण्याचा प्रयत्न करतो तर भांडवलदार वर्ग विविध माध्यमांनी मजुरीच्या तुलनेत नफ्यातील आपला हिस्सा वाढवण्याचा प्रयत्न करतो. भांडवलदार वर्ग हे कार्यदिवसाला वाढवूनही(ज्याला भौतिक मर्यादा आहे) साध्य करतो ज्याला आपण निरपेक्ष अतिरिक्त मूल्य म्हणतो, आणि श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाची किंमत कमी करूनही साध्य करतो, जेणेकरून एकूण श्रमकाळ तेवढाच राहतो, परंतु आवश्यक श्रम-काळाचा हिस्सा, म्हणजेच ज्यामध्ये कामगार 'स्वतःसाठी' काम करतो, तो तुलनेने कमी होतो आणि परिणामी अतिरिक्त श्रम-काळाचा हिस्सा वाढतो, याच्या परिणामी अतिरिक्त-मूल्याचा दरही वाढतो. या दुसऱ्या पद्धतीला आपण सापेक्ष वरकड मूल्य म्हणतो. भांडवलशाही जसजशी प्रगत होत जाते, तसतसे सापेक्ष वरकड मूल्याद्वारे वरकड मूल्य वाढवण्याची पद्धत अधिक प्रमुख होत जाते. अशा प्रकारे अतिरिक्त मूल्य तेव्हा वाढवता येते जेव्हा कामगार वर्गाच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांमध्ये, म्हणजे मजुरी-उत्पादन उत्पादक उद्योगांमध्ये, उत्पादकता वाढते, खर्च कमी होतो आणि परिणामी, सरासरी किंमत कमी होते. जेव्हा मजुरी-उत्पादनांच्या किंमती घसरतात, तेव्हा कामगाराच्या श्रमशक्तीचे मूल्य देखील कमी होते आणि भांडवलदार वर्ग त्याची मजुरी कमी करू शकतो (जरी ही कपात पैशाच्या बाबतीत नेहमीच दिसून येत नाही). म्हणूनच भांडवलदार वर्ग नेहमी श्रमशक्तीचे मूल्य कमी करू इच्छितो, मजुरी-उत्पादनांच्या किमती नियंत्रणात ठेवू इच्छितो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत विरोधाभास आणि अराजकतेमुळे ती नेहमीच असे करू शकत नाही, ही बाब वेगळी.

सर्वसाधारणपणे ऐतिहासिक प्रवृत्ती म्हणून भांडवलशाही प्रत्येक वस्तूचेच मूल्य कमी करते कारण त्यामुळे नफ्यासाठी उत्पादकतेचा विकास होत जातो. भांडवलदार वर्गाची अंतर्गत स्पर्धा आणि भांडवलदार वर्ग आणि कामगार वर्ग यांच्यातील स्पर्धा या गोष्टीला खात्रीशीर करते. काही बालिश विचाराच्या लोकांना वाटते की भांडवलदार वर्ग किमती वाढवून नफा वाढवतो! सत्य हे आहे की **ज्या प्रक्रियेद्वारे भांडवलदार वर्ग नफा वाढवण्याचा प्रयत्न करतो, तीच प्रक्रिया श्रमाची उत्पादकता विकसित करते, आणि ऐतिहासिकदृष्ट्या सर्व वस्तूंचे प्रति नग मूल्य कमी करते आणि दीर्घकाळात किंमती या सामाजिक मूल्याभोवती फिरतात**. परंतु **महागाईचा दर हा केवळ सर्व वस्तूंच्या घटत्या मूल्यावरून ठरत नाही, तर तो सर्व वस्तू आणि सेवांचे मूल्य आणि कामगार वर्ग व सामान्य कष्टकरी जनतेच्या सरासरी उत्पन्नाच्या पातळीतील परस्परसंबंधांवरून निश्चित होतो.** या दोघांमधील संबंधाच्या आधारेच कामगार व सामान्य कष्टकरी जनतेचे खरे उत्पन्न आणि महागाईचा खरा दर कळतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अराजक गतीमुळे, भांडवलशाहीमध्ये असे काळ येतात जेव्हा वास्तविक महागाई मोठ्या प्रमाणात वाढते. असा काळ आज आपण आपल्या समोर पाहत आहोत.

भांडवलशाही व्यवस्थेतील महागाईची सर्वसाधारण आणि विशिष्ट, दूरगामी आणि तात्कालिक कारणांविषयी आम्ही मजदूर बिगुल, जून 2022 च्या संपादकीयात तुलनात्मकरित्या विस्ताराने चर्चा केली आहे आणि पुढील अंकात यावर अधिक विस्ताराने लिहू. परंतु आत्ता हे समजून घेणे पुरेसे आहे की क्रांतिकारी कामगार वर्ग त्याच्या विज्ञानाच्या म्हणजे मार्क्सवादाच्या विश्लेषणाच्या साधनांनी महागाईची परिघटना समजतो, आणि हे जाणतो की महागाईचे विश्लेषण करताना मूलभूत कारण म्हणून उत्पादन क्षेत्र महत्वाचे आहे, अभिसरण अर्थात वस्तूंचे संचरण (वस्तूंच्या खरेदी-विक्रीची प्रक्रिया) नाही. अभिसरणातील बदल उत्पादनाच्या क्षेत्रातील बदलांद्वारे निर्धारित केले जातात. ते उत्पादनाच्या क्षेत्रावर परिणाम करतात परंतु अंतिम विश्लेषणात उत्पादन क्षेत्रच निर्णायक भूमिका बजावते.

त्यामुळे महागाईचे कारण काही मक्तेदारी भांडवलदारांकडून मक्तेदारी किमतींद्वारे वसूल केला जाणारा मक्तेदारी कर नाही कारण तो संपूर्ण अर्थव्यवस्थेतील मूल्याच्या एकूण

पान 9 वर

# ऋषी सुनाक: युकेचा पहिला "गुंतवणूक बॅंकर" प्रधानमंत्री

✍आशय

ऋषी सुनाक हा युके(युनायटेड किंग्डम) चा पहिला "हिंदू" अथवा "भारतीय मूळाचा" अथवा "आशियाई" प्रधानमंत्री असल्याबद्दल हिंदुत्ववादी प्रसारमाध्यमे, भारतातील वा जगातील इतर प्रसारमाध्यमे प्रचार करत आहेत. एक गोष्ट जिच्यावर ते जोर देत नाहीयेत, आणि जी खरी महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की ऋषी सुनाक हा युकेचा पहिला इन्व्हेस्टमेंट बॅंकर (गुंतवणुक संदर्भात सल्ला देणारा तज्ञ) प्रधानमंत्री आहे. ऋषी सुनाकने गोल्डमन सॅक्स या जगातील प्रचंड मोठ्या अश्या अमेरिकन "गुंतवणूक बॅंके"त (इन्वेस्टमेंट बॅंक) काम केले आहे. त्याने इंग्लंडमध्ये संसद-सदस्य होण्याअगोदर 14 वर्षे या क्षेत्रात काम केले आहे. त्याला प्रधानमंत्री करण्याचा ब्रिटनच्या कंझर्वेटीव्ह पार्टीसाठी अर्थ हिंदु वा आशियाई वा भारतीय व्यक्तीचे प्रधानमंत्री करणे नाहीये तर वित्तीय भांडवलाच्या एका प्रतिनिधीला प्रधानमंत्री करणे हा आहे. कंझर्वेटीव्ह पक्षातून ऋषी सुनाक यांची दुसऱ्या प्रयत्नात बिनविरोध निवड झाली आहे, **याचा अर्थ आहे ब्रिटनच्या आर्थिक-राजकीय व्यवस्थेवर, सत्तेवर आता बड्या वित्तीय भांडवलदारांचे अत्यंत प्रत्यक्ष नियंत्रण स्थापित होणे.** ऐतिहासिकरित्या पाहिले तर वित्तीय भांडवलदार वर्ग सत्तेला प्रत्यक्ष नियंत्रणापासून एक पाऊल दूर राहत आल्याचे दिसते. परंतु युकेमध्ये डेव्हिड कॅमरून प्रधानमंत्री असताना युरोपियन युनियन मधून युकेने बाहेर पडावे याकरिता झालेल्या "ब्रेक्झिट"च्या सार्वमताचा कौल आल्यानंतर 2016 पासून चालत आलेल्या राजकीय संकटाची परिणती आहे की वित्तीय भांडवलदार वर्गाने आता शासनाची दोरी "करियर राजकारण्यांच्या" हाती न देता, आपल्या स्वत:च्या हाती घेऊन आपला माणूस 10, डाऊनिंग स्ट्रीट येथे बसवला आहे.

ऋषी सुनक यांनी "येणारे निर्णय कठीण असतील" असा इशारा दिला आहे, कारण युकेची अर्थव्यवस्था अत्यंत बिकट स्थितीला जाऊन पोहोचली आहे. याच बिकट अर्थव्यवस्थेला कसे सावरावे याबद्दल तेथील भांडवलदार वर्गामध्ये असलेल्या मतभेदाचा परिणाम आहे की यूकेने गेल्या आठ आठवड्यांत तिसऱ्या प्रधानमंत्री नेमला आहे. यापूर्वीच्या 45 दिवसांत (यूकेच्या इतिहासातील पंतप्रधान म्हणून सर्वात लहान कार्यकाळ) सुनाकच्या पूर्ववर्ती लिझ ट्रस सत्तेवर असताना, राणी एलिझाबेथ द्वितीयच्या मृत्यूने एक पर्व संपले असताना ट्रसच्या "छोट्या-अर्थसंकल्पा"मुळे वाढलेल्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. परिणामी लिझ ट्रसच्या वरिष्ठ मंत्र्यांनी एकामागून एक राजीनामे दिले आणि लिझ ट्रसना सुद्धा राजीनामा द्यावा लागला.

सुनाक यांची निवड ब्रिटनच्या संसदेत बहुमत असलेल्या कंझर्वेटीव्ह (परंपरावादी) पार्टीने एकमताने केली आहे. लिझ ट्रसच्या विरोधात सुनाक पहिल्या प्रयत्नात निवडणूक हरले होते, परंतु लिझ ट्रसच्या राजीनाम्यानंतर इतर उमेदवारांच्या अयशस्वी प्रयत्नांनंतर कंझर्व्हेटीव्ह पक्षाने सुनाकला एकमताने निवडले आहे. सुनाक स्वत: युके मधील सर्वाधिक श्रीमंत व्यक्तींपैकी एक आहे. त्यांची एकूण संपत्ती अंदाजे 73 कोटी पौंड असावी असा अंदाज आहे. सुनाक भारतातील इन्फोसिस कंपनीचे संस्थापन नारायण मूर्ती यांचे जावई आहेत. त्यांची करोडपती पत्नी अक्षता मूर्ती युकेमध्ये 'नॉन-डोमिसाईल' (अनिवासी) म्हणून स्थान धरून आहे, जेणेकरून तिला तिच्या वडिलांच्या आय.टी. साम्राज्यातून मिळणाऱ्या लाभांशाच्या (डिव्हिडंड) कोट्यवधींच्या कमाईवर टॅक्स वाचवता यावा. इन्फोसिस निगडीत शेअर्स



मधून तिला गेल्या वर्षी 1.16 कोटी पौंड नफा झाला होता. **'अनिवासी' दर्जा म्हणजे ब्रिटीश भांडवलदार वर्गाने कर द्यावा लागू नये म्हणून स्वत:करिता निर्माण केलेली एक कायदेशीर पळवाटच आहे.** या नियमानुसार एखाद्याला 'अनिवासी' दर्जा दिला जाऊ शकतो जर असा व्यक्ती युके मध्ये रहात असेल, पण त्याचा "घरी" परतण्याचा इरादा असेल. अशा लोकांना परदेशी झालेल्या कमाईवर युकेमध्ये कर भरावा लागत नाही. असे म्हणणे की युकेच्या प्रधानमंत्र्याच्या पत्नीला युकेमध्ये रहायचे नाहीये ही एक विडंबनाच आहे! परंतु ब्रिटीश भांडवलदार वर्गाला आणि त्याच्या विश्वासू कंझर्वेटीव्ह पार्टीला यामुळे फरक पडण्याचे कारणच नाही, कारणे सुनाक आणि त्याची पत्नी हे दोघेही या वर्गाचे विश्वासू साथीदार आहेत.

भांडवलदार वर्गाने "राष्ट्रा"ची कल्पना निर्माण केली जेणेकरून एका भूभागावर राष्ट्र-राज्य म्हणून संघटित होताना त्याला संसाधने आणि बाजारावर नियंत्रण ठेवता यावे, परंतु जगाच्या स्तरावर व्यापाराचा विस्तार करणाऱ्या भांडवलदारांना नफ्यासाठी राष्ट्र कल्पना कधीच आडवी येत नाही. वंश, रंगाचे भेद भांडवलदारांनी कामगार वर्गात भेद करण्यासाठी वापरले, परंतु कामगार वर्गाविरोधात एकत्र येताना भांडवलदार मात्र हे भेद दूर सारून एकत्र येतात. ऋषी सुनाक हा अशाच आंतरराष्ट्रीय भांडवलदार वर्गाच्या 'कॉस्मोपोलिटन' ('बहुसांस्कृतिक') संस्कृतीचा प्रतिनिधी आहे. परंतु भारतातील अनेक प्रसारमाध्यमांनी मात्र त्याचे हे वर्गीय चरित्र लपवण्यासाठी आततायी प्रचार चालवला आहे, इथपर्यंत की काहींनी म्हटले की भगतसिंहाच्या शहादतीचा बदला घेतला गेला आहे, किंवा भुऱ्या भारतीयांनी गोऱ्या इंग्रजांवर विजय मिळवला आहे.

वास्तवामध्ये ऋषी सुनाकचे प्रधानमंत्री बनणे हे युकेमधील गेल्या 6 वर्षात वाढलेल्या राजकीय गोंधळाची परिणती आहे, ज्यामध्ये तेथील भांडवलदार वर्ग भांडवलशाहीने निर्माण केलेल्या आर्थिक संकटाचा सामना करण्यात आटापीटा करत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर नफ्याच्या घसरत्या दराने निर्माण केलेल्या आर्थिक संकटात ब्रेक्झिटने जी भर टाकली, तिच्यानंतर युकेची अर्थव्यवस्था पूर्णपणे गडबडली आहे. अशातच बोरिस जॉन्सन यांच्या प्रधानमंत्री पदावरून झालेल्या गच्छंतीनंतर प्रधानमंत्री पदावर आरूढ झालेल्या लिझ ट्रस यांची कारकीर्द अधिकच वादग्रस्त ठरली आणि ऋषी सुनाक हाच सर्वमान्य पर्याय बनत गेला. लिझ ट्रस यांनी अर्थव्यवस्थे संदर्भात घेतलेल्या आपत्तीजनक निर्णयांमुळे वित्तीय भांडवलदार वर्गाचा भरवसा त्यांवरून उडाला आणि त्यांनी 45 दिवसांच्या काळातच आपले वजन ऋषी सुनाकच्या पारड्यात वाढवले. ट्रस कर-कपात आणि वेगवान-विकासाचे आश्वासन देत कंझर्वेटीव्ह पार्टीच्या नेतृत्वस्थानी आल्या होत्या. याचा खरा अर्थ होता धनदांडग्यांसाही कर-कपात आणि त्यांच्याच उत्पन्नात वेगाने वाढ. प्रधानमंत्रीपदी आरूढ झाल्यावर लिझ ट्रस यांचे अर्थमंत्री (चान्सलर) क्वासी क्वारतेंग यांनी श्रीमंतांवर असलेल्या सर्वाधिक कराचा टप्पा रद्द करणारे 'पॅकेज' जाहीर केले. करकपातीसहीत त्यांनी मोठ्या प्रमाणात कर्जाची तरतूद केली होती. यामुळे राजकीय असंतोष वाढू लागला आणि "बाजार" भडकले. पौंडाचा दर कोसळला, युकेचे कर्ज वाढले, व्याजाचे दर वाढले आणि अगोदरच भडकलेल्या महागाईत भर पडली आणि राजकीय असंतोष वाढू लागला. बॅंक ऑफ इंग्लंडला अब्जावधी खर्च करून पेंशन बाजार स्थिर करावा लागला. परिणामी ट्रस यांना सर्व पावले माघारी घ्यावी लागली, क्वार्तेंग आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकीतून धावत परत आले ते पदच्युत व्हायला. यानंतर ट्रस यांनी जेरेमी हंट यांना नवीन चान्सलर नेमले, परंतु हंट यांनी सर्व निर्णय फिरवावे लागतील असे सूतोवाच केले आणि लिझ ट्रसची पकड संपली आहे हे स्पष्ट झाले. यानंतर ट्रस यांचा राजीनामा फक्त औपचारिकता उरली होती.

युके मध्ये चालू असलेल्या राजकीय उलथापालथींच्या मूळाशी तेथील अर्थकारणात चाललेले संकट आहे. भांडवलशाहीमध्ये दीर्घकाळात नफ्याचा दर घसरत जातो आणि "विकास" थंडावतो व आर्थिक संकट उभे राहते. आणि ब्रिटनसहीत जगभरातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांसमोर आज नफ्याच्या दराच्या घसरणीचे संकट उभे आहे आणि त्यामुळेच अर्थव्यवस्था आणखी एका महामंदीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपल्या आहेत. या संकटाच्या लागलेल्या चाहूलीचाच परिणाम होता ब्रेक्झिटचा निर्णय. अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अमेरिकेच्या बाजूने जास्त युत्या कराव्यात की युरोपियन युनियनच्या आर्थिक महासंघासोबत कराव्यात याबद्दल ब्रिटनच्या भांडवलदार वर्गामध्ये दोन गट उभे राहिले. अमेरिकन भांडवलदारांचा गट विरूद्ध युरोपियन भांडवलदारांचा गट यापैकी निवडीचे हा मुद्दा होता. या मतभेदांच्या परिणामी 2016 साली ब्रिटनने युरोपियन युनियनस सोडण्याचा (ब्रेक्झिट) निर्णय घेतला. परंतु या निर्णयाने भांडवलदारांच्या एका गटासमोर आह्वाने उभी राहिली कारण की तोपर्यंत युरोपियन युनियनसोबत खुला व्यापार असल्यामुळे या गटालाही व्यापाराची संधी होती, परंतु आता युरोपियन युनियन मधील देशांसोबत पुन्हा वाटाघाटी करून करार करावे लागत होते. या मतभेदाचे पडसात ब्रिटीश भांडवलदारांचीच सेवा करणाऱ्या कंझर्व्हेटीव्ह आणि मजूर पक्षातही (जो फक्त नावालाच मजूर पक्ष आहे!) पडले. कंझर्वेटीव्ह पार्टीच्या डेव्हिड कॅमेरून आणि थेरेसा मे या गेल्या सहा वर्षातील 5 पैकी असलेल्या दोन माजी प्रधानमंत्र्यांसहीत अनेकजण युरोपियन युनियनच्या बाजूचे होते, आणि ऋषी सुनाक सहीत इतर अनेक ब्रेक्झिटच्या बाजूचे. स्वत:ला मजुरांचा पक्ष म्हणवणाऱ्या परंतु वास्तवात भांडवलदारांच्याच एका गटाचे प्रतिनिधित्व करत "सेफ्टी व्हॉल्व" चे काम करणाऱ्या मजुर पक्षातही हे दोन गट पडलेले होते. आर्थिक संकटाच्या परिणामी उद्भवलेला भांडवलदार वर्गाच्या दोन प्रमुख गटांमधील अंतर्विरोधच राजकीय अंतर्विरोधात परिणत होऊन समोर येत आहे.

**आर्थिक संकटाच्या परिणामी उद्भवलेला भांडवलदार वर्गाच्या दोन प्रमुख गटांमधील अंतर्विरोधच राजकीय अंतर्विरोधात परिणत होऊन समोर येत आहे.**

ही आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ब्रिटनमधील भांडवलदार वर्ग जास्त "लायक", जास्त "आर्थिक समजदारी' असलेल्या ऋषी सुनाककडे आशा लावून आहे. ऋषी सुनाक या परिस्थितीमध्ये वित्तीय भांडवलदार वर्गाला वाटणारा सर्वात "लायक" पर्याय म्हणून प्रधानमंत्री झाला आहे, ना की भारतीयांप्रती वा हिंदूंप्रती वा आशियन लोकांप्रती कोणत्याही परोपकाराच्या, दयेच्या भावनेने किंवा त्यांची मते ध्यानात ठेवून! ऋषी सुनाकचे सत्तेवर येणे निश्चितपणे युकेमधील कामगार वर्गाकरिता अधिक धोक्याची घंटा आहे. वित्तीय भांडवलासारख्या तुलनेने अधिक पतनशील भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा सुनाक निश्चितपणे अशीच पावले उचलेल जी कामगार वर्गावर करांचा बोजा वाढवेल, कल्याणकारी खर्च कमी करेल, आणि जनतेचा पैसा भांडवलदारांच्या खिशाकडे वळवेल. भांडवलदार वर्ग कोणत्याही "राष्ट्रीय" उत्तरदायित्वाने काम करत नाही तर नफ्याच्या प्रेरणेने काम करतो. ब्रिटनमधील भांडवलदार वर्गाने त्यामुळेच ऋषी सुनाक सारख्या अर्थकारणात मुरलेल्या व्यक्तीला नेता निवडले आहे.

हे सुद्धा विसरता कामा नये की युके मधील हा राजकीय अंतर्विरोध कोणत्याही प्रकारे राज्यसत्तेकरिता आव्हान बनू शकत नाही कारण की पर्याय देऊ शकणारा कामगार वर्गाचा क्रांतिकारी पर्याय आज युकेमध्ये उभा नाही. हा पर्याय उभा करणे हा युके सहीत जगभरातील सर्व देशांमध्ये कामगार वर्गासमोर प्रमुख कार्यभार आहे.

# मोदी सरकारची रोजगार भरती : एक धूळफेक

✍परमेश्वर

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 22 ऑक्टोबर रोजी टीव्हीवर रोजगार मेळावा घेतला. या रोजगार मेळाव्यामध्ये त्यांनी नेहमीप्रमाणे अनेक खोटी आश्वासने दिली. दिवाळी नंतर केंद्र सरकार विविध खात्यात 50,000तरुण-तरुणींना शासकीय नोकरीचे नियुक्ती पत्र देणार असल्याचे आणि त्यापुढील दीड वर्षात दहा लाख शासकीय रोजगार देणार असल्याचे जाहीर केले गेले. केंद्र सरकारच्या विविध खात्यात रिकाम्या असलेल्या वर्ग एक, दोन आणि तीनच्या रिक्त जागा भरल्या जातील असे घोषित केले गेले आहे. हे विसरू नये की 2014 च्या निवडणुकीत दरवर्षी दोन कोटी रोजगार देणार असल्याचे आश्वासन देत मोदी सरकार सत्तेत आले होते. हे आश्वासन एक ‘जुमला’ होते हे तर जनता चांगलीच समजली आहे, परंतु सध्या एका महिन्यात हिमाचल प्रदेश आणि गुजरात राज्यातील निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मोदी सरकार केंद्रातील शासकीय नोकरी भरतीचे गाजर दाखवत आहे. खरेतर मागील आठ वर्षाचा मोदी सरकारचा इतिहास पाहिला तर या सरकारची बांधिलकी फक्त भांडवलदार वर्गाप्रती आहे आणि हे सरकार जनद्रोही आहे हे स्पष्ट आहे.

### केंद्र शासनाच्या अखत्यारीतील खात्यांमध्ये बेरोजगारीची स्थिती

केंद्र सरकारच्या अखत्यारीत विविध खाती आहेत. यापैकी रेल्वे, पोस्ट, संरक्षण, बँक अशा अनेक विभागांमध्ये मोठ्या संख्येने रोजगाराची संधी असते असा भ्रम आहे. वास्तवात गेल्या 30 वर्षांमध्ये आणि विशेषत: मोदी सरकार सत्तेत आल्यापासून, खाजगीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय भरती जवळपास बंदच केली गेली आहे. रेल्वे हे शासकीय क्षेत्रात सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र आहे असे मानले जाई. पण मागील आठ वर्षांमध्ये मोदी सरकारने रेल्वे खात्यात भरती कमी केली आहे, रिकाम्या जागा भरल्या जात नाहीयेत. केंद्र सरकारच्या रेल्वे विभागाने एकूण 35 हजार जागांची जाहिरात दिली होती. त्यासाठी एकूण 1 कोटी 25 हजार इतके अर्ज आले होते. आलेले नोकरीसाठीचे अर्ज वेळेत न स्विकारणे, परीक्षा गोंधळ यामुळे मोठया प्रमाणत अर्जदारांनी अंदोलन केले. 4 फेब्रुवारी 2022 रोजी मोठया प्रमाणात बिहारमध्ये रेल्वे भरतीचा गोधळ निर्माण झाल्यामुळे अंदोलन झाले. भरती न करण्याबाबतच्या धोरणाचा राग मोठया प्रमाणात युवकांमध्ये आहे. 1999 ते 2000 पर्यत एकूण रेल्वे खात्यात 16 लाख कर्मचारी काम करत होते. ही संख्या कमी होत गेली आणि त्या जागी 2009 -10 या कालावधीत 13,61,519 इतके कर्मचारी राहिले. 2018-19 मध्ये 12,70,399 इतके कर्मचारी राहिले. म्हणजे 16 लाख जे कर्मचारी होते. त्यापैकी आता 12-13 लाख इतकेच कर्मचारी काम करतात. निवृत्त झालेल्या जागी नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलीच जात नाही. जी होते, ती भरती कमी प्रमाणात आणि




कंत्राटीकरणाच्या आधारे होते. केंद्रातील रेल्वे खात्यात गट सी आणि डी ची जवळपास तीन लाख पदे रिकामी आहेत. पण केंद्राकडून या पदांसाठी कोणतीही जहिरात दिली जात नाही. गट सी वरिष्ठ विभाग अभियंता, लोकोमोटिव्ह पायलट, तिकीट बुकिंग क्लर्क, रेल्वे तिकीट परीक्षक, स्टेशन मास्टर इ. गट डी पदांमध्ये हेल्पर, गँगमन, ट्रॅकमन, वेल्डर, फिटर आणि पोर्टर यांचा समावेश होतो. या वर्गातील जी पदे आहेत त्यांचीसुद्धा नियमित आणि पूर्ण भरती केली जात नाही. जी भरती केली जाते ती सुद्धा कंत्राटी तत्वावर केली जाते. रेल्वे खात्यातील जी वरिष्ठ पदे आहेत, त्यांची सुद्धा अशीच परिस्थिती आहे. एकूनच केंद्रातील सर्व खात्यातील नियमित पदभरती प्रकिया जवळपास बंद आहे.

आता यापुढे जाऊन सरकारने मिशन अग्निपथ अंतर्गतलष्करी भरतीचे कंत्राटीकरण सुरू केले आहे. ही योजना जाहीर होण्यापूर्वी भारतीय लष्करातील भरती हि नियमित स्वरूपात होत असे. भारतीय सैन्यात भरती झालेल्या सैनिकाला नियमित वेतन, पेन्शन आणि दीर्घकालीन सेवेचा लाभ मिळत असे. पण मिशन अग्निपथ योजनेअंतर्गत एकूण रोजगाराची संधी ही फक्त चार वर्षासाठी असणार आहे. त्यानंतर लष्करी सेवेतून निवृत्त केले जाईल. काही जणांना पुढे घेतले जाईल की नाही हे कंत्राटदाराच्या गरजेनुसार ठरवले जाईल. पेंशन, वैद्यकीय सुविधा अशा विविध कल्याणकारी योजना बंद केल्या आहेत. मोदी सरकार 2014 पासून सत्तेत आल्यापासून ते आतापर्यत एकूण आठ वर्षाच्या कालावधीत एकूण 22 कोटी कामकऱ्यांनी शासकीय नोकरीसाठी अर्ज केला. त्यापैकी फक्त 7 लाख जणांना रोजगार मिळाला आहे. म्हणजे एकूण रोजगारासाठी अर्ज करण्याऱ्या बेरोजगारांपैकी फक्त 1 टक्क्येपेक्षा कमींना नोकरी मिळाली आहे. फॅसिस्ट मोदी सरकारच्या काळात कधी नव्हे इतकी बेरोजगारी वाढली आहे.

### दोन राज्यातील निवडणूक आणि बेरोजगारी

या महिन्यात गुजरात, हिमाचल प्रदेश राज्याची निवडणूक होत आहे. दोन्ही राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार अस्तित्वात आहेत. राज्यातील निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विविध निवडणुकीबाज पक्षाकडून विविध कळीचे मुद्दे उचलले जात आहे. त्यापैकी बेरोजगारी हा एक कळीचा प्रश्न आहे. हिमाचल प्रदेशात मोठया प्रमाणात बेरोजगार कामकऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. देशातील एकूण कामकरी बेरोजगारांचे प्रमाण 7.8 टक्के इतके आहे, तर हेच हिमाचल राज्यातील प्रमाण 9.5 टक्के इतके आहे. जवळपास दोन लाख चार हजार लोक बेरोजगार आहेत. त्यापैकी एकूण बेरोजगार कामकरीपैकी सर्वाधिक प्रमाण तरुण वयोगटाचे आहे. दोन लाखांपैकी जवळपास एक लाख 76 हजार बेरोजगार हे वयोगट 20 ते 29 मधील आहेत. म्हणजे हिमाचल राज्यातील तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. हे सुद्धा विसरता कामा नये की लाखांमधली आकडेवारी अधिकृत सरकारी आकडेवारी आहे, खरा आकडा तर यापेक्षा अनेक पटींनी मोठा आहे, कारण मजबुरीने छोटी-मोठी कामे घेणाऱ्या, अनियमित काम करणाऱ्या, नाईलाजाने “स्वरोजगार” करणाऱ्यांना तर बेरोजगार मानलेच जात नाही.

गुजरात राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. तिथे मोठ्या प्रमाणात मोठमोठे उद्योग अस्तित्वात आले असले, तरी बेरोजगारीचे सापेक्ष प्रमाण मोठे आहे. गुजरात राज्यातील बेरोजगारीचे एक उदाहरण घ्याचे झाले तर तलाठी या पदासाठी गुजरात सरकारने 3400 जागांची जाहिरात दिली होती आणि त्या पदासाठी 17 लाख अर्ज आले होते. असलेल्या “कंत्राटी” पद्धतीच्या सरकारी कर्मचाऱ्यांची स्थिती अशी आहे की गुजरात राज्यातील अंगणवाडी कामगारांना सुद्धा मोठ्या प्रमाणत वेतन वाढीसाठीच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे आणि त्यांनी वेतन वाढीसाठी मोठे आंदोलन केले होते. नोटबंदी आणि टाळेबंदी यामुळे बेरोजगारीत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. पण यामुद्द्याला भरकटवण्यासाठी भाजप सरकारने मोठ्या प्रमाणात हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण केले आहे. ग्रामीण भागात बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.गुजरात सरकारने मोठया प्रमाणात असलेल्या बेरोजगारीची आकडेवारी समोर येऊच दिलेली नाही. अचूक आकडेवारी दडपून टाकणे, कामगारांचे संघर्ष दाबणे अशा घटना नेहमीच फॅसिस्ट गुजरात सरकार आणि केंद्र सरकार मिळून करत आहे.

एकंदरीत मोठ्या प्रमाणात शासकीय नोकऱ्यांमध्ये कपात करणे, अस्तित्वात असलेली पदे कमी करणे, कंत्राटी भरती चालू करणे, आणि हे सर्व करत असताना जनतेला धर्माच्या आणि जातीच्या नावाने ताण तणाव निर्माण करून, दंगली पेटवून, धार्मिक उन्माद भडकवून भरकटवत असताना, आपल्या पोशिंद्या भांडवलदार वर्गाच्या नफ्याची सतत काळजी घेणे, हेच मोदी सरकारचे काम आहे!

जी गुजरात राजस्थानची स्थिती आहे, तीच स्थिती आज जगात आणि भारतात सर्वत्र आहे. गरिबीमध्ये मोठया प्रमाणत वाढ झाली आहे. महागाई तर आज शिगेला पोहचली आहे. या सर्वांची किंमत जगातील, देशातील कामकरी जनतेकडून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या वसूल केली जात आहे. महागाई, बेरोजगारी आणि गरिबीत झालेल्या अभूतपूर्व वाढीचा परिणाम म्हणजे मागील पंधरा वर्षापेक्षा जास्त काळात जगाला आणि भारताला आर्थिक संकटातून जावे लागत आहे. आर्थिक संकट हे दुसरे तिसरे काही नसून भांडवलदार वर्गाच्या नफ्याच्या भूकेचा परिणाम आहे. भांडवलदार वर्गाची नफ्याची भूक ही कामकरी जनतेचे रक्त शोषूनच पूर्ण केली जाते. भांडवलदार वर्गाला वाढता नफा मिळाला पाहिजे यासाठी साठी लेबर कोड निर्माण करून कामगार वर्गाकडून 14 ते 16 तास काम करून घेणे, कमी मजुरीवर काम करवणे, अन्न-धान्यावर जीएसटी लावून महागाई वाढवणे, नोटबंदी, कामगार कपात करून बेरोजगारी वाढवणे अशी अनेक जनविरोधी धोरणे भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फॅसिस्ट मोदी सरकारने राबवली आहेत. या पार्श्वभूमीवर जनतेच्या असंतोषाच्या आगीवर पाण्याचे थेंब शिंपडण्यासाठी, पुन्हा एकदा जनतेला भरकटवण्यासाठी, 22 ऑक्टोबर रोजी मोदी सरकारने रोजगार मेळावा आयोजित केला होता. शासकीय नोकरी देणार असल्याचे भासवून आपल्या जनविरोधी आणि भांडवलधार्जिण्या चेहऱ्याला मुलामा देण्याचा प्रयत्न याद्वारे केला आहे.

# कविता कृष्णन: सर्वहारा वर्गाची नवीन गद्दार

पान 15 वरून

अपूर्वानंद आणि अशोककुमार पांडेसारखे घोर कम्युनिस्टविरोधी पतित लेखक-बुद्धिजीवी तिची प्रशंसा करत आहे यात काही नवल नाही.

कविता कृष्णन यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितले की, तिने माओवादी चीनबद्दल अजून अभ्यास केलेला नाही. म्हणून, चीनवर हल्ला करताना, ती मोठ्या चलाखीने चीनच्या सध्याच्या दुरुस्तीवादी राज्याच्या निरंकुश चारित्र्याचा उल्लेख करून मार्क्सवादावर हल्ला करते. माओकालीन चीनबद्दल जाणून घेण्यासाठी एडगर स्नो, विल्यम हंटन आणि स्टुअर्ट श्रॅम यांसारख्या प्रामाणिक लेखकांची पुस्तके वाचण्याऐवजी ती अमेरिकेच्या साम्राज्यवादी स्त्रोतांवर अवलंबून आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. असो, अशा बौद्धिक खुज्या व्यक्तीकडून कायच अपेक्षा केली जाऊ शकते जी ‘आयटम सॉन्ग’ला स्त्रीमुक्तीचा मार्ग म्हणून पाहते आणि ‘सरकाय लो खटिया’ सारख्या गाण्यांना स्त्रियांच्या लैंगिकतेची अभिव्यक्ती मानते? अशी व्यक्ती सीपीआय(एमएल) लिबरेशन सारख्या पतित झालेल्या दुरुस्तीवादी संघटनेतच इतकी वर्षे राहू शकली असती आणि आता ती प्रतिगामी छावणीत उभी राहून मार्क्सवाद आणि सर्वहारा वर्गाला कलंकित करण्याचा प्रयत्न करत असेल तर यात नवल काही नाही. कविता कृष्णन यांनी स्वतःसाठी अस्मितावाद, एनजीओ राजकारण आणि साम्राज्यवादाची बौद्धिक दलाली करण्याचा मार्ग उघडला आहे आणि तोच मार्ग अशा पतित लोकांसाठी योग्य आहे. सर्वहारा वर्गाकडे अशा लोकांसाठी घृणेशिवाय दुसरे काहीही असू शकत नाही.

(अनुवाद: जयवर्धन)

(मूळ लेख: मजदूर बिगुल, ऑक्टोबर 2022)

# कविता कृष्णन: सर्वहारा वर्गाची नवीन गद्दार

पान 1 वरून

आणि पुराव्यांसहित वास्तविकता जाणून घेऊ.

### कविता कृष्णन यांनी फेकलेला शाब्दिक चिखल अमेरिकन साम्राज्यवादी दुष्प्रचाराच्या घाणीपासून बनलेला आहे.

कविता कृष्णन म्हणतात की, अलीकडच्या काळात त्यांनी सखोल अभ्यास (!) केला आहे, ज्यानंतर त्या या निष्कर्षाप्रत आल्या आहेत की सोव्हिएत युनियन आणि चीनच्या सर्वहारा राजवटींची गणना जगातील सर्वात क्रूर निरंकुश राजवटींमध्ये व्हायला हवी, ज्या अजूनही जगभर निरंकुश शक्तींसाठी एक मॉडेल म्हणून काम करतात. पण तिच्या दाव्यांकडे एक नजर टाकली तरी हे स्पष्ट होते की तिला ही सडलेली आणि खोटी बौद्धिक खुराक अमेरिकन साम्राज्यवादी दुष्प्रचाराच्या विशाल नेटवर्कमधून मिळाली आहे. आज सोव्हिएत युनियन आणि स्टॅलिनबद्दल ती जे काही बोलत आहे, ते अमेरिकन साम्राज्यवादी दुष्प्रचार तंत्र शीतयुद्धाच्या काळापासून सतत प्रसारित करत आले आहे. ट्रॉट्स्की आणि ख्रुश्चेव्हसारख्या सर्वहारा वर्गाच्या गद्दारांच्या कृत्यांव्यतिरिक्त, रॉबर्ट कॉन्क्वेस्ट, सोलझेनित्सिन आणि रॉय मेदवेदेव सारख्या साम्राज्यवादी दलालांनी देखील या काल्पनिक असत्याच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

समकालीन काळाची गोष्ट करता, कविता कृष्णनच्या दाव्यांचे मुख्य स्रोत टिमोथी स्नायडर सारखे सेलिब्रिटी इतिहासकार आणि ॲन ॲपलबॉम आणि टॉम निकोल्स सारखे असे पुराणमतवादी प्रतिगामी लेखक आहेत ज्यांनी अफगाणिस्तान, इराक आणि लिबियावर अमेरिकन साम्राज्यवादी हल्ल्यांचे समर्थन केले होते. कविता कृष्णन निर्लज्जपणे या साम्राज्यवादी दलालांचे ट्विट तिच्या ट्विटर प्रोफाइलवरून नियमितपणे रि-ट्विट करते. लिबरेशनपासून फारकत घेण्याचा निर्णय जाहीर करण्याच्या एक दिवस आधी, तिने सर्वहारा वर्गाचा आणखी एक गद्दार गोर्बाचेव्ह यांना श्रद्धांजली अर्पण करत व त्याचे गोडवे गात ॲपलबॉम आणि निकोल्सचे लेख शेअर केले. हा तोच गोर्बाचेव्ह आहे जो सोव्हिएत युनियनमधील कामगार वर्गाचा विश्वासघात करणाऱ्या सर्व दुरुस्तीवाद्यांचा शेवटचा दुवा होता आणि अत्यंत घृणास्पद व्यक्ती होता.

टिमोथी स्नायडरच्या बाबतीत बोलायचे तर कोणताही गंभीर बुर्झ्वा इतिहासकारसुद्धा त्याला गांभीर्याने घेत नाही आणि 2010 मध्ये प्रकाशित झालेल्या त्याच्या 'ब्लडलँड: युरोप बिटवीन हिटलर आणि स्टॅलिन' या पुस्तकात त्याने केलेले हास्यास्पद दावे आणि खोटेपणा अमेरिकन इतिहासकार ग्रोव्हर फर यांनी आपले पुस्तक 'ब्लड लाईज'मध्ये उघड केला आहे. कविता कृष्णनच्या फेसबुक वॉलवर जर कोणी स्नायडर, ॲपलबॉम किंवा निकोल्स सारख्या अमेरिकन साम्राज्यवादी दलालांचे वास्तव उघड केले तर तिच्याकडे उत्तर नसते आणि अशा लोकांना ब्लॉक करण्याची धमकीसुद्धा देते. यावरून देखील हे स्पष्ट होते की ती आता केवळ जाणीवपूर्वक गद्दारीच नव्हे तर निर्लज्ज बेइमानी आणि उद्धटपणा करण्यापर्यंत घसरली आहे.

भारतात कविता कृष्णन यांचे प्रेरणास्थान बालगोपाल यांच्यासारखे मानवाधिकार कार्यकर्ते आणि विचारवंत आहेत, जे एकेकाळी माओवाद्यांचे हितचिंतक होते, पण नंतरच्या काळात त्यांचा मार्क्सवादापासून भ्रमनिरास झाला आणि सर्व प्रकारच्या हिंसाचारावर त्यांनी निरपेक्षपणे टीका केली. मार्क्सवादाचा सर्वात मोठा दोष म्हणजे तो मानवी स्वभाव समजत नाही असे बालिश आणि हास्यास्पद दावे त्यांनी केले! असा मूर्खपणाचा आणि अवैज्ञानिक दावा करण्यासाठी पुरेसे मूर्ख असणे आवश्यक आहे. मानवी स्वभाव ही नैसर्गिक गोष्ट नाही आणि मार्क्सवाद दाखवतो की मानवी स्वभाव हा समाजाची प्रकृती आणि चरित्रापासून स्वतंत्र काहीही असू शकत नाही. एका वर्गीय समाजात सामान्यपणे वर्गीय प्रवृत्ती आणि चरित्राबद्दलच बोलले जाऊ शकते. खाणे, पिणे आणि मलमूत्र त्यागणे या नैसर्गिक स्वभावा किंवा 'इन्स्टिंक्ट' व्यतिरिक्त, मानवी बाळ इतर काहीही जन्मतः घेऊन येत नाही. इतर सर्व मूल्ये आणि विचार संगोपनाच्या वेळीच त्याच्यामध्ये समाजातच तयार होतात, ज्या समाजातील (आदिम टोळी समाज वगळता) सर्वात मोठे वास्तव हे असते की तो वर्गांमध्ये विभागलेला असतो. हा मूर्ख बालगोपाल आता आणखी एका मूर्ख आणि गद्दार कविता कृष्णनसाठी प्रकाशस्तंभ बनला आहे यात आश्चर्य नाही. समान पंख असलेले पक्षी एकमेकांना शोधतातच.

### आता कविता कृष्णन यांनी काय दावे केले आहेत आणि त्यांचे सत्य काय आहे ते पाहू.

### कविता कृष्णन यांच्या दाव्यांची सत्यता

'मार्क्सवादावर चिखलफेक करा' या मोहिमेअंतर्गत कविता कृष्णन यांची रणनीती, स्टॅलिनच्या काळात सोव्हिएत युनियनमध्ये झालेल्या अत्याचारांबद्दल अमेरिकन साम्राज्यवादी खोटेपणाची पोपटाप्रमाणे पुनरावृत्ती करण्याची, तसेच सध्याच्या चीनला कम्युनिस्ट म्हणून त्याच्या सामाजिक फॅसिस्ट आणि साम्राज्यवादी दुष्कृत्यांना कम्युनिझमच्या नावाने खपवण्याची आहे. इतकेच नाही तर ती टिमोथी स्नायडरची युक्ती वापरून हास्यास्पदपणे सध्याच्या युक्रेन युद्धामुळे युरोपमध्ये तयार झालेल्या परिस्थितीची दुसऱ्या महायुद्धातील परिस्थितीशी तुलना करते आणि पुतीन आणि स्टॅलिन यांना एकाच गटात टाकते जेणेकरून पुतिनच्या कारवायांच्या आडून संपूर्ण कम्युनिझमला बदनाम करता येईल. या प्रक्रियेत, ती "साम्राज्यवाद" आणि "फॅसिझम" सारखे शब्द अत्यंत चलाख रीतीने वापरते, जे कि मार्क्सवादाच्या मूलभूत संकल्पनांबद्दलचे तिचे आणि अज्ञान आणि मूर्खपणाच दर्शवते.

कविता कृष्णन करत असलेल्या बहुतांश दाव्यांचे उत्तर अनेक मार्क्सवादी आणि लेखक-इतिहासकार जसे की लुडो मार्टेन्स, ग्रोव्हर फर, मारियो सुसो यांनी फार पूर्वीच दिलेले असले, तरी या खोटारडेपणाच्या पुंजक्यांचा परिणाम सोव्हिएत युनियनच्या इतिहासाबद्दल अज्ञात, बेसावध परंतु गंभीर लोकांवर पडतो त्यामुळे त्यांचे मुद्देसूद उत्तर देणे गरजेचे आहे.

### दावा क्रमांक 1: 'स्टालिनच्या नेतृत्वाखाली सोव्हिएत युनियनमध्ये एक सर्वसत्तावादी राज्य अस्तित्वात होते'

स्टालिनकालीन सोव्हिएत राज्याला हिटलरकालीन जर्मनीप्रमाणे सर्वसत्तावादी म्हणण्याची आणि स्टॅलिनची तुलना हिटलरशी करण्याची खेळी अमेरिकन साम्राज्यवादाने शीतयुद्धाच्या काळापासून अवलंबली आहे. याची सुरुवात अमेरिकन साम्राज्यवादाची बौद्धिक एजंट हाना आरेन्ट हिने केली होती. सर्वसत्तावाद हा शब्द तिनेच रचला आणि सांगितले की एकीकडे भांडवली लोकशाही आहे आणि दुसरीकडे सर्वसत्तावाद आहे, ज्याच्या दोन आवृत्त्या आहेत: फॅसिझम आणि कम्युनिझम. तेव्हापासून या मूर्खपणाची पुनरावृत्ती नोम चॉम्स्की सारख्या अराजकतावाद्यांपासून कविता कृष्णन सारखे सर्वहारा वर्गाचे गद्दार करत आहेत. ते हे लक्षात घेत नाहीत की भांडवली लोकशाही हे भांडवलदारांच्या हुकूमशाहीचेच दुसरे नाव आहे आणि सर्वहारा वर्गाचे अधिनायकत्व म्हणजे सर्वहारा लोकशाही आहे, ती मोठ्या कामकरी जनतेसाठी लोकशाही आणि लुटारू, व्यापारी, कंत्राटदार, दलाल, श्रीमंत कुलक आणि धनी शेतकरी यांच्यासाठी हुकूमशाही आहे. थोडक्यात, भांडवली लोकशाही म्हणजे अल्पसंख्याकांसाठी लोकशाही आणि बहुसंख्यांसाठी हुकूमशाही, तर सर्वहारा अधिनायकत्व अर्थात सर्वहारा लोकशाही बहुसंख्य श्रमिक लोकांसाठी जास्तीत जास्त स्वातंत्र्य आणि लोकशाही आहे आणि लुटणाऱ्या अल्पसंख्याकांसाठी हुकूमशाही आहे.

हिटलर आणि स्टॅलिनचे एकत्रितपणे हुकूमशहा असे वर्णन करणाऱ्या खोटारडेपणाच्या युक्तीने, अमेरिकन साम्राज्यवाद आणि त्याने फेकलेल्या तुकड्यांवर पोसले जाणारे बुद्धिजीवी आणि लेखक एकाच वेळी दोन शिकार करण्याचा प्रयत्न करतात. एकीकडे हिटलरची हुकूमशाही हे भांडवली हुकूमशाहीचे अत्यंत रानटी रूप असल्याच्या सत्यावर पांघरूण घालून भांडवलशाहीला वाचवले जाते, तर दुसरीकडे सर्वहारा वर्गाची हुकूमशाही एका व्यक्तीची हुकूमशाही म्हणून मांडून समाजवादाबद्दल संभ्रम पसरवला जातो.

सत्य तर हे आहे की स्टॅलिनच्या नेतृत्वाखाली सोव्हिएत युनियनने तीन दशकांत जी अद्भुत सामाजिक-आर्थिक कामगिरी केली ती एका व्यक्तीच्या हुकूमशाहीत शक्यच होऊ शकली नसती. सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाचे सर्व निर्णय स्टॅलिनच्या मतानुसार घेतले जायचे हे पूर्णपणे खोटे आहे. सत्य हे आहे की त्या काळात पक्षांतर्गत विविध मुद्द्यांवर वादविवाद आणि मतदानाच्या माध्यमातून निर्णय घेतले जात होते, जसे की देशांतर्गत समाजवादाचा मुद्दा आणि सामूहिकीकरणाचा मुद्दा. अशा विविध मुद्द्यांवर बहुमताने निर्णय झाल्यानंतरही जे पक्षांतर्गत गटबाजी करून बहुमताच्या विरोधात जात असल्याचे आणि तोडफोडीच्या कारवायासुद्धा करत असल्याचे आढळून आले, अशांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आणि त्यातील अनेकांना त्यांनी चूक असल्याचे मान्य केल्यानंतर पक्षात परतदेखील घेण्यात आले. उदाहरणार्थ झिनोव्हिएव्ह, कामेनेव्ह, एवोदकिमोव्ह, प्रिओब्राझिंस्की आणि राडेक इ. अशा प्रकारे पक्ष हा एका व्यक्तीच्या इशाऱ्यावर चालणारा निर्जीव पक्ष नव्हता.

हे देखील खरे आहे की बोल्शेविक पक्षात नोकरशाही प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढली होती आणि खुशामत करण्याची प्रवृत्ती देखील होती. पण अशा प्रवृत्तींना आणि सवयींना चालना देण्याऐवजी स्टॅलिनने त्यांच्याविरुद्ध संघर्ष पुकारला आणि पक्षांतर्गत लोकशाहीला चालना देण्यावर मोठा भर दिला हे दाखवणारे बरेच लिखित पुरावे उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, यंग कम्युनिस्ट लीगच्या आठव्या काँग्रेसपूर्वी 16 मे 1928 रोजी 'खालपासून टीका संघटित करा' या भाषणात स्टॅलिन म्हणतात, "कम्युनिस्ट नोकरशहा हा सर्वात धोकादायक प्रकारचा नोकरशहा असतो. का? कारण तो आपली नोकरशाही पक्षाच्या सदस्यत्व कार्डाखाली लपवतो. आणि दुर्दैवाने, आपल्यात असे कम्युनिस्ट नोकरशहा मोठ्या संख्येने आहेत."... "अशाप्रकारे पक्षाचे तात्काळ कार्य आहे: नोकरशाहीविरुद्ध तीव्र संघर्ष करणे, खालून टीका संघटित करणे आणि ती ओळखून त्याच्या प्रकाशात आपल्या कमतरता दूर करण्यासाठी व्यावहारिक निर्णय घेणे." ही गोष्ट निराळी की नोकरशाहीला लगाम घालण्याच्या त्यांच्या संघर्षात स्टॅलिन पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाहीत. हे समजून घेणे देखील महत्त्वाचे आहे की समाजवादी समाज हा साम्यवादी समाज आणि भांडवलशाही समाज यांच्यातील दीर्घ संक्रमणाचा काळ असतो, ज्यात बुर्झ्वा वर्ग आणि सर्वहारा वर्ग यांच्यातील संघर्ष नवीन आणि अत्यंत जटिल स्वरूपात सुरू असतो, समाजातील मानसिक श्रम आणि शारीरिक श्रम यांच्यातील फरक अद्याप संपलेला नसतो आणि भांडवली विशेषाधिकारांचा विचार समाजात अजूनही अस्तित्वात असतो. विचारधारा आणि संस्कृतीच्या पटलावर बुर्झ्वा विचारांचा प्रभाव खाजगी मालमत्तेचा नाश करून संपत नाही. त्यामुळे स्टॅलिन किंवा त्यांच्याआधी लेनिन कायदा पारित करून नोकरशाही संपुष्टात आणू शकत नव्हते. प्रश्न त्याविरुद्ध सतत संघर्ष चालू ठेवण्याचा आणि राजकीय वर्गसंघर्ष चालू ठेवण्याचा होता. स्टॅलिनने हा संघर्ष लाक्षणिकरित्या चालवला, परंतु ते हा संघर्ष सैद्धांतिकरीत्या आणि सुसंगतपणे चालवू शकले नाही. परंतु जिथपर्यंत स्टॅलिन किंवा सोव्हिएत पक्ष हुकूमशहा किंवा सर्वसत्तावादी असण्याचा प्रश्न आहे, हा पूर्णपणे साम्राज्यवादी प्रसारमाध्यमांचा निंदनीय कुत्साप्रचार आहे. ज्यानेही सोव्हिएत युनियनबद्दलचे बाजारू बुद्धिजीवींचे नव्हे तर गंभीर इतिहासकारांचे लेखन वाचले आहे, त्यांना हे माहित आहे.

अशाच पद्धतीने स्टॅलिन यांनी पक्षाव्यतिरिक्त समाजातसुद्धा लोकशाही वाढविण्यासाठी संघर्ष केला. उदाहरणार्थ, 1936 च्या राज्यघटनेचा मसुदा तयार करताना सोव्हिएत सदस्यांसाठी थेट निवडणुका घेण्याच्या, कम्युनिस्ट पक्षाच्या उमेदवारांशिवाय इतर शहरी गटांद्वारे उमेदवार उभे केले जाण्याच्या, निवडणूक प्रचार आणि सार्वजनिक सभांमध्ये उमेदवार आणि पक्षाच्या व्यक्तींशी प्रश्नोत्तरे करण्याच्या आणि निवडणुकीसाठी गुप्त मतदानाच्या बाजूने ते ठामपणे उभे राहीले. आणि स्टॅलिन हे सर्व त्यावेळी करत होते जेव्हा देशाच्या आतून व बाहेरून सुरु असलेले विविध कटकारस्थाने आणि नंतर दुसऱ्या महायुद्धाने पक्ष व समाजात लोकशाही वातावरण बनवण्याच्या प्रयत्नात अनेक अडथळे आणले होते.

पान 15 वर

# कविता कृष्णन: सर्वहारा वर्गाची नवीन गद्दार

पान 14 वरून

**दावा क्रमांक 2: 'स्टॅलिनने हिटलरशी युती केली, ज्यामुळे महायुद्धात लाखो लोक मरण पावले'**

स्नायडरच्या या हास्यास्पद दाव्यालासुद्धा कविता कृष्णन पोपटाप्रमाणे पुनरावृत्त करते की महायुद्धापूर्वी स्टॅलिनच्या नेतृत्वाखालील सोव्हिएत युनियनने हिटलरच्या नेतृत्वाखालील जर्मनीशी करार केला ज्यामुळे पोलंड, बेलारूस, युक्रेन आणि तीन बाल्टिक देशांतील लाखो लोकांचा बळी गेला. सर्व ट्रॉट्स्कीवादी आणि कम्युनिस्ट विरोधी प्रचारकांप्रमाणे, कृष्णन यांनीसुद्धा या दाव्याचे समर्थन करण्यासाठी मोलोटोव्ह-रिबेनट्रॉप कराराला संदर्भापासून तोडून प्रस्तुत केले. स्टॅलिन-विरोधी साम्राज्यवादी दुष्प्रचाराप्रमाणे तिनेसुद्धा अतिशय चलाखीने ग्रेट ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिका यांसारख्या साम्राज्यवादी देशांनी केलेल्या फॅसिस्टांच्या तुष्टीकरणाच्या दीर्घ इतिहासाला गायब करून टाकले, तसेच एकाकी असूनही फॅसिझमच्या आसन्न धोक्याला सामोरे जाण्यासाठी सोव्हिएत संघाने या पाश्चिमात्य साम्राज्यवादी देशांशी मिळून एक सामूहिक सुरक्षा करार पूर्णत्वास नेण्यासाठी जे अथक प्रयत्न केले त्याची चर्चाही संपूर्णपणे गायब केली. इतिहासातील वस्तुस्थिती अशी आहे की 1936 मध्ये जर्मनी, इटली आणि जपानची फॅसिस्ट युती खुल्या स्वरूपात अस्तित्वात आली होती. इटलीने 1936 मध्येच इथिओपियावर आक्रमण केले होते. सोव्हिएत युनियनने प्रस्ताव देऊनही, इटलीविरुद्ध कुठलीही प्रभावी सामूहिक कारवाई करण्यात आली नाही. 1938 मध्ये, नाझींनी ऑस्ट्रिया आणि चेकोस्लोव्हाकियावर कब्जा केला. अशाप्रकारे नाझी सोव्हिएत युनियनच्या सीमेकडे वेगाने पुढे जात होते. अशा परिस्थितीत, फॅसिझमच्या धोक्याचा सामना करण्यासाठी सामूहिक पुढाकार घेण्याऐवजी, पाश्चिमात्य शक्ती हिटलरला सोव्हिएत युनियनवर हल्ला करण्यासाठी चिथावणी देण्यात गुंग होत्या. 29-30 सप्टेंबर 1938 रोजी ब्रिटीश पंतप्रधान चेंबरलेन आणि फ्रेंच पंतप्रधान दलादिए यांनी हिटलर आणि मुसोलिनी यांची म्युनिकमध्ये भेट घेतली आणि प्रसिद्ध 'मुनिक करारा'वर स्वाक्षरी केली, ज्या अंतर्गत चेकोस्लोव्हाकियाचे काही महत्त्वाचे क्षेत्र विभाजित करून जर्मनीला देण्यात आले. त्यानंतर ब्रिटन आणि फ्रान्सने स्वतंत्रपणे जर्मनीशी अनाक्रमणाचा करार केला आणि सोव्हिएत युनियनवर हल्ला करण्यासाठी चिथावणी दिली. एवढेच नाही तर स्पॅनिश प्रजासत्ताक चिरडण्यासाठी त्यांनी जर्मन आणि इटालियन आक्रमकांना साथ दिली.

1939 पर्यंत हे स्पष्ट झाले होते की दुसरे महायुद्ध कधीही सुरू होऊ शकते. मे 1939 मध्ये जपानने सोव्हिएत युनियनवर हल्ला केला. अगदी याच वेळी, जेव्हा साम्राज्यवादी असा विचार करत होते की हिटलर पूर्वेकडे चढाई करेल आणि सोव्हिएत युनियन दोन्ही बाजूंनी अडकून पडून काही दिवसांत कोसळेल, तेव्हा स्टॅलिनने मोलोटोव्ह-रिबेनट्रॉप कराराच्या रूपात जर्मनीशी अनाक्रमणाचा करार करून अशी मुत्सद्दी खेळी केली की साम्राज्यवादी अवाक झाले. तसे बघायला गेले तर हा असा एक राजकीय मास्टरस्ट्रोक होता ज्यासाठी जागतिक सर्वहारा वर्गाचे नेते स्टॅलिन यांचे कौतुक केले पाहिजे कारण याद्वारे सोव्हिएत युनियनने साम्राज्यवाद्यांच्या दोन गटांना आपापसात लढण्यात व्यस्त केले आणि युद्धाच्या तयारीसाठी अमूल्य असा दोन ते अडीच वर्षांचा कालावधी मिळाला.

जिथपर्यंत पोलंडचा संबंध आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे की सोव्हिएत सैन्याने पोलंडची सीमा नाझींच्या हल्ल्याच्या 16 दिवसांनंतर त्यावेळी ओलांडली जेव्हा ते राज्य म्हणून अस्तित्वात नव्हते आणि फक्त तेच क्षेत्र ताब्यात घेतले जे ऑक्टोबर क्रांतीनंतर पोलंडच्या राज्यकर्त्यांनी बळकावले होते. कविता कृष्णन अमेरिकन साम्राज्यवादी प्रचारतंत्राच्या एवढ्या नशेत आहेत की त्यांना हे सुद्धा लक्षात नाही की हिटलरच्या बलाढ्य फॅसिस्ट सैन्याचा निर्णायक पराभव स्टॅलिनच्या नेतृत्वाखाली रेड आर्मीच्या सैनिकांनी रशियन जनतेला सोबत घेऊन स्टॅलिनग्राडच्या रस्त्यावर त्यांच्या अतुलनीय शौर्याने, पराक्रमाने आणि अफाट बलिदान देऊन केला.

**दावा क्रमांक 3: 'सत्तेत राहण्यासाठी स्टॅलिनने पक्षातील वरच्या नेतृत्वाला नष्ट केले'**

हा दावा देखील नवीन नाही आणि त्याचे धागे 1956 मध्ये सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या 20 व्या काँग्रेसमध्ये झालेल्या ख्रुश्चेव्हच्या गुप्त भाषणाशी जोडलेले आहेत. ग्रोव्हर फर यांनी त्यांच्या 'ख्रुश्चेव्ह लाईड' ('खोटा ख्रुश्चेव्ह') या पुस्तकात सोव्हिएत अभिलेखागाराच्या आधारे ख्रुश्चेव्हचे सर्व खोटे दावे उघड केले आहेत. सत्य हे आहे की, 1 डिसेंबर 1934 रोजी पक्षाचे प्रमुख नेते किरोव्ह यांच्या हत्येनंतर, सोव्हिएत सत्ता उलथून टाकण्याच्या उद्देशाने दहशतवादी आणि विध्वंसक कारवाया करण्याचे डावपेच समोर येऊ लागले होते. खरंतर, ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वात 1932 मध्ये ट्रॉट्स्कीवादी, झिनोव्हिएववादी आणि इतरांद्वारे एक गुप्त गट तयार करण्यात आला होता, ज्याचे उद्दिष्ट दहशतवादी कृत्ये करणे आणि बोल्शेविक नेत्यांची हत्या करून उठावाची तयारी करणे हे होते. 1980 नंतर हार्वर्ड युनिव्हर्सिटीने सार्वजनिक केलेल्या ट्रॉट्स्की अभिलेखागाराच्या आधारे सुद्धा हा गट तयार करण्यात आला होता हे सिद्ध झाले आहे. हे खरे आहे की 1936-38 दरम्यान सोव्हिएत सत्तेविरुद्धचा कट उधळून लावण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अटकसत्र करण्यात आले, अनेकांना फाशीची शिक्षा झाली आणि अनेकांना पक्षातून काढून टाकण्यात आले. या मोहिमेच्या तडाख्यात अनेक निष्पाप लोकही आलेत, हे खरे आहे. पण ते पक्षाचे किंवा स्टॅलिनचे जाणीवपूर्वक अवलंबलेले धोरण म्हणून मांडणे म्हणजे इतिहासासोबत प्रतारणा करणे आहे. किंबहुना, स्टॅलिन यांना या अतिरेकांची माहिती होताच त्यांनी ताबडतोब त्यांना रोखण्याचे आणि असे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले. या अतिरेकांचे नेतृत्व करणारे सोव्हिएत पोलिस एनकेव्हीडीचे प्रमुख येझोव्ह यांची जागा एनकेव्हीडीचे प्रमुख म्हणून लॅव्हरेन्टी बेरिया यांनी घेतली, त्यानंतर अतिरेक कमी झाला. येझोव्हला अटक करून खटला चालवला गेला आणि 1940 मध्ये त्याला मृत्यूदंडाची शिक्षा झाली. हा समाजवादी समाजात चालू असलेला वर्गसंघर्ष होता आणि वर्गसंघर्षाच्या प्रक्रियेत प्रत्येक गोष्ट योजनाबद्ध पद्धतीने, एखाद्या रात्रीभोजप्रमाणे किंवा रेशमाच्या कलाकारीप्रमाणे नसते. भांडवलशाही क्रांत्यांच्या काळात यापेक्षाही भयंकर अतिरेक आणि हिंसाचार झाला. पण जेव्हा सर्वहारा क्रांतीचा विचार केला जातो तेव्हा ते प्रेमगीतासारखे मऊ आणि नाजूक असण्याची अपेक्षा केली जाते! यापेक्षा मूर्खपणा आणखी काय असू शकतो?

मॉस्को खटल्यांबद्दल बोलायचे झाल्यास हे खटले विविध देशांचे राजदूत, पत्रकार आणि अनेक लेखकांच्या उपस्थितीत चालवले गेले होते. त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी नंतर हे खटले योग्य असल्याची आणि गुन्हेगारांचे कबुलीजबाब अचूक असल्याची बाब स्वीकारली होती. यापैकी एडवर्ड डेव्हिस हे त्यावेळी सोव्हिएत युनियनमध्ये अमेरिकेचे प्रमुख राजदूत आणि स्वतः वकील होते; डी.एन. प्रिट हे ब्रिटनचे राजदूत आणि जगप्रसिद्ध वकील होते; ॲना लुई स्ट्रॉंग एक अमेरिकन लेखिका होती ज्यांना 1949 मध्ये सोव्हिएत युनियनमधून निष्कासित करण्यात आले होते, ज्यांनी 'स्टालिन युग' या त्यांच्या पुस्तकात या खटल्यांच्या सत्यतेची पुष्टी केली आहे.

**दावा क्रमांक 4: 'युक्रेन आणि सोव्हिएत युनियनच्या इतर भागांतील लाखो शेतकऱ्यांच्या मृत्यूला स्टॅलिन जबाबदार होता'**

हा दावासुद्धा खूप जुना आहे की सोव्हिएत युनियनमध्ये 1929 पासून सुरू झालेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेदरम्यान सामूहिकीकरणाची मोहीम आणि एक वर्ग म्हणून कुलकांचा परजीवी वर्ग नष्ट करण्याच्या मोहिमेमुळे लाखो लोकांचा मृत्यू झाला आणि त्याला स्टालिन थेट जबाबदार होते. परंतु लुडो मार्टेन्स आणि ॲना लुई स्ट्रॉंग सारख्या लेखकांनी या खोटेपणाचे खंडन आधीच केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, स्टॅलिनला क्रूर आणि हिंसक माणूस म्हणून चित्रित करण्यासाठी मृतांचा आकडा निर्लज्जपणे वाढवून सांगितला जातो. असे करून सामूहिकीकरणाच्या काळात सुरू असलेल्या तीव्र वर्गसंघर्षाच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष केले जाते. ही उलथापालथीची प्रक्रिया ढोबळपणे दोन टप्प्यांतून जाते. पहिल्या टप्प्यात अंदाजापेक्षा जास्त शेतीचे सामूहिकीकरण झाल्यामुळे जी अराजकता पसरली होती, त्याला दुसऱ्या टप्प्यात दुरुस्त करण्यात आले होते. या दुसऱ्या टप्प्यात कुलकांनी वर्ग म्हणून आपले अस्तित्व वाचवण्यासाठी सोव्हिएत सत्तेविरुद्ध उठाव केला. त्यांनी उभारलेल्या सशस्त्र पथकांनी ठिकठिकाणी उठाव केला, दहशतवादी कारवाया केल्या, पक्षाने पाठवलेले अनेक कम्युनिस्ट मारले गेले. सामूहिकीकरणाच्या प्रक्रियेला आळा घालण्यासाठी, उत्पादनाची साधने मोठ्या प्रमाणावर नष्ट केली गेली जेणेकरून सामूहिक शेती सुरूच होऊ नये. उभी पिके जाळली गेली, इमारती उद्ध्वस्त करण्यात आल्या. एवढेच नव्हे तर कुलकांकडून अफवासुद्धा पसरवल्या गेल्या, राजकीय प्रचार करण्यात आला, शेतकऱ्यांची निरक्षरता, सांस्कृतिक मागासलेपणा, अंधश्रद्धा आणि धार्मिक श्रद्धेचा पुरेपूर फायदा उठवून त्यांना बोल्शेविकांविरुद्ध भडकावण्यात आले. अशा परिस्थितीत प्रतिगामी कुलक-धनी शेतकरी वर्गाचे दमन केले गेले, जे कोणत्याही समाजवादी सत्तेसाठी अत्यावश्यक आहे. माओने म्हटल्याप्रमाणे क्रांती ही डिनर पार्टी किंवा रेशमी कलाकारी नाही तर वर्गयुद्ध आहे. या नग्न सत्यापासून तोंड फिरवणारा व्यक्तीच क्रांतिकारी हिंसेने व्यथित होऊन हिंसेला निरपेक्षपणे विरोध करू शकतो.

जिथपर्यंत युक्रेनमध्ये दुष्काळामुळे लाखो लोकांच्या मृत्यूचा प्रश्न आहे, तर या संदर्भात लुडो मार्टेन्सने दाखवून दिले आहे की धान्याचा तुटवडा नक्कीच होता, परंतु दुष्काळाची कथा पूर्णपणे रचलेली आहे, ज्यामागे हिटलरची प्रचार यंत्रणा आणि विल्यम हर्स्टने अमेरिकेत स्थापन केलेल्या 'पिवळ्या पत्रकारिते'चे साम्राज्य होते.

**दावा क्रमांक 5: सध्या सुरू असलेल्या युक्रेन युद्धात 'ग्लोबल लेफ्ट' (?!!) रशियन साम्राज्यवादाची बाजू घेत आहे.**

रशियाच्या साम्राज्यवादी हल्ल्यानंतर युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या संदर्भात कविता कृष्णन जगभरातील डाव्यांना न थकता दूषणे देत आहे की ते रशियाची बाजू घेत आहेत आणि युक्रेनच्या जनतेला साथ देत नाहीत. तिच्या खोटेपणाला प्रामाणिक दाखवण्यासाठी ती 'ग्लोबल लेफ्ट' सारखे शब्दप्रयोग करत आहे, जणू काही असा एकसंध समुदाय अस्तित्वात आहे. हे खरे आहे की काही कम्युनिस्ट पक्ष (विशेषत: दुरुस्तीवादी पक्ष) आणि तथाकथित डाव्या बुद्धिजीवींनी रशियन हल्ल्यासाठी रशियाला पुरेसे जबाबदार धरले नाही आणि ते अमेरिकन साम्राज्यवादाला त्यांचे मुख्य लक्ष्य बनवत आहेत. परंतु हेही खरे आहे की, युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धासाठी बहुतांश गंभीर कम्युनिस्ट क्रांतिकारी गट-संघटना आणि पक्षांनी अमेरिकन साम्राज्यवादासोबतच रशियन साम्राज्यवादालाही कठड्यात उभे केले आहे आणि या युद्धाला दोन साम्राज्यवादी छावण्यांमध्ये सुरू असलेल्या स्पर्धेचा परिणाम म्हणून बघितले आहे. परंतु कदाचित कविता कृष्णन अमेरिकन साम्राज्यवादाचा आवडता डावा चेहरा म्हणून जागतिक स्तरावर प्रस्थापित होण्याचे स्वप्न पाहत आहे! हे एक कारण असू शकते ज्यामुळे त्या रशियन आणि चिनी साम्राज्यवादावर तर बरेच काही बोलतात परंतु अमेरिकन साम्राज्यवादाच्या कारवायांवर निर्लज्जपणे पांघरूण घालतात.

**कविता कृष्णन यांनी व्यक्त केलेले उदारमतवादी (बुर्झ्वा) लोकशाहीप्रतीचे प्रेम आणि उदारमतवादी गटामध्ये आनंदाची लाट!**

कविता कृष्णन यांनी पक्ष सोडण्याच्या निर्णयामागे उद्धृत केलेल्या तीन कारणांपैकी एक कारण उदारमतवादी (वाचा बुर्झ्वा/ भांडवली) लोकशाहीचे रक्षण करणे हे सांगितले आहे. उदारमतवादी लोकशाहीवरील तिच्या या अपार प्रेमासाठी सर्व उदारमतवादी, डावे-उदारमतवादी आणि उदारमतवादी-डावे कविता कृष्णन यांचे अभिनंदन करत आहेत. पक्षात असतानाही ती याच गटाच्या जवळ होती, पण आज तिने या गटात पूर्णपणे सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणूनच एका मुरलेल्या दुरुस्तीवाद्याप्रमाणे, ती 'लोकशाही' हा शब्द 'सर्वहारा' किंवा 'भांडवली' या विशेषणाशिवाय वापरते आणि फॅसिझमच्या विरोधात त्याचे रक्षण करण्याची शपथ घेते. अशातच

पान 13 वर

# मोदींची 'महासत्ता' करतेय भूकेचे विश्वविक्रम!

✎ बबन

'जागतिक भूक निर्देशांक'(Globle Hunger Index) अहवाल दरवर्षी जगभरातील भूक आणि कुपोषणाच्या स्थितीवर प्रसिद्ध केला जातो. या अहवालात जगातील विविध देशांमधील भूक आणि कुपोषणासह इतर माहिती आणि आकड्याच्या संबंधित अनेक पैलूंच्या आधारावर एक संख्यात्मक निर्देशांक तयार केला जातो. या निर्देशांकाद्वारे विविध देशांमधील भूकेची पातळी आणि त्यानुसार क्रमवारी दर्शवली जाते. प्रामुख्याने भूक, कुपोषण, पोषण आणि बालमृत्यू दर या घटकाच्या आधारावर हा निर्देशांक तयार केला जातो. हा निर्देशांक लोकांना योग्य पोष्टिक अन्न व पुरेशा वाढीसाठी कॅलरी मिळत नसल्याच्या स्थितीला दर्शवत असतो.

या वर्षीच्या आक्टोंबर 2022 मधील अहवालाने स्पष्ट केले आहे की, संपूर्ण जगातील एक मोठा हिस्सा भांडवली लुटीमुळे आणि उपासमारीने त्रस्त आहे. **या अहवालानुसार 121देशाच्या यादीत भारत सहा क्रमांकांने घसरुन 107 क्रमांकावर आला आहे.** तर याच अहवालात हे देखील सांगितले आहे की, नेपाळ (81),बांगलादेश (84), म्यानमार (71)आणि पाकिस्तान (99) भारतापेक्षा चांगल्या स्थानावर आहेत. खरेतर शेजारील या देशातील स्थिती देखील काही फार चांगली नाही परंतु भारताच्या तुलनेत या देशाची स्थिती ठीक आहे असे हा अहवाल म्हणतो. या अहवालातील आकडेवारी ही फक्त आकडेवारी नसून भूक, उपासमारी, कुपोषण आणि बालमृत्यूच्या भयावह स्थितीचे वर्णन आहे. हा निर्देशांक म्हणजे कामगार-कष्टकरी वर्गातील लोकांच्या राजरोसपणे होणाऱ्या हत्यांचा निर्देशक आहे. एकूणच हा भांडवली लुट आणि राज्यकर्त्यांच्या जनविरोधी धोरणाचा परिणाम असल्याचे पुन्हा या अहवालाने स्पष्ट झाले आहे.

> **नेपाळ (81), बांगलादेश (84), म्यानमार (71) आणि पाकिस्तान (99) भारतापेक्षा चांगल्या स्थानावर आहेत.**

जागतिक भूक निर्देशांक - 2021 अहवालात असे म्हटले होते होते की कोरोना महामारीच्या काळात अन्न आणि पौष्टिक आहाराची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे आणि त्याचे गंभीर परिणाम भविष्यात देखील दिसून येतील. आता **एकाच वर्षानंतर जागतिक भूक निर्देशांकाच्या – 2022 मधील अहवालाने पुन्हा एकदा भांडवली लुटीला उघडे पाडले आहे.** भांडवलशाही अगोदरच स्वत:च्या संरचनात्मक संकटाला सामोरे जात आहे आणि कोविड महामारीमुळे झालेल्या आर्थिक मंदीमुळे जगभरातील सुमारे 80 दशलक्ष लोक कुपोषणाने ग्रस्त आहेत. अहवाल सुचवितो की, जीडीपीमध्ये प्रत्येक 1टक्का घटीसोबत जगभरातील आणखी 7 दशलक्ष मुले देखील अल्पायुषी बनतील, ज्यामुळे कुपोषणाची स्थिती गंभीर होऊ शकते. भारतात या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपीमध्ये 13.5 टक्के घट झाली आहे. यावरून अंदाज लावला जाऊ शकतो की,भारतातील गरीब आणि कष्टकरी लोकांची स्थिती किती भीषण आहे.

भारतातील भूक आणि कुपोषणाच्या परिस्थितीवर भारत सरकारची आकडेवारी



पाहिली तर परिस्थिती तशीच दिसते. भारताच्या 'राष्ट्रीय पोषण धोरण' आयोगाने जाहीर केलेल्या पुस्तिकेनुसार, भारतात जगात सर्वात जास्त मुले आहेत आणि ती जगातील बाल लोकसंख्येच्या सुमारे एक पंचमांश आहेत. मुले आणि महिलांची लोकसंख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 70 टक्के आहे.

राष्ट्रीय कुटुंब आणि आरोग्य सर्वेक्षणानुसार भारतात 38.4 टक्के मुले लहान उंचीची आहेत. पाच वर्षांखालील 21 टक्के मुले कमी वजनाची आहेत आणि एकूण 35.7 टक्के मुले कमी वजनाची आहेत. देशातील एकूण लोकसंख्येपैकी 35.5 टक्के महिलांचे वजन कमी आहे आणि 55.3 टक्के अशक्तपणाने ग्रस्त आहेत. भारतात22.7 टक्के पुरुष अशक्त आहेत. राष्ट्रीय पोषण धोरणानुसार, बालमृत्यू दर प्रती हजार 51 इतका आहे. ही आकडेवारी दाखवते की 'कुपोषणमुक्त भारत' असा नारा मोदी सरकारने 'व्हिजन 2022' च्या नावाने दिला आहे, पण लोकांच्या हातातून रोजगार हिसकावून भांडवलदारांच्या तिजोऱ्या भरणाऱ्या या फॅसिस्ट सरकारने फसवणुकीशिवाय जनतेला काहीही दिले नाही.

शेवटी, भारतातील भूक आणि कुपोषणाचा बिकट प्रश्न सोडवणे खरच शक्य नाही का? भारतात अन्नधान्याचे उत्पादन इतके कमी आहे का की या देशातील लोकांना उपासमारीला सामोरे जावे लागेल? या अडचणीला समजून घेण्यासाठी काही आकडेवारी पाहूयात. मार्च 2020मध्ये भारतात कोरोनाच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये, भारतीय अन्न महामंडळाचे अध्यक्ष डी.व्ही.प्रसाद म्हणाले होते की "काळजी करण्याची काहीच गरज नाही, देशाच्या प्रत्येक भागात गहू आणि तांदळाचा पुरेसा साठा आहे." ते म्हणाले की भारताकडे दीड वर्षांपर्यंत सर्व लोकसंख्येला पुरेल इतके अन्नधान्य आहे. भारतात 2015-16 मध्ये 2497 लाख टन अन्नधान्याचे उत्पादन झाले, 2016-17 मध्ये 2729 लाख टन, 2017-18 मध्ये 2828 लाख टन, 2018-19 मध्ये 2813 लाख टन आणि वर्ष 2019-20 मध्ये 2920 लाख टन. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या एका अंदाजानुसार भारतातील संपूर्ण लोकसंख्येला पोसण्यासाठी 2300 लाख टन अन्नधान्याची गरज होती. लक्षात घ्या की 2300 लाख टन म्हणजे प्रति व्यक्ति प्रति दिवस 440 ग्रॅम अन्न. आकडेवारी हेच दाखवते की देशामध्ये शेतमजूर आणि गरीब शेतकरी मिळून प्रति व्यक्ति प्रति दिवस 560 ग्रॅम पेक्षा जास्त अन्न पैदा करतात. यावरुन हे स्पष्ट होते की देशात लोकसंख्येसाठी अन्नधान्याची कमतरता नाहीच आणि गरजेपेक्षा जास्त उत्पादन होत आहे. मोदी सरकारच्या अनेक मंत्र्यांनी असेही म्हटले आहे की, 'देशात अन्नधान्याची कमतरता नाही.' गेल्या अनेक वर्षांपासून, देशातील अन्न उत्पादन एकूण लोकसंख्येच्या गरजेपेक्षा जास्त असूनही, देशातील सर्वाधिक लोकसंख्या उपासमारीने त्रस्त आहे. भांडवलदारांच्या नफ्याच्या चक्कीमध्ये चिरडलेला कामगार वर्ग, एकीकडे बेरोजगारीने आणि दुसरीकडे भांडवलदारांनी सतत नफा वाढवण्याच्या प्रयत्नात मजुरी इतकी कमी केली आहे की, कामगार फक्त कसाबसा जगू शकेल. देशात एफ.सी.आय च्या गोदामांमध्ये दरवर्षी लाखो टन धान्य वाया जाते. कारण जर हे धान्य या देशाच्या गरजू लोकांपर्यंत पोहचवले गेले तर सर्व कृषी अन्यधान्य व्यवसाय कंपन्यांच्या नफ्याचे नुकसान होईल. लुटीवर आधारित या व्यवस्थेत, सरकारी धोरणे आणि भांडवलशाहीची नैसर्गिक गती अशी आहे की, त्यात पुरेशी संसाधने उपलब्ध असली तरीही, सर्वाधिक लोकसंख्या उपासमारी आणि कुपोषणाची बळी राहील.

> **आकडेवारी हेच दाखवते की देशामध्ये शेतमजूर आणि गरीब शेतकरी मिळून प्रति व्यक्ति प्रति दिवस 560 ग्रॅम पेक्षा जास्त अन्न पैदा करतात.**

एकीकडे भारतात दरवर्षी अब्जाधीशांची संख्या वाढत असताना दुसरीकडे गरीब अधिक गरीब होत आहेत. बेरोजगारी वाढत आहे. कोरोनाच्या काळात, एकीकडे, या देशातील काम करणाऱ्या लोकसंख्येला अभूतपूर्व संकटांचा सामना करावा लागला आहे. तर फोर्ब्स मासिकाने 2020 च्या अब्जाधीशांच्या यादीत भारतातील 9 नवीन अब्जाधीशांची नावे जोडली गेली आहेत. कोरोनाच्या काळात जिथे संपूर्ण देशात आर्थिक मंदी होती; कामगार आणि गरीब माणसाचे उत्पन्न थांबले होते. रोजगार हिरावून घेतला गेला होता. त्याचबरोबर देशातील सर्वात मोठे भांडवलदार मुकेश अंबानी यांचे उत्पन्न 73 टक्के आणि गौतम अदानी यांचे उत्पन्न 61 टक्के वाढले. अदानी तर आता जगातील सर्वाधिक श्रीमंत लोकांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आले आहेत.

यावरुन हे स्पष्ट आहे की, या देशात उपासमार, कुपोषण आणि यामुळे होणारे मृत्यू; मग ते मुलांचे, स्त्रियांचे किंवा पुरुषांचे मृत्यू. भांडवलदारांच्या शोषणाचे आणि या भांडवलदारांना श्रीमंत करण्यासाठी सरकारांनी केलेल्या कामाचा परिणाम आहे. जे लोक उपासमारीने मरतात आणि कुपोषित असतात ते या देशातील गरीब लोकांचे मुलं आणि मुली आहेत जे भांडवलाच्या नग्न लूटीने त्रस्त आहेत. या देशातील श्रीमंत किंवा राजकारणी किंवा मंत्र्यांची मुले भूक आणि कुपोषणामुळे मरत नाहीत. ज्याचा मृत्यू झाला आहे ते कष्टकरी, गरीब आणि असहाय्य घटकातील कष्टकरी जनता आहे. पुरेसे अन्नधान्य उत्पादन असूनही कोणत्याही मनुष्याला कुपोषित राहून उपासमारीने किंवा कुपोषणामुळे मरणाला कवटाळावे लागावे याचे एकमात्र कारण आहे बाजाराची, नफ्याची भांडवली व्यवस्था जी एकीकडे अतिउत्पादन करवते आणि दुसरीकडे बहुसंख्य कामकरी लोक जे उत्पादन करतात, त्यांनाच वंचित ठेवते .

> **भांडवलशाही ती व्यवस्था आहे जिथे प्रचंड संपन्नतेमुळेच अभाव आहे!**

भांडवलशाही ती व्यवस्था आहे जिथे प्रचंड संपन्नतेमुळेच अभाव आहे! आज भारतात इतके अन्न-धान्य, दुध-दुभते, कपडे, इत्यादी निर्माण होतात की प्रत्येक माणसाची गरज भागवली जाऊ शकते. परंतु एकीकडे कामगार-कष्टकऱ्यांनी मिळून निर्माण केलेली अपरंपार संपत्ती नष्ट होऊ दिली जाते, वाया जाऊ दिली जाते, अन्न सडते, कापड जाळले जाते, दूध ओतून दिले जाते, भाजीपाला रस्त्यांवर फेकून दिला जातो, कोट्यवधी घरे बांधून तयार असताना रिकामी पडून राहू दिली जातात; परंतु ज्यांना गरज आहे त्यांच्यापर्यंत यापैकी काहीही पोहोचू दिले जात नाही! भांडवलशाहीत प्रत्येक गोष्ट उत्पादित होत आहे ती फक्त विक्रीसाठी आहे, बाजारासाठी आहे, आणि त्याद्वारे मालकांना नफा मिळावी यासाठीच आहे. म्हणूनच आज ना फक्त अशा समाज व्यवस्थेची कल्पना होऊ शकते, तर अशी समाज व्यवस्था निर्माण करणे शक्य आहे, जिच्यामध्ये सर्व लोकांच्या गरजा भागवल्या जातील. कोट्यवधी काम करणारे हात उत्पादन साधनांवर मालकी सांगून स्वत:च्या गरजांकरिता उत्पादन घडवणारा समाजवाद निर्माण करतील अशी व्यवस्था शक्य आहे! परंतु त्याकरिता आवश्यक आहे की या बाजाराच्या, नफ्याच्या, स्वार्थ्याच्या व्यवस्थेला समजून घ्यावे, आणि तिला ध्वस्त करण्याकरिता क्रांतिकारी पद्धतीने संघटित व्हावे!

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॅार, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित